CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

धाराशिव | शुक्रवार, ६ फेब्रुवारी २०२६ । वर्ष ३ रे अंक ३३७ । पाने १२ । किंमत रु. ६/- | ■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026. | dainiktarunbharat.com | epaper.dainiktarunbharat.com




## विचारपुष्प



संपूर्ण विश्वात एकच परमात्मा वास करत असल्यामुळे, आपल्याला देवाची कोणत्याही रूपात पूजा करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य आहे. आत्मीयतेची भावना हीच खऱ्या अर्थाने महत्त्वाची गोष्ट आहे. ज्या व्यक्तीला आपण आपले मानले, तिचे सर्व दुःख आणि वेदना आपल्याच दुःख आणि वेदना बनतात आणि त्याला त्या परिस्थितीतून बाहेर काढण्यात मदत करणे हे आपण आपले कर्तव्य मानतो.

**- कुप्प. सी. सुदर्शनजी**
रा. स्व. संघाचे पाचवे सरसंघचालक

## २.५ कोटी आधार नंबर डिलीट

**नवी दिल्ली :** भारतातील आधार जारी करणारी संस्था, युनिक आयडेंटिफिकेशन अथॉरिटी ऑफ इंडिया (यूआयडीएआय) ने देशातील २५ दशलक्षाहून अधिक आधार क्रमांक हटवले आहेत आणि यामागे एक महत्त्वाचे कारण आहे. हे सर्व लोक आता हयात नाहीत. यूआईडीएआईने गैरवापर रोखण्यासाठी २५ दशलक्षाहून अधिक आधार क्रमांक हटवले आहेत.

# पंतप्रधानांसोबत अनपेक्षित घटना घडली असती!

### माझ्या माहितीवरूनच पंतप्रधान सभागृहात आले नाहीत : ओम बिर्ला

◆ **नवी दिल्ली, ५ फेब्रुवारी**

बुधवारी सायंकाळी विरोधी पक्षांच्या काही सदस्यांनी माझ्या दालनात येऊन जसा व्यवहार केला, तसा व्यवहार लोकसभेत आजपर्यंत कधीच झाला नाही. काँग्रेस पक्षाचे काही सदस्य पंतप्रधानांच्या आसनापर्यंत जाऊन काही तरी अनुचित करणार असल्याची पक्की माहिती मला मिळाली होती. पंतप्रधानांच्या जिवाला धोका निर्माण होण्याची शक्यता होती, अशी माहिती लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी गुरुवारी दिली. तसेच या माहितीमुळे सभागृहात न येण्याची पंतप्रधानांना केलेली विनंती त्यांनी मान्य केली, असा गौप्यस्फोट त्यांनी केला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भाषणापूर्वी कनिष्ठ सभागृहाचे कामकाज तहकूब करण्यास कारणीभूत ठरलेल्या गोंधळाबद्दल ओम बिर्ला यांनी दुःख व्यक्त केले. विरोधी पक्षाच्या खासदारांनी खुर्चीला घेराव घातल्यामुळे पंतप्रधानांना लोकसभेतन येण्याचा सल्ला दिला होता, असे त्यांनी



सांगितले. विरोधी पक्षाच्या काही खासदारांनी लोकसभा सभागृहात गैरवर्तन केले होते आणि पंतप्रधानांच्या भाषणादरम्यान काँग्रेसच्या नेतृत्वाखालील विरोधी खासदार गोंधळ घालण्याचा प्रयत्न करू शकतात, अशी पूर्वमाहिती मला मिळाल्याचे ते म्हणाले.

विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना माजी लष्करप्रमुख मनोज नरवणे यांच्या अप्रकाशित पुस्तकातील काही उतारे वाचण्यापासून रोखण्यात आल्यानंतर विरोधी पक्षाच्या सदस्यांनी जोरदार निषेध केला. त्यानंतर बुधवारी लोकसभेत गदारोळ झाला होता. संरक्षण मंत्री राजनाथसिंह आणि गृहमंत्री अमित शाह यांनी या कृतीला तीव्र विरोध केला होता.

दुपारी दोन वाजता सभागृहाचे कामकाज पुन्हा सुरू झाल्यानंतर भाजपा खासदार निशिकांत दुबे यांनी 'एडविना ॲण्ड नेहरू' आणि 'द मित्रोखिन आर्काईव्ह'यासारख्या पुस्तकांचा संदर्भ देत, माजी पंतप्रधान जवाहरलाल नेहरू, इंदिरा गांधी आणि राजीव गांधी यांच्यावर टीका करणारी विधाने करून नवा वाद निर्माण केला होता.

**अशी घटना घडली असती तर...**

ऐतिहासिकदृष्ट्या राजकीय मतभेद संसदेच्या सभागृहात आणले गेलेले नाहीत. काँग्रेस पक्षाचे काही सदस्य पंतप्रधानांच्या आसनाजवळ जाऊन एखादी अनपेक्षित घटना घडवू शकले असते, असे बिर्ला यांनी सांगितले. अशी घटना घडली असती तर त्यामुळे देशाच्या प्रतिष्ठेला गंभीर धक्का बसला असता. म्हणूनच मी पंतप्रधानांना सभागृहात न येण्याची विनंती केली होती, असे ओम बिर्ला यांनी सांगितले.

**'तो' काळा डाग ठरला असता**

राजकीय मतभेद सभापतींच्या कार्यालयापर्यंत आणण्याची या सभागृहाची परंपरा कधीच राहिलेली नाही. बुधवारी जे घडले, तो संसदेच्या इतिहासातील काळा डाग आहे, असे ओम बिर्ला म्हणाले. ◀*(तभा वृत्तसेवा)*

### पंतप्रधानांच्या उत्तराविनाच धन्यवाद प्रस्ताव पारित

राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील धन्यवाद प्रस्तावावर झालेल्या चर्चेला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उत्तराविनाच हा प्रस्ताव आज लोकसभेत पारित करण्यात आला. २००४ नंतर लोकसभेत प्रथमच असा प्रसंग उदभवला. स्थगितीनंतर दुपारी १२ वाजता लोकसभेचे कामकाज सुरु होताच काँग्रेस सदस्य अध्यक्षांच्या आसनासमोरील मोकळ्या जागेत येऊन घोषणाबाजी करु लागले. बिर्ला यांनी राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील धन्यवाद प्रस्तावावर सदस्यांनी सुचवलेल्या दुरुस्त्यांना सभागृहाने मंजुरी दिल्यानंतर आवाजी मतदानाने हा प्रस्ताव पारित करण्यात आला. ■

# देश 'रिफॉर्म एक्सप्रेस'वर स्वार

### जगाचा भारतावरील विश्वास वाढला : पंतप्रधान मोदी

◆ **नवी दिल्ली, ५ फेब्रुवारी**

आज आम्ही देश धोरण आणि व्यूहरचनेच्या आधारावर चालवत आहोत. जगाचा भारतावरचा विश्वास वाढला आहे. रिफॉर्म, परफॉर्म आणि ट्रान्सफॉर्म च्या आधारावर आमची वाटचाल सुरु आहे. आज देश 'रिफॉर्म एक्स्प्रेस'वर स्वार झाला आहे, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी केले.

राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील धन्यवाद प्रस्तावावर राज्यसभेत झालेल्या चार दिवसांच्या प्रदीर्घ चर्चेला उत्तर देतांना आपल्या घणाघाती भाषणात मोदी यांनी गांधी आणि नेहरु घराण्यावर जोरदार हल्ला चढवला तसेच काँग्रेस आणि संपुआ सरकारच्या काळातील अपयशाचे वाभाडे काढले. विकसित भारताच्या दिशेने आपल्या सरकारची वाटचाल सुरु असल्याचे सांगत मोदी म्हणाले, आम्हाला झुकायचे नाही, थांबायचे नाही तर सतत समोर जायचे आहे. मोदी यांच्या आक्रमक आणि मुद्देसूद भाषणानंतर राज्यसभेने विरोधकांच्या अनुपस्थितीत धन्यवाद प्रस्ताव आवाजी मतदानाने पारित केला. लोकसभेत बुधवारी राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील धन्यवाद प्रस्तावावर चर्चा होऊ शकली नाही, हा संविधानाचा अपमान आहे, आदिवासी समाजातून आलेल्या महिला राष्ट्रपतींचा अपमान आहे, असा आरोप करत मोदी म्हणाले की, विरोधी पक्षांना संविधान शब्द उच्चारण्याचाही अधिकार नाही. लोकसभेत बुधवारी जो गदारोळ झाला, तो अतिशय दुर्दैवी आहे.

पंतप्रधान मोदी यांनी आपल्या जवळपास शंभर मिनिटांच्या भाषणात काँग्रेसच्या शासनकाळातील चुकांचा आणि अपयशांचा पाढा वाचतांना मोदी सरकारच्या ११ वर्षातील प्रगतीचा आणि विकासकामांचा गौरवपूर्ण उल्लेख केला. युरोपीयन समुदाय आणि अमेरिकेसोबत झालेल्या व्यापार कराराचा उल्लेख करत मोदी म्हणाले की, जगातील सर्वच देश आपण केलेल्या व्यापार कराराचे कौतुक करत आहे. दरम्यान, आपल्या भाषणाला सुरुवात करताच काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांच्या सदस्यांनी जोरदार घोषणाबाजी करत त्यांच्या भाषणात अडथळा आणण्याचा प्रयत्न केला. पण त्याला न जुमानता मोदी यांनी आपले भाषण सुरुच ठेवले. त्यामुळे विरोधकांनी सभात्याग केला. ◀*(तभा वृत्तसेवा)*



### युवराज अहंकारी

**या सभागृहातील एका मान्यवर सदस्याला काँग्रेसच्या अतिशय धूर्त युवराजाने गद्दार म्हटले, त्यांचा अहंकार किती मोठा आहे, याचे दर्शन त्यांच्या या कृतीतून होते, असा आरोप करत मोदी म्हणाले की, आतापर्यंत अनेक नेत्यांनी काँग्रेस सोडली, पण कोणत्याच नेत्याला त्यांनी गद्दार म्हटले नाही. ते सदस्य शीख असल्यामुळे त्यांना गद्दार म्हटले, हा शिखांचा, त्यांच्या गुरूंचा अपमान आहे.** ■


### दृष्टिकोनातच फरक

काँग्रेस आणि आमच्या दृष्टिकोनातच फरक आहे, काँग्रेस देशवासीयांना समस्या मानते, तर आम्ही १४० कोटी जनतेला आमचे सामर्थ्य मानतो, या सामर्थ्यवान जनतेच्या आधारावर आम्ही सर्व समस्यांवर मात करू शकतो, असा विश्वास पंतप्रधानांनी व्यक्त केला. तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी आणि पंडित जवाहरलाल नेहरू हे लोकसंख्येला समस्या मानायचे, असे मोदी यांनी सांगितले. ■


## जिल्हा परिषद - पंचायत समिती निवडणुका - २०२६

मतदार बंधू- भगिनींनो,
आपलं
एक मत जिल्हा परिषद निवडणूक विभागासाठी (गट)
आणि
एक मत पंचायत समिती निर्वाचक गणासाठी (गण)
अवश्य द्या!

मतदान यंत्रावरील (बीयू) मतपत्रिकांचे रंग



जि. प. गटाची मतपत्रिका असेल पांढऱ्या रंगाची

पं. स. गणाची मतपत्रिका असेल गुलाबी रंगाची

(उमेदवारांची संख्या जास्त असल्यास आवश्यकते नुसार एकपेक्षा अधिक मतदान यंत्रांचा (बीयू) वापर करण्यात येतो)

मतदान दि. ०७ फेब्रुवारी २०२६ | वेळ - सकाळी ७:३० ते सायं. ५. ३०

मतदार यादीतील नाव शोधण्यासाठी 'मताधिकार' मोबाईल ॲप आणि https://mahasecvoterlist.in या संकेतस्थळाची सुविधा

राज्य निवडणूक आयोग
महाराष्ट्र

MaharashtraSEC

कर मतदान...
सांगतंय संविधान!

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.





# सोलापूर कॅन्सर सोसायटी इमारतीला 'प्रिसिजन'मुळे नवसंजीवनी

## प्रिसिजनच्या सीएसआर निधीतून इमारतीचे नूतनीकरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ फेब्रुवारी-**

कॅन्सरग्रस्त रुग्णांसाठी अनेक वर्षांपासून सेवाभावी कार्य करणाऱ्या सोलापूर कॅन्सर सोसायटीच्या इमारतीचे संपूर्ण नूतनीकरण प्रिसिजन कॅमशाफ्ट्स लिमिटेडच्या उडठ (कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी) निधीतून नुकतेच यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आले. या नूतनीकरणामुळे संस्थेच्या रुग्णसेवेला नवी दिशा मिळणार असून रुग्णांसाठी अधिक सुरक्षित, स्वच्छ व सोयीस्कर सुविधा उपलब्ध होणार आहेत.

बुधवारी नूतनीकरणानिमित्त सोसायटीच्या नूतन इमारतीत विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला सोलापूर कॅन्सर सोसायटीच्या माजी सचिव कै. सुशीला पाटील यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्यांना आदरांजली वाहण्यात आली. या कार्यक्रमास प्रिसिजनचे चेअरमन व व्यवस्थापकीय संचालक यतिन शहा, सोलापूर कॅन्सर सोसायटीचे व्हॉइस चेअरमन डॉ. अरविंद देखणे, खजिनदार उत्तमराव डोईजोडे, मानद सचिव डॉ. व्यंकटेश मेतन, डॉ. शिरीष कुमठेकर यांच्यासह संस्थेचे सदस्य, डॉक्टर्स व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. शिरीष कुमठेकर यांनी केले. संस्थेची इमारत संरचनात्मकदृष्ट्या मजबूत असली तरी कालांतराने ती जीर्णावस्थेत गेली होती. रुग्णांची सुरक्षितता, सोय आणि स्वच्छतेच्या दृष्टीने नूतनीकरण अत्यावश्यक झाले होते. यावेळी मनोगत व्यक्त करताना प्रिसिजन फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ. सुहासिनी शहा म्हणाल्या की, इमारतीची अवस्था अतिशय खराब झाली होती आणि त्यामुळे रुग्णसेवेत अडथळे येत होते. म्हणूनच नूतनीकरण अपरिहार्य होते. प्रिसिजन कॅमशाफ्ट्स लिमिटेडने यापूर्वीही आरोग्य व शिक्षण क्षेत्रात भरीव योगदान दिले असून भविष्यातही समाजोपयोगी उपक्रमांना सातत्याने सहकार्य करत राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. विशेष म्हणजे ही संस्था पूर्णतः देणग्यांवर चालत असून कोणतेही शासकीय अनुदान संस्थेला मिळत नाही. कार्यक्रमाच्या शेवटी संस्थेचे मानद सचिव डॉ. व्यंकटेश मेतन यांनी सर्वांचे आभार मानले.

# तांबोळेत बिबट्यासदृश्य प्राण्याच्या हल्ल्यात गाय ठार

## मोहोळ तालुक्यात भीतीचे वातावरण

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि. ५ फेब्रुवारी-**

मोहोळ तालुक्यातील तांबोळे येथे मनोज बापू चौधरी यांच्या शेतातील वस्तीवर बुधवारी पहाटे ३ च्या दरम्यान अचानक बिबट्या सदृश्य प्राण्याने गायीवर हल्ला केला. यामध्ये गाय ठार झाल्याची घटना घडली. या घटनेने परिसरात खळबळ उडाली असून बिबट्याच्या दहशतीने भीतीचे वातावरण पसरले आहे.



या विषयी मनोज बापू चौधरी यांनीच दिलेल्या माहिती नुसार ते बुधवारी पहाटे आवाजाने जागे झाले. त्यांना गायीच्या ओरडण्याचा आवाज आला. त्यांनी लाईट लावली. त्यावेळी त्यांच्या अंगणात नुकतीच आणलेली एक जर्सी गाय तडफडत असल्याचे दिसून आले. त्या गाईचे कानाजवळचा भाग फाडल्याचे दिसून आले. घाबरलेल्या चौधरी यांनी सकाळ झाल्यानंतर सरकारी दवाखान्यातील डॉक्टरांशी संपर्क साधला. वनमजूर रावसाहेब माने यांनी घटनास्थळी भेट दिली. पशुधन पर्यवेक्षक ए.आर. वाळूजकर यांनीही पाहणी केली. याबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांना त्यांनी कळविले, मात्र हा बिबट्या आहे की अन्य प्राणी याची खात्री होऊ शकली नाही, तथापि या घटनेमुळे या परिसरात प्रचंड दहशतीचे वातावरण पसरले आहे. याबाबत चौधरी यांना विचारणा केली असता ही गाय एका आठवड्यापूर्वीच दीड लाख रुपयाला आणले त्यांनी सांगितलेले. आमचे नुकसान झाले आहे असे त्यांनी सांगितले.

# तक्रारीवरून गुन्हा दाखल करावयाचा झाल्यास गैरतक्रारदारास ७२ तास आगाऊ नोटीस द्यावी

## न्यायालयाचा आदेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ फेब्रुवारी-**

तक्रारीवरून गुन्हा दाखल झाल्यास गैर तक्रारदारास ७२ तास आगाऊ नोटीस द्यावी, असा आदेश प्रमुख जिल्हा व सत्र न्यायालयाने क्राईम ब्रँच सोलापूर यांना दिला आहे.

याची हकीकत अशी की, येथील व्यावसायिक सागर भास्कर थोरात (वय ३२, रा. १३, रेल्वे लाईन्स) यानी दाखल केलेल्या जामीन अर्जाच्या प्रकरणामध्ये, तक्रारदार रणशृंगारे यांच्या तक्रारीवरून श्री. थोरात यांच्याविरूध्द गुन्हा दाखल झाला होता. श्री. थोरात यांचेविरूध्द आर. एल. रणशृंगारे यांनी फसवणुकीबद्दल तक्रार दाखल केली होती. त्यात थोरात यांच्या अटकेची शक्यता निर्माण झाल्यामुळे त्यांनी अटकपूर्व जामिनाचा अर्ज दाखल केला होता. हा अर्ज सुनावणीवेळी संबंधित पोलीस अधिकाऱ्याने चौकशी करून गुन्हा दाखल करणार असल्याचे न्यायालयाला सांगितले. यावरून ॲड. शशि कुलकर्णी यांनी प्रकरणात पोलिसांनी गुन्हा दाखल होण्यापूर्वी ७२ तासाची आगाऊ नोटीस देण्याची मागणी केली. ही मागणी विचारात घेऊन न्यायालयाने, क्राईम ब्रँच सोलापूर यांनी रणशृंगारे यांच्या तक्रारीवरून थोरात यांच्याविरूध्द गुन्हा दाखल करावयाचा झाल्यास, ७२ तासाची आगाऊ नोटीस द्यावी, हा आदेश पारित केला. याकामी अर्जदार थोराततर्फे ॲड. शशि कुलकर्णी, ॲड. देवदत्त बोरगांवकर, ॲड. प्रसाद अग्निहोत्री, ॲड. आदित्य अदोने आणि सरकारतर्फे ॲड. आनंद कुर्दुकर यांनी काम पाहिले.

# मंगळवेढ्यात निवडणुकीसाठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा दि. ५ फेब्रवारी -**

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी मंगळवेढा स्थानिक प्रशासन सज्ज झाले आहे. दरम्यान

सर्व मतदान पथके शुक्रवार दि. ६ रोजी मतदान केंद्रावर रवाना होणार आहेत. तालुक्यात एकूण ४ जिल्हा परिषद गट व ८ पंचायत समिती गण आहेत. तालुक्यात एकूण १८९ मतदान केंद्र आहेत.

मतदान प्रक्रीयेसाठी सर्व केंद्र केद्रावर एकूण १२६४ कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.येथे एकूण २१७ पथकांची स्थापना करण्यात आली आहे. यामध्ये केंद्राध्यक्ष २१७, मतदान अधिकारी क्रमांक १- २१७, मतदान अधिकारी क्रमांक २- २१७, मतदान अधिकारी क्रमांक ३- २१७, केंद्रावरील पोलीस कर्मचारी - १८९,शिपाई - २०७ आदी कर्मचाऱ्यांचा समावेश आहे.

सर्व मतदान पथकांना शुक्रवार दिनांक ६ रोजी सकाळी ८ वाजता शासकीय धान्य गोदाम मंगळवेढा येथे राहण्यास कळवले असून जे कर्मचारी गैरहजर राहतील त्यांच्यावर फौजदारी कारवाई करण्यात येणार आहे.

शासकीय धान्य गोदाम मंगळवेढा येथून सर्व कर्मचाऱ्यांना मशीन व साहित्य वितरण केले जाणार असून त्यासाठी एकूण १६ टेबल वरून १३५ कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून साहित्य वितरण केले जाणार आहे.

मतदान पथकांना केंद्रावर घेऊन एकूण २४ एस टी बसेस व ३ क्रूझरची सोय करण्यात आली आहे. तसेच क्षेत्रीय अधिकारी यांच्यासाठी १६ वाहनांची व्यवस्था करण्यात आली आहे.

मंगळवेढा तालुक्यासाठी एकूण १६ क्षेत्रीय अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांच्या मदतीला आणखी १६ सहायक क्षेत्रीय अधिकारी असतील. मतदानासाठी केंद्रावरील एकूण १८९ उण व १८९ इण तयार करण्यात आले असून त्या व्यतिरिक्त २५ राखीव CU व २५ राखीव BU तयार करण्यात आले आहेत.

> **मतदार आता वापरणार मताधिकार**
>
> राज्य निवडणूक आयोगाने मतदारांना आपले मतदार यादीतील नाव शोधणे सोयीस्कर व्हावे यासाठी नव्याने मताधिकार हे मोबाईल ॲप तयार केले असून ते प्ले स्टोर वर उपलब्ध आहे.

नागणेवाडी येथील नानासाहेब प्रशाला येथील मतदान केंद्र क्रमांक १०५/१६ या ठिकाणी 'सखी मतदान केंद्र' तयार करण्यात आले असून या ठिकाणी केंद्राचा संपूर्ण कारभार महिला कर्मचारी सांभाळणार आहेत. त्याचबरोबर मरवडे येथील जिल्हा परिषद मराठी मुलींची शाळा येथे मतदान केंद्र क्रमांक १०८/१६ याठिकाणी 'आदर्श मतदान केंद्र' तयार करण्यात आले आहे. मतदान दिवशी मतदारांना केंद्रात मोबाईल घेऊन जाण्यास प्रतिबंध करण्यात आला असून मोबाईल जवळ आढळल्यास कारवाई करण्यात येणार आहे. तालुक्याती संवेदनशील केंद्राची नोंद नसून कोणत्याही केंद्रावर कायदा सुव्यवस्था स्थिती अबाधित रहावी यासाठी पुरेसा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. संपूर्ण निवडणूक प्रक्रियेवर नियंत्रण ठेवण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाने मंगळवेढा तालुक्यासाठी अपर जिल्हाधिकारी राहुल पाटील यांची निवडणूक निरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली असून ते विविध मतदान केंद्रांना भेटी देणार आहेत. मतदान दिनांक ७ फेब्रुवारी रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत होणार असून या निवडणुकीत मतदारांनी मोठ्या संख्येने निष्पक्ष व निर्भयपणे मतदान करावे असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी शिल्पा ओसवाल व सहायक निवडणूक निर्णय अधिकारी मदन जाधव यांनी केले आहे.

# फायटर, लोखंडी पाईपने व लाथाबुक्क्यांनी एकास मारहाण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ फेब्रुवारी-**

मागे झालेल्या वादाच्या कारणावरून एकाला सात जणांनी मिळून फायटरने, लोखंडी पाईपने व लाथा बुक्क्यांनी मारहाण करण्यात आली.

आयान जमील बागवान वय २० रा. बेगम पेठ, सोलापूर हा दि. ५ फेब्रुवारी रोजी पंचकट्टा हनुमान मंदिर समोर, मागे झालेल्या वादाच्या कारणावरून साबीर अशपाक बागवान व इतर ६ जणांनी मिळून फायटरने, लोखंडी पाईपने व लाथा बुक्क्यांनी मारहाण केल्याने त्याला डोक्यात जखम व सर्वांगास मुक्कामार लागल्याने त्याला शासकीय रुग्णालयात नातेवाईक सलीम बागवान यांनी दाखल केले. अशी नोंद पिलीज सिविल पोलीस चौकीत झाली आहे.

# महाराजांच्या स्वराज्यसंकल्पनेत पूर्णपणे न्हाऊन निघालेला माणूस म्हणजे 'बहिर्जी'

## प्रिसिजन वाचन अभियानात 'तो बहिर्जी होता' कार्यक्रमातून बहिर्जी नाईकांच्या कार्यावर कलात्मक प्रकाश

## सोलापूरकरांनी अनुभवला अंगावर शहारे आणणारा इतिहास

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ फेब्रुवारी-**

स्वराज्य उभं राहत असताना रणांगणाइतकंच महत्त्वाचं असलेलं, पण इतिहासाच्या पानांमध्ये क्वचितच नोंद झालेलं एक मौनातील सामर्थ्य म्हणजे बहिर्जी नाईक. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्वराज्यसंकल्पनेत पूर्णपणे मिसळलेला, विचार, योजना आणि धाडस यांचा अद्भुत संगम म्हणजे बहिर्जी अशी सखोल मांडणी प्रिसिजन वाचन अभियानाच्या विशेष कार्यक्रमात करण्यात आली.

एकीकडे सनई, तुतारी, तलवारी, घोड्यांचे आवाज तर दुसरीकडे तोफांचा गडगडाट सोबतीला मावळ्यांचा जयघोष अशा भारवणाऱ्या वातावरणात आनंद देशपांडे यांनी तो बहिर्जी होता या पुस्तकातील १२ कथा श्रोत्यांच्या पुढ्यात मांडल्या आणि जणू निर्मल कुमार फडकुले सभागृहात इतिहास जागा झाला.






प्रिसिजन फाउंडेशनच्या वतीने गुरुवारी, ५ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी ६.२५ वाजता, सोलापूर येथील डॉ. निर्मलकुमार फडके सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या तो बहिर्जी होता या विशेष कार्यक्रमात बहिर्जी नाईक यांच्या पराक्रमाचा आणि व्यक्तिमत्त्वाचा कलात्मक मागोवा घेण्यात आला.या कार्यक्रमात ॲड. आनंद रा. देशपांडे लिखित तो बहिर्जी होता या संकल्पनेवर आधारित सादरीकरण झाले. यामध्ये लेखक आनंद देशपांडे आणि कौस्तुभ गोडबोले यांनी पुस्तकातील निवडक १२ कथांचे प्रभावी अभिवाचन केले. या अभिवाचनातून बहिर्जी नाईक केवळ एक व्यक्ती नसून, महाराजांच्या विचारविश्वातील एक अविभाज्य श्वास कसे होते, हे रसिकांसमोर उलगडत गेले. बहिर्जींचं कार्य हे एखाद्या खात्यापुरतं मर्यादित नव्हतं. हे महाराज आणि बहिर्जी यांच्यातील अतूट नातं होतं, असे स्पष्ट करताना वक्त्यांनी सांगितले की, मोहिमेची आखणी, अपयशाची शक्यता, पर्यायी निर्णय आणि संकटसमयीचा मार्ग या साऱ्यांची सूक्ष्म रणनीती बहिर्जी नाईक यांच्याकडे असे. बहिर्जींनी काय केलं हे सर्वांना माहीत आहे, पण कसं केलं, हे फार थोड्यांना ठाऊक आहे, असे मत आनंद देशपांडे यांनी मांडले.

यावेळी कौस्तुभ गोडबोले म्हणाले, शिवाजी हा तीन अक्षरी मंत्र मनापासून जगणारा माणूस म्हणजे आनंद देशपांडे. त्यांच्या शब्दांतून इतिहासाबद्दलची आस्था आणि बहिर्जींच्या कार्याविषयीचा आदर प्रकर्षाने जाणवत होता.कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रिसिजन फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ. सुहासिनी शहा यांनी मान्यवरांचे स्वागत केले. आनंद देशपांडे यांचा परिचय प्रिसिजनचे जनसंपर्क अधिकारी माधव देशपांडे यांनी करून दिला, तर प्रास्ताविक विनायक दुदगी यांनी केले. इतिहास, साहित्य आणि वाचन चळवळीशी नातं सांगणाऱ्या रसिकांसाठी हा कार्यक्रम केवळ एक सादरीकरण न राहता, स्वराज्याच्या अदृश्य शिल्पकाराला दिलेला जिवंत मानवंदनाच ठरला.

# बायकोला सिगारेटचे चटके देणाऱ्या जावयाचा खुनप्रकरणी सासु, मेव्हणा निर्दोष

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ फेब्रुवारी-**

बायकोला सिगारेटचे चटके देणाऱ्या जावयाचा खुनप्रकरणी सासु व मेव्हण्याची जिल्हा व सत्र न्यायाधिश मनोज शर्मा यांनी निर्दोष मुक्तता केली आहे.

याची हकीकत अशी मोहोळ येथील क्रांती नगरमध्ये १७ जून २०१९ रोजी दुपारी १च्या सुमारास व्यसनी जावई राजेसाब पठाण (४०) याला शिवीगाळ करुन डोक्यात लाकडी दांडके मारुन खुन केल्याच्या आरोपावरुन सासु उस्मानबी रमजान शेख (५५), मेव्हणा महिबुब रमजान शेख (२४) रा. मोहोळ यांचेविरुध्द भरण्यात आलेल्या खटल्याची सुनावणी जिल्हा व सत्र न्यायाधिश मनोज शर्मा यांचेसमोर झाली होती. मयत राजेसाब पठाण (मुळ रा. कुरनूर ता. अक्कलकोट) हा त्याच्या सासुरवाडीला क्रांती नगर, मोहोळ येथे राहत होता. त्याला सर्व प्रकारचे व्यसने होती. त्याचप्रमाणे तो पत्नीचा सिग्रेटचे चटके देऊन छळ करत होता. त्याच्या छळाला कंटाळून त्याची बायको घरातुन निघुन गेल्याने तो एकटा राहत असल्याने तु पण घर सोडून जा. आमचे घर खाली कर असे त्याची सासु व मेव्हणा म्हणत होते. त्या कारणावरुन झालेल्या भांडणात सासुने व मेव्हण्याने त्यास शिवीगाळ करुन मारहाण केली व डोक्यात लाकडी दांडके मारुन खून केला असे सरकार पक्षाचे म्हणणे होते.

सुनावणीवेळी आरोपीचे वकील ॲड. जयदीप माने यांनी आपल्या युक्तिवादामध्ये मयतास फेपरे येत होती आणि घटने दिवशी फेपरे येऊन पडल्याने त्याच्या डोक्याला मार लागला. परंतु आठ दिवसाच्या विलंबानंतर खोटे नेत्र साक्षीदार उभा करुन आरोपींना गुंतवलेले आहे. नेत्र साक्षीदारांच्या जबाबांवर विश्वास ठेवणे धोक्याचे आहे असा युक्तिवाद न्यायालयात केला. या खटल्यात आरोपीतर्फे ॲड. जयदीप माने, ॲड. आर. एस. शेख (मोहोळ), ॲड. प्रणित जाधव यांनी तर सरकारतर्फे ॲड. आनंद कुर्डूकर यांनी काम पाहिले.

# घरफोडीचे १० गुन्हे उघडकीस, सराफ कारागिरास अटक

## १५० ग्रॅम चांदी व ११ ग्रॅम वजनाचे सोने, १ मोटार सायकल जप्त

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ फेब्रुवारी-**

पंढरपुर दारोड्यातील पाहिजे आरोपीस अटक करून १० घरफोडी चोरीचे गुन्हे उघड करत १५० ग्रॅम चांदी व ११ ग्रॅम वजनाचे सोने, १ मोटार सायकल असे एकुण २ लाख ७८ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आले. चोरीचा दागिने स्विकारणारा सराफ कारागिरास सोलापूर ग्रामीण पोलिसांनी अटक केली.

दि. १३ नोव्हेंबर २०२५ रोजी माळशिरस पोलीस ठाणे हद्दीत उंबरे दहिगाव या गावातील वाघमोडे वस्ती येथे अज्ञात चोरटयाने चार घरामध्ये घरफोडी चोरी करून सोने चांदीचे दागिणे व रोख रक्कम चोरून नेले होते. त्यावरून माळशिरस पोलीस ठाणे गुरनं ५८९/२०२५ बीएनएस-२०२३, क. ३३१ (४), ३०५ (अ) प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

गोपनिय माहिती मिळाली की, पंढरपुर ग्रामीण पो. ठाणे ४७/२०२५, या दरोडयाच्या गुन्हयामधील पाहिजे आरोपी नामे रोहित दिपक पवार याने



उंबरे दहिगांव येथील घरफोडी केली आहे. त्यानंतर सपोनि /भिमगोंडा पाटील व त्यांचे पथकाने आरोपीची गोपनिय माहिती काढुन आरोपी नामे रोहित दिपक पवार, वय २५ वर्षे, रा. नउचारी पदमावती नगर, अकलुज ता. माळशिरस, जि. सोलापूर या अटक करून त्याचेकडे तपास केला असता त्याने सदरचा गुन्हया त्याचे साथीदार भोलेनाथ उर्फ शन्या चंद्रकांत भोसले रा. चाकोरे अकलुज, भैय्या शकील शेख रा. विजबोर्ड जवळ वेळापुर याचे सोबत मिळुन केल्याची कबुली दिली. आरोपींकडे तपास करता त्यांनी त्याचे साथीदारासह गुन्हे केल्याची कबुली दिली आहे.

आरोपी दिपक पवार यांचेकडुन गुन्हयात चोरीस गेल्या मुद्देमाल पैकी १५० ग्रॅम चांदीचे, ११ ग्रॅम सोन्याचे दागिणे व रोख रक्कम १२,०००/- रू. तसेच गुन्हयात वापरलेले १ मोटार सायकल असा एकुण १,४७,४००/- रू त्याची (बाजार भाव प्रामणे) एकुण २,७८,७००/- रू किमंतचे सोन्या चांदीचे दागिणे आरोपी यांचेकडुन हस्तगत करण्यात आले.

आरोपी दिपक पवार याने त्याचे वाटणीस आलेला मुद्देमालापैकी १२ तोळे सोन्याचे दागिणे सोनार कारागिर वैभव दिगंबर कुलथे रा. देशमुख गल्ली अकलुज यास विक्री केले असल्याचे सांगितलेने सदर गुन्हयात बीएनएस - २३ चे कलम ३१७(२), ३(५) प्रमाणे कलम वाढ करून आरोपी नामे वैभव दिगंबर कुलये रा. देशमुख गल्ली अकलुज यास दि. ०२ फेब्रुवारी २०२६ रोजी अटक करण्यात आली. सदर गुन्हयाचा तपास इकडील सहा. पोलीस निरीक्षक, भिमगोंडा पाटील ने. स्थानिक गुन्हे शाखा, सोलापूर ग्रामीण हे करीत आहेत.

सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक, अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधीक्षक, प्रितम यावलकर, वरीष्ठ पोलीस निरीक्षक, संजय जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली सहा. पोलीस निरीक्षक, भिमगोंडा पाटील व पथकातील, पोलीस हवालदार सलीम बागवान, विजयकुमार भरले, पोकों/ सागर ढोरे-पाटील, प्रमोद शिंपाळे, यश देवकते, समर्थ गाजरे, योगेश जाधव, चापोकों/ दिलीप थोरात तसेच सायबर पो. ठाणे कडील पोहवा / व्यंकटेश मोरे यांनी बजावली.

# १ पिस्टल, २ जिवंत काडतुससह पन्नास हजारांचा मुद्देमाल हस्तगत

## सोलापूर ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ फेब्रुवारी-**

आदर्श आचारसंहितेच्या कालावाधीमध्ये ०१ देशी बनावटीचे पिस्टल व २ जिवंत काडतुसे जप्त करून एकुण ५०,४०० रू किंमतीचे मुद्देमाल ग्रामीण गुन्हे शाखेच्यावतीने हस्तगत करण्यात आला आहे.

स्थानिक गुन्हे शाखा, सोलापुर ग्रामीण कडील पोसई कुलदिप सोनटक्के व पथक असे बार्शी पोलीस ठाणे अवारात हजर असताना पथकातील सपोफौ प्रकाश कारटकर यांना गोपनीय बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, विपुल यादव, रा. वाणी प्लॉट, बार्शी हा स्वतः जवळ गावठी पिस्टल बाळगून वाणी प्लॉट परीसरात फिरत आहे. त्याठिकाणी गेल्यानंतर एक इसम उभारलेला दिसला, बातमी प्रमाणे संशय आल्याने त्यास ताब्यात घेवून नाव, पत्ता विचारले असता विपुल शिवाजी यादव वय २९ वर्षे, रा. वाणी प्लॉट, बार्शी, ता. बार्शी जि. सोलापूर असे नाव असल्याचे सांगितले. सदर इसमाची अंग झडती घेतली असता त्याच्या ताब्यात पॅन्टीत खवलेले १ देशी बनावटी पिस्टल व २ जिवंत काडतुसे मिळुन आल्याने त्याच्या विरुध्द सहा. पोलीस उपनिरीक्षक प्रकाश कारटकर यांनी बार्शी शहर पोलीस ठाणे येथे सरकारतर्फे फिर्याद दिली.



बार्शी शहर पोलीस ठाणे गुरनं ५७/२०२६ भारतीय शस्त्र अधीनियम १९५९ चे कलम ३, २५ व म.पो. अधि. १९५१ चे कलम १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयात १ देशी बनावटी पिस्टल व २ जिवंत काडतुसे असे एकुण ५०,४००/- रू किंमतीचे मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. ही कामगिरी अतुल कुलकर्णी, पोलीस अधीक्षक, प्रितम यावलकर, अपर पोलीस अधीक्षक, यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि संजय जगताप, स्थानिक गुन्हे शाखा, सोलापूर ग्रामीण यांचे नेतृत्वाखाली पोसई कुलदिप सोनटक्के, सहा. पोलीस उपनिरीक्षक प्रकाश कारटकर, पोलीस हवालदार सलीम बागवान, विरेश कलशेट्टी, धनराज गायकवाड, पोलीस कॉन्स्टेबल प्रमोद शिंपाळे, अन्वर अत्तार, योगेश जाधव यांनी बाजवली आहे.



ज्यांच्याकडे सत्ता आहे त्यांना मतदान केले तर निधी मिळेल. ज्यांच्याकडे सत्ताच नाही त्यांना मतदान केले तर त्यांच्याकडून कामे होणार आहेत का? उद्या अन्य पक्षाचे उमेदवार निवडून गेले तर त्याचा काय उपयोग? कोण आहे त्यांच्याकडे?
**नीतेश राणे**, मंत्री


# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

शुक्रवार, ६ फेब्रुवारी २०२६ ३




एक मुस्लिम असण्यासोबतच एक भारतीय नागरिक म्हणून, 'केरळ स्टोरी'सारखे चित्रपट पाहून स्वतःचा अपमान झाल्यासारखे आणि दुःखी वाटते. समस्या फक्त काय घडत आहे ही नाही, तर लोक ते शांतपणे स्वीकारत आहेत ही आहे.
**सादिया खातीब**, अभिनेत्री

# भारताने दबावाला बळी पडू नये

## रशियाचा अमेरिकेवर निशाणा, कोणत्याही देशाकडून तेल खरेदीची मोकळीक

**मॉस्को, ५ फेब्रुवारी**

भारतीय तेल शुद्धीकरण प्रकल्प रशियन कच्च्या तेलाची आयात पूर्णपणे थांबवू शकत नाहीत. तेल खरेदीसाठी भारतीय कंपन्यांचे करार झालेले आहेत. दोन्ही देशांचे संबंध बळकट असून



कुणाच्याही दबावाला बळी न पडता भारताने तेल खरेदी करण्याचा निर्णय घ्यावा. भारत कोणत्याही देशाकडून तेल खरेदी करण्यास मोकळा आहे, अशा शब्दात रशियाच्या परराष्ट्र मंत्रालयाने आपली भूमिका स्पष्ट केली.

भारत-अमेरिका परस्पर व्यापार कराराची माहिती देताना राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी भारताने रशियाकडून तेल खरेदी थांबविल्याचे स्पष्ट करीत यापुढे अमेरिका आणि व्हेनेझुएला कच्चा तेलाची विक्री करणार असल्याचा दावा केला होता. भारताने रशियन तेलाची खरेदी थांबविल्याचे अधिकृत घोषणा केलेली नाही. अशातच रशियाच्या परराष्ट्र मंत्रालयाच्या प्रवक्त्या मारिया झाखारोवा यांनी गुरुवारी पत्रपरिषदेत म्हटले की, अमेरिकेच्या दबावामुळे भारत रशियन तेल खरेदी थांबवेल यावर आमचा विश्वास नाही. अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांनी एका स्वतंत्र देशाला सूचना करणे यात नवीन नाही, त्यांना माध्यमांत चर्चेत राहण्याची सवय आहे.

भारत-पाकिस्तान संघर्ष रोखल्याचा त्यांनी दावा केला होता, मात्र भारताने कधीही हे स्वीकार केलेले नाही. रशियन तेलाची खरेदी करणे दोन्ही देशांसाठी फायदेशीर आहे आणि आंतरराष्ट्रीय ऊर्जा बाजारपेठेत स्थिरता राखण्यास मदत करते. आम्ही भारतातील आमच्या भागीदारांसह या क्षेत्रात जवळचे सहकार्य सुरू ठेवण्यास तयार आहोत.

**... तर पुरवठा साखळी विस्कळीत**

तेल खरेदी करणाऱ्या जगातील मोठ्या पाच देशांत भारत येतो. रशियाच्या तेलावर बंदी घातल्यास जागतिक पुरवठा साखळी विस्कळीत होवू शकते. भारत कोणत्याही देशाकडून कच्चे तेल खरेदी करण्यास पूर्णपणे मुक्त आहे आणि विविधीकरणाच्या त्यांच्या निर्णयात काहीही नवीन नाही. रशिया हा भारताला तेल आणि पेट्रोलियम उत्पादनांचा एकमेव पुरवठादार नाही. भारत नेहमीच इतर देशांकडून ही उत्पादने खरेदी करत आला असेही झाखारोवा म्हणाल्या. (वृत्तसंस्था)

### भारताचे आर्थिक नुकसान होणार : युशकोव्ह

रशियाचे तेल खरेदी थांबवण्याच्या भारताच्या निर्णयाबाबत कोणतेही अधिकृत विधान किंवा माहिती मिळालेली नाही. अमेरिकेने निर्यात केलेले शेल ऑइल हलक्या दर्जाचे आहे. याउलट, रशिया जड आणि सल्फरयुक्त युरल्स ऑइल पुरवतो. भारतीय रिफायनरीजच्या रचनेनुसार, त्यांना अमेरिकन ऑइल इतर ग्रेडमध्ये मिसळावे लागेल, ज्यामुळे भारतीय कंपन्यांना आर्थिक नुकसान होणार असल्याचे रशियाच्या राष्ट्रीय ऊर्जा सुरक्षा निधीचे प्रमुख तज्ज्ञ इगोर युशकोव्ह यांनी सांगितले.

### व्हेनेझुएला भारताचा भागीदार : रणधीर जयस्वाल



व्हेनेझुएलाकडून तेल खरेदी करण्यात कोणतीही अडचण नाही, तो ऊर्जा क्षेत्रातील व्यापार आणि गुंतवणूक या दोन्ही बाबतीत भारताचा दीर्घकालीन भागीदार आहे. आम्ही २०१९-२० पर्यंत व्हेनेझुएलाकडून वायू आणि कच्चे तेल आयात करत होतो आणि अमेरिकेच्या निर्बंधामुळे खरेदी थांबवावी लागली असे परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी पत्रपरिषदे सांगितले. मागणी आणि जागतिक बाजारातील उपलब्धतेनुसार तेल खरेदीचा निर्णय घेण्यात येत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.



जम्मू-काश्मीरमधील किश्तवाड जिल्ह्यात अतिरेक्यांविरोधातील शोधमोहीम जोरात सुरू आहे. बुधवारी चकमकीत एक अतिरेकी ठार झाला असून आणखी काही जंगलात लपून असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे

# अजित पवारांच्या अस्थींचे हरिद्वारमध्ये विसर्जन

## राष्ट्रवादी काँग्रेसच्या युवा नेत्याने गंगेत केल्या विसर्जित



**हरिद्वार, ५ फेब्रुवारी**

महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अस्थींचे हरिद्वार येथील व्हीआयपी घाटावर विसर्जन करण्यात आले आहे. राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष धीरज शर्मा अस्थी कलश घेऊन हरिद्वारला पोहोचले होते आणि त्यांनीच वैदिक विधी-विधानानुसार विसर्जन केले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे अनेक नेते उपस्थित होते, तर पवार कुटुंबातील कोणताही सदस्य कार्यक्रमात सहभागी झाला नाही.

राष्ट्रवादी काँग्रेसनुसार, अजित पवारांच्या अस्थी देशातील प्रमुख नद्यांमध्ये आणि महत्त्वाच्या धार्मिक स्थळांवर विसर्जित केल्या जातील, जेणेकरून देशभरातील समर्थक आपल्या नेत्याला श्रद्धांजली अर्पण करू शकतील. उत्तराखंडमधील हरिद्वारमध्ये विसर्जनानंतर अस्थिकलश यात्रा उत्तरप्रदेशातील प्रयागराज (संगम) आणि वाराणसी (मणिकर्णिका घाट) येथे पोहोचेल. यानंतर बिहारची राजधानी पटना येथे कार्यक्रम आयोजित केला जाईल. ही यात्रा पुढे पंजाब, जम्मू-काश्मीर, झारखंडमधून जात तामिळनाडूतील कन्याकुमारीपर्यंत जाईल. या काळात १० हून अधिक राज्यांमध्ये शोकसभा आणि प्रार्थना कार्यक्रम आयोजित केले जातील. (वृत्तसंस्था)

# शत्रू मालमत्ता विकून कमावले २,९३० कोटी

## गृह राज्यमंत्री बंडी संजय कुमार यांची संसदेत माहिती

**नवी दिल्ली, ५ फेब्रुवारी**

जंगम आणि अचल शत्रू मालमत्ता विकून २८ जानेवारीपर्यंत २,९३० कोटी रुपये सरकारच्या तिजोरीत जमा झाले. १९४७ ते १९६२ दरम्यान पाकिस्तानी आणि चिनी नागरिकत्व घेतलेल्या लोकांनी देशात सोडलेल्या मालमत्तांचा लिलाव करण्यात आल्याची माहिती गृह राज्यमंत्री बंडी संजय कुमार यांनी राज्यसभेत एका प्रश्नाच्या लेखी उत्तरात दिली.

शत्रू मालमत्तांची विल्हेवाट शत्रू मालमत्ता कायदा, १९६८ आणि त्याअंतर्गत बनवलेल्या नियम आणि मार्गदर्शक तत्त्वांनुसार करण्यात आली. शत्रू मालमत्तांची ओळख करणे आणि त्यांच्या विक्रीसाठी सरकारने राज्यांमध्ये जिल्हाधिकाऱ्यांच्या नेतृत्वात समिती गठित केली. महापालिका भागात निरीक्षक आणि तहसीलदारांच्या देखरेखीत लिलावाची प्रक्रिया राबवली जाते. उपसचिव दर्जाचे अधिकारी संबंधित दिशानिर्देश जारी करतात. शत्रू मालमत्ता खरेदी करणाऱ्यांना करात सवलत दिली जाते, तसेच लिलावात ठरलेली रक्कम भरण्यासाठी १२० दिवसांचा कालावधी निश्चित करण्यात आला, यापूर्वी हा कालावधी २१ दिवसांचा होता. मालमत्तेचे मूल्यांकन जिल्हा दंडाधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखालील समितीद्वारे केले जाते. मूल्यांकन अहवाल शत्रू संपत्ती विल्हेवाट समितीसमोर ठेवला जातो, जी शत्रू संपत्तीच्या विल्हेवाटीबाबत सरकारला शिफारसी करते. (वृत्तसंस्था)

# वारंवार यूपीएससी परीक्षा देण्याचा मार्ग बंद

## नवीन नियम २०२६ पासून लागू ● रँक सुधारण्याची संधी फक्त एकदाच

**नवी दिल्ली, ५ फेब्रुवारी**

केंद्रीय लोकसेवा आयोग (यूपीएससी) ने २०२६ च्या नागरी सेवा परीक्षेची अधिसूचना नुकतीच जारी केली आहे. यावेळेपासून पात्रतेशी संबंधित काही नियमांमध्ये बदल करण्यता आले आहेत. आता सेवेत असताना वारंवार यूपीएससी परीक्षा देण्याचे मार्ग बंद झाले आहेत.

आयोगाने यावेळी ९३३ पदांसाठी भरती जाहिरात प्रसिद्ध केली आहे. अर्ज करण्याची अंतिम तारीख २४ फेब्रुवारी आहे. परीक्षा केंद्रात चेहरा पडताळणी (फेस ऑथेंटिकेशन)नंतरच प्रवेश दिला जाईल. यावेळी प्रयत्न आणि पात्रतेशी संबंधित नियमांमध्येही मोठा बदल करण्यात आला आहे. यानुसार, आता निवड झाल्यानंतर पुन्हा परीक्षा देण्याचे स्वातंत्र्य पूर्वीसारखे राहणार नाही. नवीन तरतुदींमध्ये सेवेत असताना वारंवार परीक्षा देण्याचा मार्ग बंद करण्यात आला आहे. तर, आयएएस आणि आयएफएस संदर्भात जुने नियम तसेच ठेवण्यात आले आहेत. निवडलेल्या अधिकाऱ्याला एकदा कामगिरी सुधारण्याची संधी मिळेल.

उदाहरणार्थ, जर एखाद्याची २०२६ मध्ये आयपीएसमध्ये निवड झाली, तर तो २०२७ मध्ये कामगिरी सुधारण्यासाठी परीक्षा देण्यास पात्र असेल. त्यानंतर जर त्याला परीक्षा द्यायची असेल, तर त्याला सेवेतून राजीनामा द्यावा लागेल.

आधीच आयपीएसमध्ये निवडलेले किंवा नियुक्त उमेदवार सीएसई २०२६ पासून पुन्हा आयपीएस मिळवू शकणार नाहीत. तर, प्रीलिम्सनंतर पण मेन्सपूर्वी जर आयएएस किंवा आयएफएस बनले, तर मेन्स लिहिण्याची परवानगी मिळणार नाही. (वृत्तसंस्था)

### यूपीएससी २०२६ मध्ये प्रथमच होणारे बदल...

- सिव्हिल सर्व्हिस एक्झाम-२०२६ मध्ये जर ग्रुप-ए किंवा आयपीएस मिळत असेल, तर उमेदवाराला फक्त एकदाच म्हणजे सीएसई-२०२७ मध्ये रँक सुधारण्याची संधी मिळेल. संधी तेव्हाच मिळेल जेव्हा उमेदवाराला प्रशिक्षण जॉईन न करण्याची एक वेळची (वन टाइम एक्झम्प्शन) सूट मिळेल.
- सूट फाउंडेशन कोर्सपर्यंत मर्यादित असेल. जर उमेदवाराने प्रशिक्षण जॉईन केले नाही आणि सूटही घेतली नाही, तर सीएसई-२०२६ आणि सीएसई-२०२७ या दोन्हीच्या आधारावर मिळालेली सेवा आपोआप रद्द होईल.
- सीएसई २०२६ मधून निवडलेले उमेदवार सीएसई २०२७ देऊ इच्छित असतील, तर परवानगी आवश्यक असेल. सीएसई २०२८ किंवा त्यानंतर परीक्षा देण्यासाठी राजीनामा अनिवार्य असेल.

## चित्रपट वार्ता

### प्रथमच गृहिणीच्या भूमिकेत आलिया




**मुंबई :** अभिनेत्री आलिया भट्ट लवकरच 'हाऊसवाईफ' या चित्रपटाचा भाग असेल. हा एक नातेसंबंधांवर आधारित चित्रपट आहे आणि 'दृश्यम २'चे दिग्दर्शक अभिषेक पाठक याची निर्मिती करत आहेत. आलिया भट्ट या चित्रपटात गृहिणीची भूमिका साकारणार आहे. चित्रपटात मुख्य अभिनेता म्हणून राजकुमार रावसोबत चर्चा सुरू आहे, परंतु याबाबत अद्याप कोणतीही अधिकृत घोषणा झालेली नाही. आलिया भट्ट केवळ मुख्य भूमिकाच साकारणार नाही, तर तिच्या एटरनल सनशाईन प्रॉडक्शन्स या प्रोडक्शन कंपनी अंतर्गत या चित्रपटाची सह-निर्माती देखील असेल. ती या प्रोजेक्टमध्ये अभिषेक पाठकच्या पॅनोरमा स्टुडिओजसोबतही सहकार्य करेल. चित्रपटाचे चित्रीकरण यावर्षी ऑगस्ट-सप्टेंबरमध्ये सुरू होण्याची शक्यता आहे.

### आता समोरासमोर येणार सनी देओल-अक्षय खन्ना




**मुंबई :** नेटफ्लिक्सने त्यांच्या आगामी ओरिजिनल लीगल ड्रामा सिरीज 'आयकेकेए' ची घोषणा केली आहे. या सीरिजमध्ये सनी देओल आणि अक्षय खन्ना पहिल्यांदाच एकमेकांसमोर दिसणार आहेत. कथा एका प्रसिद्ध आणि प्रामाणिक वकिलाभोवती फिरते, ज्याला नाइलाजाने एका खून खटल्यातील आरोपीचा बचाव करावा लागतो. विशेष बाब म्हणजे, हाच आरोपी तो व्यक्ती आहे, ज्याचे करिअर वकिलाने भूतकाळात उद्ध्वस्त केले होते. या सीरिजचे दिग्दर्शन सिद्धार्थ पी. मल्होत्रा यांनी केले आहे, तर याची पटकथा अल्थिया कौशल आणि मयंक तिवारी यांनी लिहिली आहे. सनी देओल आणि अक्षय खन्ना यांच्या व्यतिरिक्त दिया मिर्झा, तिलोत्तमा शोम, संजीदा शेख, शिशिर शर्मा आणि आकांक्षा रंजन हे कलाकार या सीरीजमध्ये महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आहेत.

### मराठी चित्रपटही थेट ओटीटीवर



**मुंबई :** हिंदीप्रमाणे मराठी चित्रपटही थियेटरमध्ये न जाता थेट ओटीटीवर प्रदर्शित होत आहेत. शुक्रवारी ६ फेब्रुवारी रोजी 'आता वेळ झाली' हा चित्रपट अल्ट्रा झकास ओटीटीवर प्रदर्शित होणार आहे. यात दिलीप प्रभावळकर आणि रोहिणी हट्टंगडी यांच्यासारखे दमदार कलाकार मुख्य भूमिकेत आहेत. हा चित्रपट अनंत महादेवन यांनी दिग्दर्शित केला असून तेच याचे सहलेखकही आहेत. 'आता वेळ झाली' ही एका वृद्ध दाम्पत्याची कथा आहे. जिथे वाढतं वय, आजारपण, एकमेकांवरील प्रेम आणि आयुष्याचा शेवट सन्मानाने निवडण्याचा प्रश्न समोर येतो. कोणताही दिखावा न करता वेधक मांडणीतून हा चित्रपट प्रेक्षकांना नक्कीच अंतर्मुख करेल, असे दिग्दर्शक म्हणाले. यात भरत दाभोळकर, सुरेश विश्वकर्मा, स्मिता तांबे, जयवंत वाडकर आणि अभिनव पाटकर यांच्याही भूमिका आहेत. या चित्रपटाने आतापर्यंत अनेक चित्रपट महोत्सव गाजवले असून सर्वच ठिकाणी याला प्रशंसा मिळाली आहे.

# 'डॉन'कडे भावाच्या अंत्येष्टीला जाण्यासाठीही पैसे नाहीत!

**मुंबई :** कुख्यात आंतरराष्ट्रीय गुन्हेगार अबू सालेम याला त्याच्या भावाच्या निधनानंतरच्या धार्मिक विधींकरिता गावी जाण्यासाठी पॅरोल मंजूर होईल की नाही, हा प्रश्न उच्च न्यायालयाच्या दरबारात चर्चेचा विषय ठरला आहे. सालेमला पॅरोल देण्यासाठी न्यायालयाने स्पष्ट केले की, प्रवासादरम्यानच्या पोलिस संरक्षणाचा खर्च तो उचलण्यासाठी तयार नसेल, तर त्याची याचिका फेटाळली जाईल. वास्तविकता ही आहे की, सालेमची आर्थिक परिस्थिती हा खर्च उचलण्याइतकीही बळकट राहिलेली नाही. सालेमने भाऊ अबू हकीम अन्सारी यांच्या चाळीसाव्या विधीसाठी आणि कुटुंबीयांना भेटण्यासाठी १४ दिवसांची पॅरोल रजा मागितली होती. परंतु, तुरुंग प्रशासनाने हा अर्ज फेटाळल्यावर सालेमने उच्च न्यायालयाचा रस्ता धरणे अपेक्षित ठरले. न्यायालयाने सुरुवातीला प्रवासाचा वेळ वगळून दोन दिवसांचा पॅरोल मंजूर केला. नंतर ही मुदत चार दिवसांपर्यंत वाढवली, परंतु त्यासाठी पोलिस संरक्षणाचा खर्च सालेमने उचलावा लागेल, असे आदेश दिले.

सालेमच्या वकिल फरहाना शाह यांनी न्यायालयासमोर सांगितले की, सालेमची आर्थिक परिस्थिती बिकट आहे आणि अनेक वर्षांपासून तुरुंगात असल्यामुळे पोलीस संरक्षणाचा खर्च वहन करणे त्याच्यासाठी अशक्य आहे. त्यांनी असा देखील दावा केला की, सालेमला याआधी दोन्ही आईंच्या निधनानंतर पॅरोल मिळाल्यानंतर १० ते १२ पोलिस त्याच्या संरक्षणासाठी ठेवले होते, परंतु त्या वेळी त्याच्याकडून कोणताही खर्च वसूल केला गेला नव्हता. सर्वत्र तपास यंत्रणांनी सालेमच्या आंतरराष्ट्रीय पातळीवरील गुन्हेगारी इतिहासामुळे कायदा आणि सुव्यवस्थेचा धोका व्यक्त केल्याचे न्यायालयाने लक्षात घेतले. खंडपीठाने विचारले की, सालेमला किती पोलिस संरक्षण आवश्यक आहे, हे तुम्ही कसे ठरवू शकता? तसेच, जर सालेम पोलिस संरक्षणाचा खर्च उचलण्यास तयार नसेल, तर पॅरोल मंजूर होऊ शकणार नाही, असे स्पष्ट निर्देश खंडपीठाने दिले.

# आखाती देशांसोबतही व्यापार करार

## पीयूष गोयल यांची माहिती, अटी-शर्ती मान्य, मसुद्यावर स्वाक्षरी




**नवी दिल्ली, ५ फेब्रुवारी**

आखाती देशांतील सहा देशांचा समूह असलेली संघटना गल्फ कोऑपरेशन कौन्सिल अर्थात् जीसीसीसोबत भारताची मुक्त व्यापार करारावर सहमती झाली आहे. दोन्ही बाजूने अटी-शर्ती मान्य झाल्या असून, मार्च महिन्यांत करारावर स्वाक्षरी होणार आहे. मजबूत द्विपक्षीय मुक्त व्यापार करार दोन्ही पक्षांसाठी फायदेशीर ठरेल असे केंद्रीय वाणिज्य मंत्री पीयूष गोयल यांनी गुरुवारी सांगितले.

जीसीसीमध्ये संयुक्त अरब अमिराती, सौदी अरब, कतार, कुवेत, बहरीन आणि ओमान यांचा समावेश आहे. एक्सवरील पोस्टमध्ये गोयल यांनी म्हटले की, युरोपियन युनियनसोबत अलिकडेच झालेला करार आणि त्यानंतर अमेरिकेसोबतच्या व्यापार करारांनंतर, भारताची जीसीसीसोबत मुक्त व्यापार करारावर सहमती झाली आहे. भारत आणि जीसीसी देशांनी कराराच्या अटींवर स्वाक्षरी केली, ज्यामुळे औपचारिक वाटाघाटीचा मार्ग मोकळा झाला आहे. यापूर्वी, भारत आणि संयुक्त अरब अमिरातीसोबत मे २०२० मध्ये मुक्त व्यापार करारावर स्वाक्षरी झाली आहे, तसेच भारत आणि ओमान यांनी २०२५ मध्ये मस्कत येथे व्यापक आर्थिक भागीदारी करारावर स्वाक्षरी केली आहे. आता जीसीसीसोबत व्यापार कराराचा मार्ग मोकळा झाल्याने भारताच्या निर्यातीला चालना मिळणार आहे. २००६ आणि २००८ मध्ये दोन्ही बाजूंमध्ये व्यापार करारावर चर्चा झाली होती, परंतु त्यावेळी सहमती होऊ शकली नाही. (वृत्तसंस्था)

### मार्चच्या मध्यापर्यंत व्यापार करारावर स्वाक्षरी

भारत आणि अमेरिका मार्च महिन्याच्या मध्यापर्यंत बहुप्रतीक्षित द्विपक्षीय व्यापार कराराच्या पहिल्या टप्प्याव स्वाक्षरी करण्याची शक्यता आहे. यामुळे अमेरिका भारतीय आयातीवरील आयात शुल्क कमी करेल, असे वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी गुरुवारी सांगितले.

या करारावर स्वाक्षरी झाल्यानंतर भारत अमेरिकेतून आयात केल्या जाणाऱ्या काही वस्तूंवरील आयात शुल्क कमी करण्यास सुरुवात करेल. दोन्ही पक्ष द्विपक्षीय व्यापार कराराच्या पहिल्या टप्प्यावरील संयुक्त निवेदनावर ४-५ दिवसांत अंतिम शिक्कामोर्तब करतील. त्यानंतर अमेरिकेद्वारे लावण्यात आलेले शुल्क १८ टक्क्यांपर्यंत खाली येईल.

या दोन्ही देशांनी या आठवड्याच्या सुरुवातीला हा करार अंतिम केला. या करारानुसार अमेरिकेत प्रवेश करणाऱ्या भारतीय वस्तूंवरील शुल्क ५० टक्क्यांवरून १८ टक्क्यांपर्यंत कमी केले जाईल.

# कोळसा खाणीत स्फोट; १८ कामगारांचा मृत्यू

**शिलाँग, ५ फेब्रुवारी**

मेघालयातील पूर्व जैंतिया हिल्स जिल्ह्यातील डोंगराळ ताश्खाई परिसरात असलेल्या बेकायदेशीर कोळसा खाणीत गुरुवारी डायनामाइटचा स्फोट झाला. यात पूर्ण खाण उद्ध्वस्त झाली आणि कामगार ढिगाऱ्याखाली गाडले गेले. आतापर्यंत १८ कामगारांचे मृतदेह आणि दोन जखमींना बाहेर काढण्यात बचावपथकाला यश आहे. पंतप्रधान मोदी यांनी मृतकांच्या कुटुंबीयांना दोन लाखांच्या मदतीची घोषणा केली आहे.

घटनेच्यावेळी ४० पेक्षा अधिक कामगार होते, स्फोटानंतर सर्वच ढिगाऱ्याखाली अडकल्याने मृताका आकडा वाढण्याची शक्यता प्रशासनाने व्यक्त केली. पूर्व जैंतिया हिल्सचे पोलिस अधीक्षक विकास कुमार यांनी वृत्तसंस्थेला घटनेची माहिती देताना सांगितले की, राष्ट्रीय हरित लवादाने पर्यावरण संरक्षणाचा हवाला देत २०१४ मध्ये कोळसा खाणीत उत्खनन करण्यावर बंदी घातली होती. मात्र आदेशाचे उल्लंघन करून खोदकाम सुरूच होते. नेहमीप्रमाणे गुरुवारी कामगार खोदकाम सुरू असताना अचानक डायनामाइटचा स्फोट झाला आणि खाण कोसळली. (वृत्तसंस्था)

# देशात प्रथमच सहकारी टॅक्सी सेवा

## अमित शाह यांच्या हस्ते 'भारत टॅक्सी'चे उद्घाटन

**नवी दिल्ली, ५ फेब्रुवारी**

दोन महिन्यांच्या यशस्वी प्रयोगानंतर केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह यांनी गुरुवारी देशातील पहिली सहकार नेतृत्वातील राईड-हेलिंग मंच दोन महिन्यांच्या यशस्वी प्रयोगानंतर केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह यांनी गुरुवारी देशातील पहिली सहकार नेतृत्वातील राईड-हेलिंग मंच 'भारत टॅक्सी'चे उद्घाटन केले.

ही सेवा सुरुवातीला दिल्ली-एनसीआर आणि गुजरातमध्ये सुरू करण्यात आली. पुढील दोन वर्षांत तिचा विस्तार सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये केला जाईल. हा मंच सुरू केल्यानंतर तीन वर्षांत भारत टॅक्सी संपूर्ण देशभरात, काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत आणि द्वारकेपासून कामाख्यापर्यंत सुरू केली जाईल, असे अमित शाह यांनी सांगितले.

नफ्याची वाटणी भारत टॅक्सीशी संबंधित चालकांसोबत केली जाईल. ग्राहक या मंचावरून कार, तीन-चाकी आणि दुचाकी वाहने बुक करू शकतील. देशातील राईड-हेलिंग सेवा बाजारावर सध्या उबर, ओला आणि रॅपिडोसारख्या काही मोजक्या कंपन्यांचे वर्चस्व आहे.

बहुराज्यीय सहकारी संस्था कायदा-२००२ अंतर्गत नोंदणीकृत आणि ६ जून २०२५ रोजी स्थापित भारत टॅक्सी कमिशन आणि अतिरिक्त शुल्कमुक्त प्रणालीवर चालते. यात चालकांमध्ये नफ्याचे थेट वितरण केले जाते. यामुळे हा मंच विदेशी गुंतवणूकदार आधारित राईड-हेलिंग मंचासाठी एक स्वदेशी पर्याय म्हणून समोर येत आहे.

प्रायोगिक तत्त्वावर ही सेवा सुरू झाल्यापासून तीन लाखांपेक्षा जास्त चालक या मंचावर आले. एक लाखांपेक्षा जास्त वापरकर्त्यांनी नोंदणी केली आणि दिल्ली-एनसीआर तसेच गुजरातमध्ये दररोज दहा हजारांपरेक्षा जास्त राईड्स पूर्ण झाल्या आहेत. (वृत्तसंस्था)




### जगातील सर्वांत मोठी सहकार आधारित मंच

**आठ प्रमुख सहकारी संस्थांच्या पाठिंब्याने या मंचाने २ डिसेंबर रोजी दिल्ली-एनसीआर आणि गुजरातमध्ये प्रायोगिक तत्त्वावर कामकाज सुरू केले. भारत टॅक्सी हे जगातील पहिले आणि सर्वांत मोठे सहकार-आधारित राईड हेलिंग मंच तसेच जगातील सर्वांत मोठा चालक-मालकीचा मोबिलिटी मंच म्हणून उदयास आला आहे.**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## अग्रलेख...

# दुरवस्थेच्या दोन बाजू

कोणत्याही सुविधांमध्ये काहीही अडथळे आले आणि त्याचे रूपांतर संकटात होण्याची चिन्हे दिसू लागली की सरकारी यंत्रणा सहसा सर्वांसाठी एक सामायिक सूचना जारी करतात. ती म्हणजे, आवश्यकता नसेल तर घराबाहेर पडू नका, प्रवास टाळा! असे केले की संकटाची किंवा समस्येच्या गांभीर्याची झळ पोहोचणार नाही आणि संकटाच्या आसपास असण्याची शक्यतादेखील उरणार नसल्याने सर्वांच्या मनातील सुरक्षेची आश्वस्त जाणीव फारसे काही न करतादेखील सुरक्षित राहून सुरक्षा यंत्रणांवरील ताणही कमी होईल हे संबंधितांस माहीत असते. शिवाय, समस्येच्या झळा सोसाव्या लागणार नसल्यामुळे त्याच्या जबाबदारीचे खापर संबंधित यंत्रणांवर फोडण्याची संधीदेखील समाजास मिळणार नाही याचीही खात्री असते. महाराष्ट्राच्या विकासाची मुहूर्तमेढ रोवणारा महामार्ग म्हणून ज्या यशवंतराव चव्हाण द्रुतगती महामार्गाचा अभिमानाने उल्लेख केला जातो, त्या मार्गावर तब्बल दीड दिवस पुणे-मुंबई दरम्यानची वाहतूक एका अपघातामुळे जागच्या जागी थांबली. वाटेवरच्या हजारो वाहनांच्या मैलोगणती रांगांनी रस्ता पूर्ण भरून गेला आणि असंख्य समस्यांच्या भयाने थिजलेली माणसे अक्षरश: हवालदिल झाली. या अपघातस्थळापासून २० किलोमीटर अंतरावर एकाच जागी थांबून ताटकळलेल्या वाहनांस तर पुढे काय झाले आहे तेदेखील नेमके कळत नव्हते. अशा संकटातही, महामार्गावरील टोल वसुली मात्र, पुढे काहीच घडलेले नाही अशा थंडपणाने सुरूच होती. एका विषारी, ज्वलनशील वायूची वाहतूक करणारा टँकर घाटात उलटल्याने वायुगळती सुरू झाली असून पुढे जाणे धोक्याचे आहे हे कळण्यासाठीही अनेक वाहनधारकांना कित्येक तास लागले आणि सुरक्षा यंत्रणांना अपघाताचा सुगावा लागेपर्यंत वाहनांच्या रांगेचे शेपूट मैलामैलाने वाढतच राहिले. लहान मुले, महिला, वृद्ध माणसे, महत्त्वाच्या वा तातडीच्या कामाकरिता मुंबईकडे निघालेले नागरिक, विमान प्रवासाकरिता मुंबई गाठण्याची घाई करणारी माणसे, हातावरचे पोट असलेले कष्टकरी, अशा सर्वांनाच अशा समस्यांचा सरसकट फटका बसत असतो. महागड्या आलिशान गाडीतील धनवंत किंवा एखाद्या मालवाहू गाडीच्या हैद्यातून प्रवास करणारा सामान्य हमाल हे सारख्याच प्रमाणात हलाखीचा अनुभव घेतात. असा भेदभाव पुसून टाकणारे एक संकट तब्बल ३३ तास महामार्गावर दाटून राहिले, आणि ते गंभीर होत असल्याची जाणीव होऊ लागल्यावर संबंधित यंत्रणांनी तोच, नेहमीचा संदेश जारी केला. अत्यंत आवश्यक नसेल तर या मार्गावरील प्रवास टाळा अशा सूचना माध्यमे, समाजमाधमांवरून जारी झाल्या, तेव्हा त्याआधीच प्रवासकोंडीत अडकलेले हतबल प्रवासी संकटातून सुटकेची प्रतीक्षा करत सरकार आणि सुरक्षा यंत्रणांकडे आशेने नजरा लावून ताटकळत होते.

यशवंतराव चव्हाण द्रुतगती महामार्ग असे या महामार्गाचे नाव असले, तरी अलिकडच्या काही वर्षांपासून या मार्गावरून द्रुतगती तर दूरच, किमान सरासरी वेगाने वाहने चालविणेदेखील दुरापास्त होऊ लागले आहे. या समस्येस सर्वस्वी सरकार जबाबदार आहे असे सरसकटपणे म्हणता येणार नाही, पण समस्येवर तोडगा असूनही सरकारी यंत्रणा त्याकडे कानाडोळा करत असल्याचा आरोप होत असल्याने, सरकारवरील जबाबदारीही दूर करता येणार नाही. कोणत्याही रस्त्यावर वाहनांच्या वाहतुकीची एक शिस्त असते. त्यासाठी काही कायदे, नियमही आखलेले असतात आणि ते पाळणे ही नागरिकशास्त्र म्हणून समाजाचीही जबाबदारी असते. पण आजकाल अनेकदा वेळेबरोबर धावण्याच्या अपरिहार्य स्पर्धेमुळे पायालादेखील भिंगरी लावून पळापळ करणारा समाज नियम पाळून वेळ वाया घालवण्याच्या मन:स्थितीत दिसत नाही. त्यासाठी प्रसंगी तो दंडात्मक कारवाईदेखील ओढवून घेतो आणि नियमाच्या कचाट्यातून सुटका करून घेतो. कदाचित त्यामुळेच, नियम मोडणारी माणसे हा दंडाच्या महसुलाचा मोठा स्रोत ठरू लागला असून वाहतुकीस शिस्त लावण्यासाठी नेमक्या जागी उभे राहण्याऐवजी दडी मारून बसणे व नियम मोडणाऱ्याकडून वसुली करणे हीच 'ड्युटी' मानण्याचा गैरसमजही वाढीस लागला असावा. कदाचित, वाहतुकीचे नियम मोडणारी वाहने हा महसुलाचा मोठा स्रोत ठरत असल्यामुळेच त्या बेशिस्तीकडे कानाडोळा होत असला, तरी शिस्तीत जाणाऱ्या वाहनधारकांची परवड तरी लक्षात घ्यायला हवी. तसे होत नाही हाच बहुतांश खाजगी वाहनधारकांचा अनुभव असतो. हीच बाब महामार्गांवर किंवा स्थानिक रस्त्यांवरही दिसत असल्याने, जेव्हा अशाच अपघातातून समस्या उग्र होतात तेव्हा लोकांनाच घराबाहेर न पडण्याच्या सूचना देऊन समस्येची झळ शमविण्याचे प्रयत्न सुरू होतात.

मुळात, हेच टाळण्याची गरज या महामार्गावरील ताज्या समस्येने अधोरेखित केली आहे. मुंबई-पुणे दरम्यानचा हा महामार्ग केवळ महाराष्ट्रातील नव्हे, तर देशातील रस्ते वाहतुकीचा एक अत्यंत महत्त्वाचा आणि संवेदनशील भाग आहे, त्यामुळे अशा घटना वारंवार घडत असतील तर त्यावर तातडीने योग्य उपाययोजना करण्याकरिता कठोर होण्याची गरज आहे. या उपाययोजना फारशा अवघड नाहीत, हे एव्हाना स्पष्ट झालेले आहे. मार्गावरील अवजड वाहने आणि हलकी वाहने यांना रस्ता पार करण्याकरिता आखून दिलेल्या नियमांचे काटेकोर पालन करणे हे जसे वाहनधारकांचे कर्तव्य आहे, त्याचप्रमाणे या नियमांचे काटेकोर पालन होते किंवा नाही हे पाहणे ही संबंधित यंत्रणांची जबाबदारीदेखील आहे. महामार्गावर या कामाकरिता पुरेसे मनुष्यबळ तैनात केल्यास होणारी वेळेची बचत, इंधनखर्चातील बचत आणि मुख्य म्हणजे, प्रवास करणाऱ्या माणसांना व्यवस्थेविषयी वाटणारा आदर या बाबींचा हिशेब मनुष्यबळाचा खर्च भरून काढण्यासाठी पुरेसा ठरू शकतो, हेही लक्षात घ्यावयास हवे. एका बाजूला विकासाचा ध्यास आहे, सुशासनाची ग्वाही आहे आणि त्याच विकासाच्या वेडापायी मोजावी लागणारी किंमत अशा मानसिक, शारीरिक, आर्थिक मनस्तापाचे रूप घेऊन उग्र होत असेल, तर सुशासनाच्या संकल्पनेवरील विश्वास कमी होत जाईल. केवळ व्यवस्थांच्या अभावामुळे तसे होणे योग्यदेखील नाही. कारण, सर्व यंत्रणा व व्यवस्था अखेरीस समाजहितासाठी बांधील असल्या पाहिजेत अशीच समाजाची धारणा असते. या वाहतूक कोंडीने अनेक त्रुटींची जाणीव नव्याने करून दिली आहे. महामार्गासारख्या वेगवान सुविधा निर्माण करताना, त्यावरील संभाव्य समस्या लक्षात घेऊन त्यावरील पर्यायांची व्यवस्थाही अगोदर निर्माण करणे गरजेचे असते, हा जुनाच धडा नव्याने दिला गेला आहे. तशी सक्षम आणि पुरेशी व्यवस्था या ठिकाणी नाही, अशा प्रसंगातून तातडीने मार्ग काढण्याकरिता वेगवान हालचाली आणि निर्णय घेण्याची गरज असते. या बाबतीतही काहीशी उदासीनताच असल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झाले. अगोदरच गैरसोयींमुळे त्रस्त झालेल्या नागरिकांना सुविधा देण्याची घाई करण्याऐवजी त्यांच्याकडून टोल वसुली करून टोल कंत्राटदारांनी माणुसकीशून्य मानसिकतेचे दर्शन घडविल्याचा प्रवाशांचा आरोप आहे. या समस्येमुळे प्रवाशांना जेवढा मानसिक त्रास झाला, त्याहूनही अधिक मनस्ताप या वागणुकीमुळे झाल्याचे प्रवाशांनी समाजमाध्यमांवरून व्यक्त केलेल्या भावनांमधून स्पष्ट झाले आहे. यशवंतराव चव्हाण द्रुतगती महामार्गावरील ही समस्या म्हणजे, संभाव्य समस्यांची पूर्वसूचना ठरू शकते. असेच प्रकार देशाच्या कोणत्याही कानाकोपऱ्यात घडू शकतात, तेव्हा माणुसकीने जिवंत असायला हवे, ही जाणीव या समस्येने करून दिली आहे. अशा जिवंत माणुसकीचे दर्शन या संकटकाळात अनेकांना घडले होते. तासन्तास एका जागी खोळंबल्यामुळे अनेक मुले भुकेने कळवळली, अनेकांना उपाशी राहण्याची वेळ आली, अनेकांना नैसर्गिक विधींची कुचुंबणा सहन करावी लागली आणि अशा वेळी पोलिसांच्या काही पथकांनी या माणुसकीचेही दर्शन घडविले. फळे, पाणी, बिस्किटांसारख्या वस्तूंचे वाटप करण्यासाठी संपूर्ण मार्गांवर पायपीट करणारे पोलिस कर्मचारी हे त्या काळातील माणुसकीचे दूत ठरले, पण माणुसकीशून्य मानसिकतेच्या कटू अनुभवांनी त्यावर मात केली. विकास, सुविधा, सुशासनाच्या ध्यासाने सुरू असलेल्या वाटचालीला माणुसकीचा ओलावा असायला हवा, ही या संकटाने दिलेली महत्त्वाची शिकवण आहे.

## विशेष

**विवेक गिरिधारी**

# बस्तरच्या अरण्यछायेतील सेवाकार्य!

तरुण वयात आयुष्यभर सामाजिक सेवा करण्याचे स्वप्न बघणारे अनेक जण असतात. काही जण तसे बोलूनही दाखवतात. परंतु फारच थोडे लोक ते प्रत्यक्षात आणण्याचे धाडस दाखवू शकतात. अशा मोजक्या लोकांपैकीच डॉ. राम व सुनीता गोडबोले हे सेवासमर्पित दाम्पत्य आहे. हे दाम्पत्य गेल्या तीन तपांहून अधिक काळ वनवासी जनजाती समाजाच्या सेवेत रममाण झाले आहे. नक्षलवादामुळे सर्वांना परिचित असलेल्या छत्तीसगड राज्यातील बस्तर परिसरातील दंतेवाडा जिल्ह्यात सध्या हे दाम्पत्य काम करीत आहेत. दीड तपाहून अधिककाळ वनवासी कल्याण आश्रमाच्या माध्यमातून बस्तरमध्ये आदिवासी जनजाती महिलांमध्ये सुनीताताई काम करीत आहेत.

मूळच्या पुणेकर असणाऱ्या सुनीताताई या सहकारनगरमधील पूर्वाश्रमीच्या सुनीता पुराणिक आहेत. महाविद्यालयीन विद्यार्थिदशेत त्या अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या संपर्कात आल्या व सामाजिक कामाशी अधिकाधिक संलग्न होत गेल्या. अभाविपचे तत्कालीन ज्येष्ठ नेते यशवंतराव केळकर व बाळासाहेब आपटे यांच्या अभ्यासवर्गातील मांडणीमधून त्यांना सामाजिक कार्याची दृष्टी मिळाली. स्वत:कडे न बघता समाजाकडे बघितले पाहिजे या दृढ संस्काराचा वसा मिळाला. त्यातूनच त्यांचे आयुष्यभर आदिवासी भागात प्रत्यक्ष राहून काम करण्याची दिशा निश्चित होत गेली. त्यानुसारच त्यांनी मग ठरवून सामाजिक सेवेच्या संदर्भातील एमएसडब्लूचे पदव्युत्तर शिक्षण कर्वे शिक्षणसंस्थेतून पूर्ण केले. काही काळ पुण्यातील एका सामाजिक संस्थेत अनुभवासाठी दोन वर्ष नोकरी केली. परंतु आयुष्यभर आदिवासी भागात काम करण्याचे स्वप्न काही त्यांना स्वस्थ बसू देईना.

**वनवासी क्षेत्राचा परिचय :** तत्कालीन संघ प्रांत प्रचारक कै. दामुअण्णा दाते यांच्याशी बोलणे करून त्यांच्या योजनेनुसार प्रत्यक्ष वनवासी क्षेत्रातील सुनीताताईंच्या पूर्ण वेळ कामास सुरुवात झाली. १९८४ मध्ये सुरुवातीला सहा महिने त्या ठाणे जिल्ह्यातील तलासरी केंद्रावर राहिल्या. त्यावेळेस कै. केशवराव केळकर हे ज्येष्ठ संघप्रचारक वनवासी क्षेत्रात अत्यंत आत्मीयतेने कार्यरत होते. त्यांची त्यावेळेसची वनवासी भगिनींसाठी दिवाळीची 'साडी-चोळी भाऊबीज' योजना अनेकांच्या आजही स्मरणात आहे. अशा या केशवरावांबरोबर वनवासी क्षेत्रात प्रासंगिक फिरण्याची संधी सुनीताताईंना मिळाली. त्यातून त्यांना वनवासी समाजाची खरी ओळख झाली. सुरुवातीला फक्त काही वर्षे वनवासी क्षेत्रात काम करण्याचा त्यांना विचार होता.

सहा महिन्यांची उमेदवारी संपल्यानंतर सुनीताताईंची रायगड जिल्ह्यातील जांभिवली केंद्रावर वनवासी कल्याण आश्रमाचे पूर्ण वेळ काम करण्यास रीतसर सुरुवात झाली. त्यावेळेस जांभिवली केंद्रावर काम करण्यास नुकतेच कुंटे काका-काकूंनी सुरुवात केली होती. या जोडगोळीची आणि सुनीताताईंची चांगली गट्टी जमली. आदिवासी भागात



प्रत्यक्ष राहून वैद्यकीय सेवा देण्याची स्वप्ने पाहणाऱ्या डॉ. राम गोडबोले यांच्याशी त्यांचे १९९० मध्ये लग्न झाले. लग्नानंतर छत्तीसगढ-बस्तरला जाण्याचे आवाहन या नवविवाहित दाम्पत्याला वनवासी कल्याण आश्रमाचे तत्कालीन संघटनमंत्री भास्करराव कळंबी यांनी केले. या प्रस्तावास अनुकूलता दर्शवत लगेचच या नवविवाहित दाम्पत्याने बस्तरमध्ये वनवासी कल्याण आश्रमाचे एक तपासाठी पूर्णवेळ राहून काम करण्याचा निर्णय निर्धारपूर्वक घेतला. अन लगोलग दाखलही झाले.

दंतेवाडा जिल्ह्यातील बारसूर (ता. गीदम) येथील आदिवासी मुलीच्या छात्रावासाची महत्त्वाची जबाबदारी सुनीताताईंनी स्वीकारली आणि डॉ. राम गोडबोले यांनी वनवासी कल्याण आश्रमाच्या माध्यमातून बारसूरमध्येच दवाखाना सुरू करून आदिवासींना वैद्यकीय सेवा देण्यास सुरुवात केली. पूर्वायुष्य पूर्णपणे शहरात गेलेल्या या सुशिक्षित नवविवाहित दाम्पत्याची सहजीवनाची सुरुवात बस्तरमधील मातीच्या घरात झाली. दीड वर्षापासून बंद अवस्थेत असलेल्या व पडक्या स्थितीत असलेला दवाखाना आता पुन्हा आदिवासी रुग्णांनी गजबजू लागला. सुनीताताईंमुळे बारसूरला आदिवासी मुलींचे वसतिगृह नव्याने १९९१मध्ये चालू करण्यात आले. वसतिगृहात शिकायला मुली आणण्यासाठी आदिवासी पाड्यांमध्ये सुरुवात झाली. या कामाशी सुनीताताई एवढ्या समरस झाल्या की त्यांनी झटपट तेथील आदिवासींची स्थानिक 'गोंडी व हल्बी' भाषा शिकून घेतली. त्यातून त्यांचा स्थानिक आदिवासींशी सहजपणे व सफाईदारपणे संवाद होऊ लागला. स्थानिक भाषा येण्याचा मोठा फायदा डॉ. राम गोडबोले चालवत असलेल्या दवाखान्यातील रुग्णांची संख्या स्वाभाविकपणे वाढण्यात झाला. प्रतिवर्षी बस्तर दौऱ्यात गोडबोले पती-पत्नीची भेट घेऊन त्यांच्या कामाची जिव्हाळ्याने विचारपूस करण्याचा भास्करराव कळंबी यांचा परिपाठ २००१ पर्यंत चालू होता. कार्यकर्त्यांना सांभाळणे व कायम प्रेरणा देत राहणे, हे भास्कररावांचे स्वभाववैशिष्ट्य होते. आजही भास्कररावांच्या आठवणी या गोडबोले पतीपत्नींसाठी एक हळवा कोपरा आहे.

ठरविल्याप्रमाणे एक तप पूर्णवेळ काम केल्यानंतर २००२मध्ये सुनीताताईंना कौटुंबिक आजारपण व अन्य कारणांमुळे महाराष्ट्रात येण्याचा निर्णय घ्यावा लागला. या दरम्यान त्यांनी पालघर जिल्ह्यातील विक्रमगड परिसरात किशोरी मुलींचे आरोग्यशिक्षण व वनवासी महिलांच्या संघटनाचे काम प्रत्यक्ष राहून केले. दहा वर्षे तेथे काम केल्यानंतर त्यांना पुन्हा बस्तरची ओढ वाटू लागली. बस्तरमध्ये आपल्याशिवाय कोण जाणार? असा विचार करून अखेरीस २०१२ साली पुन्हा बस्तरमध्ये पुढील दहा वर्षांसाठी कामाला जाण्याचा निर्णय डॉ. राम व सुनीता गोडबोले यांनी घेतला व ते परत बस्तरमध्ये लगेचच दाखल झाले.

**बस्तरमधील कामाचे बदलत जाणारे स्वरूप :** दरम्यानच्या काळात २००० साली छत्तीसगड वेगळे राज्य झाले. पुढे टप्प्याटप्प्याने मूळ बस्तर प्रदेशाचे सात आदिवासी जिल्हे झाले. बदलत्या परिस्थितीनुसार व स्थानिक कामाच्या गरजेनुसार बस्तरमधील कामाचे स्वरूप बदलत गेले. दोघेही वनवासी कल्याण आश्रमाच्या बारसूर कार्यालयात सध्या राहत आहेत. बालकांच्या हक्कांचे संरक्षण करणाऱ्या प्रथम श्रेणी न्यायाधीशांचे अधिकार प्राप्त असणाऱ्या न्यायपीठाच्या अधिकारी सदस्या म्हणून सुनीताताईंनी अलिकडे पाच वर्षे काम केलेले आहे. डॉ. राम गोडबोले हेही आता पूर्वीसारखा एका जागी दवाखाना चालवत नसून गावोगाव आरोग्य शिबिरे घेत आहेत. हैदराबादवरून रातोरात लांबचा प्रवास करून अत्यंत नियमितपणे आरोग्य शिबिरांना उपस्थित राहणारे डॉ. करमाळकर या तज्ज्ञ डॉक्टरांची मोलाची साथ गेले काही वर्ष मिळत आहे.

**बस्तरमधील विधायक कामाचे ऊर्जा केंद्र :** गेल्या पाच-दहा वर्षांत बस्तरसारख्या दुर्गम प्रदेशात सामाजिक काम करण्याच्या ऊर्मीने अनेक युवक-युवती देशभरातून दाखल होत आहेत. तेलंगणातील प्रणीत सिंम्भा तसेच महाराष्ट्रातील आकाश बडवे, ज्योती पटाले, श्रीराम देशपांडे आणि उत्तरप्रदेशमधील आशिष-शालिनी श्रीवास्तव हे यापैकी काही जण आहेत. देशातला सर्वांत मागास प्रदेश म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बस्तरसारख्या सुदूर परिसरात आरोग्य, शिक्षण व कुपोषण या क्षेत्रात हे सेवासमर्पित दाम्पत्य भरीव योगदान करीत आहे. त्यांच्या अविरत चालणाऱ्या कामाची दखल घेऊन त्यांना पुण्यातील नातू प्रतिष्ठानतर्फे पुरस्कार देऊन यापूर्वी गौरविण्यात आले आहे. वनवासी रुग्णांना जीवदान मिळवून देणाऱ्या त्यांच्या सेवाभावी मानवतावादी कार्याची दखल बाया कर्वे पुरस्कारामुळे पुन्हा एकदा महाराष्ट्राने घेतली. आता तर 'पद्मश्री'सारख्या राष्ट्रीय पातळीवरील प्रतिष्ठेच्या सन्मान पुरस्काराने त्यांना गौरविण्यात आलेले आहे. खरे तर पर्यटनात आघाडीवर असणारी महाराष्ट्रीय मंडळी देश-विदेश धुंडाळत फिरत असतात. यापैकी काहींनी तरी वाकडी वाट करून पर्यटनाच्या निमित्ताने बस्तरला जाऊन गोडबोले दाम्पत्याला भेटायला काय हरकत आहे?

९४२२२३१९६७

## वेध

**प्रफुल्ल क. व्यास**

# म्हणून शेगाव श्रेष्ठ आहे!

महाराष्ट्राची आन, बान, शान विदर्भ आहे. कोळसा आणि निसर्गातही विदर्भ समृद्ध आहे. या सोबतच आमच्या विदर्भाची शान ज्या तीर्थक्षेत्राने वाढवली ते तीर्थक्षेत्र म्हणजे संत गजानन महाराजांच्या पावस्पर्शाने पुनीत झालेले शेगाव! शेगाव म्हणजे भक्ती, शिस्त, स्वच्छता आणि सेवाभावाचा संगम. महाराष्ट्रात अनेक तीर्थक्षेत्रे आहेत, अनेक देवस्थानांना ऐतिहासिक आणि धार्मिक महत्त्व आहे; परंतु, शेगावच्या व्यवस्थापनाची सर कोणीही करू शकले नाही. कारण येथे केवळ दर्शनाची सोय नाही तर सेवाभावाचा सुगंध पावलोपावली दरवळतो. 'स्वच्छता हीच सेवा' हा संदेश येथे केवळ पाट्यांवर नाही तर प्रत्यक्ष कृतीत आहे. दर्शनासाठी येणाऱ्या लाखो भाविकांची सोय करण्यासाठी प्रशस्त रांगा, शिस्तबद्ध प्रवेशमार्ग, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, भोजनालय, निवासस्थान अशा सर्व सुविधा अगदी मोफत किंवा अत्यल्प दरात आहेत. कुठेही ढकलाढकली नाही, गोंधळ नाही संतांचे दलाल नाहीत. दर्शन व्यवस्थेतील शिस्त विशेष उल्लेखनीय आहे. अनेक तीर्थक्षेत्रांमध्ये तासन्तास रांगेत उभे राहूनही गोंधळाचा सामना करावा लागतो; पण शेगावात जय गजानन, श्री गजाननच्या जयघोषात रांग हळूहळू पुढे सरकत महाराजांच्या समाधीपुढे उभे राहण्याचा क्षण येतो. त्या क्षणी मन कृतज्ञतेने भरून येते. महत्त्वाचे म्हणजे समाधी आणि मुख दर्शन किती वेळात होईल याचा लागलेला फलक तुमच्या मनातली घालमेल क्षणात संपवून टाकतो. त्यामुळे इतर तीर्थक्षेत्रांपेक्षा शेगाव हे तीर्थक्षेत्र श्रेष्ठ ठरते आहे स्वच्छता आणि व्यवस्थापनात. (संताचा वास सर्व ठिकाणी समान आहे.) शेगावच्या प्रसादाची परंपरा तर विलक्षण आहे.

येथे प्रसाद म्हणजे केवळ काही गोडधोड नव्हे तर तो प्रेमाचा आणि समतेचा प्रतीक आहे. गरीब-श्रीमंत, लहान-मोठा, स्त्री-पुरुष असा कोणताही भेद न करता प्रत्येकाला समान प्रसाद दिला जातो. भोजनालयात हजारो लोक एकत्र बसून जेवतात. कुणाला उपाशी राहावे लागत नाही. अगदी एकादशीला पोटभर उसळही तेवढ्याच भक्तिभावाने दिली जाते. शेगावच्या व्यवस्थेचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे नियमबद्धता. येथे प्रत्येक गोष्ट नियमांनुसार चालते. रांगेत शिस्त, परिसरात स्वच्छता, आवाजावर नियंत्रण, सेवेकऱ्यांचे नम्र वर्तन यासोबतच निवास व्यवस्थेत 'सेवेकरांवर लोभ न दाखवता त्यांच्याप्रति लोभ असू द्या,' या एका वाक्याने संतनगरी शेगावची महती स्पष्ट होते अन् देवदर्शनच नाही तर संस्कारही मिळतात! शेगावात येणारा प्रत्येक भाविक काही ना काही शिकून जातो. येथे सेवा करणारे स्वयंसेवक दिवस-रात्र कार्यरत असतात. कुणी पाणी देत असतो, कुणी रांग सांभाळत असतो, कुणी साफसफाई करत असतो. त्यांना मोबदल्याची अपेक्षा नसते. 'महाराजांची सेवा' हीच त्यांची कमाई असते. ग्रामीण भागातून आलेल्या भाविकांपासून ते शहरातील सुशिक्षित लोकांपर्यंत सर्वांना येथे समान वागणूक मिळते. कुणालाही विशेष वागणूक नाही. ही समतेची भावना शेगावला इतर तीर्थक्षेत्रांपेक्षा वेगळे स्थान देते. आज अनेक धार्मिक स्थळांवर व्यापारीकरण वाढताना दिसते. दर्शनासाठी पैसे, प्रसादासाठी पैसे, पार्किंगसाठी पैसे, सर्वत्र व्यवहार दिसतो. पण शेगावात मात्र 'सेवा' हा शब्द अजूनही जिवंत आहे. येथे भक्ती आहे, शिस्त आहे, स्वच्छता आहे, सेवा आहे आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे माणुसकी आहे. शेगाव हे केवळ तीर्थक्षेत्र नाही, तर संस्कारांचे, सेवाभावाचे आणि आदर्श व्यवस्थापनाचे विद्यापीठच आहे. शेगाववरून आषाढीसाठी पंढरपूरला जाणाऱ्या पालखीची शिस्त एक आदर्श उदाहरण ठरावे. या मंदिराचे विश्वस्त शंकरदादा पाटील यांनी हयात असेपर्यंत या मंदिरातील घोटभर पाणी सुद्धा पिले नाही. तोच वारसा त्यांचे चिरंजीव सांभाळत आहेत. आनंद सागर प्रकल्पामुळे शेगावचे रूप आणखी खुलले होते. हे केवळ पर्यटनस्थळ नाही तर अध्यात्माला संस्कृतीची जोड होती. बाग, खेळांची साधने, मुलांसाठी मनोरंजन, ध्यानधारणा केंद्र नियोजनबद्ध होते.

कुटुंबासोबत वेळ घालवताना मन प्रसन्न होत होते. त्यामुळे तो प्रकल्प शेगावच्या व्यवस्थापन कौशल्याचा जिवंत पुरावा होता. दुर्दैवाने त्याला कोणाची तरी दृष्ट लागली आहे. तो प्रकल्प बंद पडला असला तरी भक्त आनंद सागर विसरले नाहीत. आनंद सागर परत सुरू व्हावे ही विदर्भातील प्रत्येक गजानन भक्ताची मनोमन इच्छा आहे. या प्रकल्पासाठी शासन आणि प्रशासनाने पुढाकार घेणे तेवढे अपेक्षित आहे. राजकारणविरहित हा प्रकल्प यशस्वी करण्याची जबाबदारी कोणीतरी एकाने घेतल्यास विदर्भातील हा प्रकल्प उंची गाठल्याशिवाय राहणार नाही. मंदिरांमध्ये करोडो रुपयांचा भ्रष्टाचार करणाऱ्यांनी, व्यवस्थापनात गलथान असणाऱ्यांनी एकदा तरी शेगावच्या व्यवस्थापनाचा आदर्श घ्यावा! प्रकटदिन सप्ताह सुरू झालेला आहे. प्रकट दिनानिमित्त गजानन महाराजांना तरुण भारतचे शतशत नमन.

९८८१९०३७६५

## प्रासंगिक

**रवींद्र भुसारी**

# वारस भगीरथाचे, फुलवी मळे चैतन्याचे

दि. १० आणि ११ जानेवारी हे दोन दिवस नागपुरातील दोन कार्यक्रमांमुळे अविस्मरणीय व ऊर्जादायी ठरले. अमृतानुभव ठरलेल्या या दोन्ही कार्यक्रमांना उपस्थित राहता आले, याचा खूप आनंद झाला आणि स्वाभाविकच मुखातून शब्द उमटले - वारस भगीरथाचे, फुलवी मळे चैतन्याचे. आधुनिक भगीरथ असलेल्या डॉ. हेडगेवारांनी भारतभूमीवर संघगंगा प्रवाहित केली आणि आज शंभर वर्षांनंतरही या भगीरथाचे वारस देशभक्तीने भारलेली चैतन्याची मळे कशी फुलवत आहेत, याचे प्रत्यक्ष दर्शन जणू पुन्हा पुन्हा घडले. म्हणूनच या दोन्ही उपक्रमांचे शब्दचित्रण करण्याचा हा प्रयत्न आहे.

दि. १० जानेवारी रोजी विलासजी फडणवीस स्मृती जिव्हाळा पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. जिव्हाळा परिवारातर्फे आयोजित हा सोहळा आय. टी. पार्क, नागपूर येथील पर्सिस्टंट सिस्टिम्सच्या 'कविकुलगुरू कालिदास सभागृहात' संपन्न झाला. संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त समाजासमोर पंचपरिवर्तन ही सूत्रे मांडण्यात आली असून, या पाच मूल्यांना सक्षम करण्याचा संकल्प करण्यात आला आहे. या पंचमूल्यांवर निरपेक्षपणे कार्य करणाऱ्या समाजातील विविध प्रेरक व्यक्तिमत्त्वांचा सन्मान करणे, हाच या सोहळ्याचा मुख्य उद्देश होता. विशेष म्हणजे, हा सन्मान संघाच्या पाच प्रचारकांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. संघाचे माजी प्रचारक रवींद्र देशपांडे यांनी या पाच प्रचारकांशी साधलेला आत्मीय संवाद हे या कार्यक्रमाचे आगळेवेगळे वैशिष्ट्य ठरले. ज्या 'वंदे मातरम्' गीताने भारतीयांच्या मनात देशभक्तीचे स्फुलिंग चेतवले, त्या गीताच्या सार्धशती वर्षानिमित्त त्याच्या ओजस्वी गायनाने कार्यक्रमाचा मंगल प्रारंभ अधिकच तेजस्वी झाला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आशुतोषजी फडणवीस यांनी केले, तर समारोप नागेश पाटील यांच्या नेतृत्वाखाली जिव्हाळा कन्या निवासाच्या भगिनींनी सादर केलेल्या 'पसायदानाने' करण्यात आला. नागपूरच्या गांधीनगरातील शाखा स्व. विलासजींनी सुरू केली होती. ८० च्या दशकात त्या शाखेतून पाच स्वयंसेवक प्रचारक घडले - पद्मश्री डॉ. धनंजय सगदेव, अ. भा. सहप्रचारक प्रमुख सुनील कुळकर्णी, अ. भा. सहसंपर्क प्रमुख सुनील देशपांडे, विवेकानंद केंद्राचे अ. भा. कोषाध्यक्ष प्रवीण दाभोळकर आणि मी - रवींद्र भुसारी. आम्हा पाच प्रचारकांच्या हस्ते पुरस्कार वितरण झाले आणि आमच्याशी आत्मीय संवाद साधण्यात आला. सर्व प्रचारक नागपूरमधूनच प्रचारक जीवनात आले. मी, सुनील कुळकर्णी आणि प्रवीण दाभोळकर यांनी नोकरीचा राजीनामा देऊन, तर इतरांनी शिक्षण पूर्ण होताच प्रचारक जीवन स्वीकारले. संघाच्या प्रचारकांचे जीवन नेहमीच खडतर असते. दोन वेळच्या जेवणाचीही शाश्वती नसते.

**पुरस्कार वितरण :** सामाजिक समरसता क्षेत्रात भन्ते अभय नायक थेरा यांना 'संचेती फाऊंडेशन पुरस्कार' सुनील देशपांडे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. स्वदेशी कार्य क्षेत्रात सुरेश पितळे यांना 'श्री मोरेश्वर माधव देशपांडे पुरस्कार' प्रवीण दाभोळकर यांच्या हस्ते गौरविण्यात आले. कुटुंब प्रबोधन क्षेत्रात अधिवक्ता सीमा घाटे यांना 'स्व. प्रभाकरराव मुंडले स्मृती पुरस्कार' पद्मश्री डॉ. धनंजय सगदेव यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. पर्यावरण संवर्धन क्षेत्रात सचिन नायडू यांना 'श्रीधरराव विचोरे पुरस्कार' सुनील कुळकर्णी यांच्या हस्ते देण्यात आला. नागरी कर्तव्य क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यासाठी रवींद्र परांजपे यांना 'स्व. सरस्वतीदेवी बिहारीलाल खंडेलवाल स्मृती पुरस्कार' आयोजकांनी माझ्या हस्ते प्रदान केला. संघाच्या शताब्दी वर्षाचे औचित्य साधून, समाजातील पाच महत्त्वाच्या क्षेत्रांत (पंचपरिवर्तन) नि:स्पृहपणे कार्य करणाऱ्या व्यक्तिमत्त्वांना ५१,००० रुपये, प्रभू श्रीरामांची प्रतिमा, मानपत्र व विलासजींवरील पुस्तक देऊन सन्मानित करण्यात आले.रा. स्व. संघ विदर्भ प्रांत सहसंघचालक श्रीधरराव गाडगे यांनी आपल्या भाषणात विलासजींच्या स्मृतींना उजाळा दिला. ते म्हणाले, विलासजी हे केवळ व्यक्ती नव्हते; ते ऊर्जेचे उगमस्थान होते. त्यांच्या अथांग जिव्हाळ्यामुळेच अनेक तरुण राष्ट्रकार्यासाठी प्रेरित झाले. त्यांच्यातील हे अलौकिकत्व अनुभवूनच उपस्थित पाचही प्रचारक राष्ट्रसेवेत निमग्न झाले आहेत. नव्या पिढीने या 'दीपस्तंभा'चा आदर्श डोळ्यासमोर ठेवणे ही काळाची गरज आहे. पुरस्कारार्थींच्या सन्मानार्थ मानपत्रांचे वाचन हा सोहळ्याचा विशेष भाग होता. श्रद्धा भारद्वाज, डॉ. अभिजित अंभईकर, गौरी बेलन, डॉ. सीमा देशपांडे आणि रूपा फडणवीस यांनी मानपत्रांचे इतक्या भावपूर्ण शैलीत वाचन केले की संपूर्ण सभागृह भारावून गेले. डॉ. भाग्यलक्ष्मी देशकर यांचे सूत्रसंचालन अप्रतिम होते.

**दि. ११ जानेवारी : स्मृती आणि ध्येयाचा त्रिवेणी संगम**

स्वर्गीय विलासजींच्या दूरदृष्टीतून उभी राहिलेली गांधीनगर संघशाखा केवळ एक शाखा नसून, ती संस्कारांची जननी आहे. याच मातीतून पाच ध्येयवेडे प्रचारक घडले. त्यांच्याशी झालेला आत्मीय संवाद, विलासजींच्या स्मृतींना दिलेला उजाळा आणि पंचपरिवर्तनासाठी अहोरात्र झटणाऱ्या सेवाव्रतींचा सन्मान यामुळे वातावरण एखाद्या तीर्थक्षेत्राप्रमाणे पवित्र झाले होते.

शाखेच्या वार्षिक उत्सवाच्या निमित्ताने वस्तीतून निघालेले पथसंचलन म्हणजे शिस्तीचे दर्शनच होते. घोषाच्या लयबद्ध तालावर पडणारी स्वयंसेवकांची पावले परिसरात चैतन्य जागवत होती. स्वागत प्रणामाने सुरू झालेला कार्यक्रम अचूकपणे ६० व्या मिनिटाला 'संघ-विकीर'ने संपन्न झाला. या एका तासात शिशूंचे खेळ, बालकांचे नियुद्ध, तरुणांचे थरारक दंडयुद्ध आणि व्यावसायिकांची योगासने पाहून उपस्थित प्रेक्षक भारावून गेले. विशेष म्हणजे, बाल स्वयंसेवकांनी अमृतवचन, सुभाषित व संघगीत कोणताही कागद न पाहता आत्मविश्वासाने सादर केले. महाविद्यालयीन तरुण कार्यवाहांचे प्रास्ताविक नेतृत्वगुण दर्शविणारे होते. नागपूर महानगरपालिकेच्या निवडणुकांची पृष्ठभूमी असतानाही, बाह्य राजकीय कोलाहलापासून अलिप्त राहून शांतचित्ताने कार्य करणे ही खरी साधना आहे. गांधीनगरच्या स्वयंसेवकांनी कृतीतून हेच सिद्ध केले की परिस्थिती कितीही प्रतिकूल असली तरी ध्येयपथावरील पाऊल कधीच डगमगत नाही.

९५९४७५३४४४

## खाजगी नेटवर्कचा ५ जीचा गाजावाजा आणि संथ इंटरनेट



देश डिजिटल युगात वेगाने पुढे जात असल्याचे चित्र रंगवले जात असताना मोबाईल इंटरनेट सेवेचे वास्तव मात्र वेगळेच प्रश्न निर्माण करत आहे. ५ जीच्या नावाने जाहिरातींचा भडिमार सुरू असला, तरी प्रत्यक्षात ग्राहकांच्या हाती येणारी सेवा ३ जी किंवा ४ जीपेक्षाही कमी गतीची असल्याचा अनुभव मोठ्या प्रमाणावर येत आहे. हा केवळ तांत्रिक प्रश्न नसून तो ग्राहकांच्या विश्वासाशी खेळ करणारा प्रकार ठरत आहे. शहरी भाग असो वा ग्रामीण, इंटरनेट संथ गतीने चालणे, नेटवर्क सतत खंडित होणे, कॉल ड्रॉप होणे, ऑनलाईन सेवा ठप्प होणे या समस्या दिवसेंदिवस वाढत आहेत. शिक्षण, आरोग्य, बँकिंग, शासकीय योजना, रोजगार, व्यवसाय अशा प्रत्येक क्षेत्रात इंटरनेट हा मूलभूत घटक झाला असताना अशी निकृष्ट सेवा देणे म्हणजे विकासाच्या दाव्यांवरच प्रश्नचिन्ह उभे करणे होय.

ग्रामीण भागात अजूनही नेटवर्क आहे पण इंटरनेट नाही अशी स्थिती आहे. टॉवर उभे आहेत, पण स्पीड नाही. शहरी भागात महागडे रिचार्ज असूनही गर्दीच्या वेळेत इंटरनेट पूर्णपणे ठप्प होते.

यामुळे स्पष्ट होते की समस्या फक्त तंत्रज्ञानाची नाही, तर व्यवस्थापन आणि नियोजनाच्या अपयशाची आहे. खाजगी मोबाईल कंपन्या दरमहा मोठ्या प्रमाणात शुल्क आकारतात, पण सेवा दर्जाबाबत जबाबदारी स्वीकारताना मात्र टाळाटाळ करतात. ग्राहकांनी तक्रार केल्यास अपग्रेड सुरू आहे, नेटवर्क सुधारत आहे अशी ठरावीक उत्तरे दिली जातात. मात्र महिन्यांनंतरही परिस्थितीत फारसा बदल होत नाही. जाहिरातीत दाखवलेला वेग आणि प्रत्यक्षातील वेग यात मोठी दरी दिसून येते.

## वाचक पत्रे

या पृष्ठभूमीवर दूरसंचार नियामक संस्था आणि शासनाची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. केवळ तंत्रज्ञानाच्या घोषणा करून भागणार नाही, तर सेवेच्या गुणवत्तेवर कठोर नियंत्रण आवश्यक आहे. ग्राहकांना प्रत्यक्ष मिळणाऱ्या इंटरनेट स्पीडची पारदर्शक माहिती देणे, खोट्या जाहिरातींवर कारवाई करणे आणि सेवा निकृष्ट असल्यास दंडात्मक उपाय करणे ही काळाची गरज आहे. ५ जी हे नावापुरते न राहता ते प्रत्यक्षात अनुभवता आले, तरच डिजिटल भारताचा दावा सार्थ ठरेल. अन्यथा हाय-स्पीड इंटरनेट हे केवळ पोस्टर आणि जाहिरातीपुरते मर्यादित राहील. ग्राहक केवळ महसुलाचे साधन नाहीत, तर ते या डिजिटल व्यवस्थेचा कणा आहेत ही जाणीव मोबाईल कंपन्यांनी आणि यंत्रणांनी ठेवणे आता अपरिहार्य झाले आहे.

**मुनीश्वर मलेवार**/९४०५५१३३२४

## विचार, वाणी व वर्तन

एकदा राजा विक्रमादित्य आपल्या मंत्री आणि सैनिकांसह जंगलात शिकारीसाठी गेला असता जंगलात ते सर्व एकमेकांपासून वेगळे झाले. विक्रमादित्य भटकत असताना त्याला एका झाडाखाली एक आंधळा साधू बसलेला दिसला. याच्याशी विचारपूस करावी या हेतूने विक्रमादित्य पुढे झाला व त्याने विचारले, ''हे साधू महाराज, येथून कोणी पुढे गेले का?'' त्यावर तो साधू उत्तरला, ''राजा, मी तर आंधळा आहे, पण सांगतो! पहिले आपला सेवक इथे आला होता. मग सेनापती व त्यानंतर मंत्री.'' आंधळ्या साधूच्या उत्तराने विक्रमादित्याला आश्चर्य वाटले. तो म्हणाला, ''महाराज, आपणाला दिसत नाही, मग आपण मला तसेच इतरांना कसे ओळखले?''

त्यावर साधू उत्तरला, ''राजा, मी त्या तिघांचे आणि तुझे मला उद्देशून केलेले बोलणे ऐकले आणि त्यावरून अंदाज बांधला. सर्वप्रथम तुझा शिपाई येथे येऊन मला म्हणाला, काय रे गोसावड्या, इथे कोणी आलं होतं का? त्याला मी आंधळा असल्याचे सांगितले, तसा तो म्हणाला! आंधळा आहे पण बहिरा नाही नां! कानोसा तर घेता आला असतां नां!

थोड्या वेळाने सेनापती आला व विचारले, हे भल्या माणसा, इथे कोणी आलं होतं का ? त्यानंतर आलेल्या मंत्र्यानं मला विचारलं, हे साधूजी, आपण आमच्या राजेसाहेबांना पाहिलं का? आणि शेवटी तुम्ही स्वत: येऊन मला मृदू भाषेत विचारलं की, येथून कोणी पुढे गेलं का? असे बोलणारा प्रजापालक राजाच असू शकतो, हे मी जाणले! राजन, प्रत्येक व्यक्तीची वाणी त्याची पद, प्रतिष्ठा आणि मोठेपणा दर्शविते.'' एवढे बोलून साधू महाराज पुन्हा ध्यानस्थ झाले.

प. पू. पांडुरंगशास्त्री आठवले (स्वाध्याय परिवाराचे प्रणेते) हे त्यांच्या प्रवचनाद्वारे कथास्वरूपात दृष्टांत देऊन एखादा मोठा जीवन सिद्धांतच सहजपणे समजावून सांगतात. खरेच आहे! विचार चांगले असतील तर, (भाषा) वाणी गोड राहील आणि परिणामस्वरूप (वागणूकही) वर्तन संभाविताप्रमाणे अर्थात चांगलेच राहील.

**मधुकर व्यवहारे**/पुणे

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

## महत्वाचे...

### एच.एन. कॉलेजमध्ये अर्थशास्त्र व बँकिंग विषयावर राज्य प्रश्नमंजुषा स्पर्धा

**सोलापूर, दि. ५ फेब्रुवारी-**

हिराचंद नेमचंद कॉलेज ऑफ कॉमर्स येथे अर्थशास्त्र आणि बँकिंग या विषयांवर आधारित प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन ९ फेब्रुवारी रोजी करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांमध्ये अर्थशास्त्र व बँकिंग विषयाविषयी रुची निर्माण व्हावी, त्यांचे विषयज्ञान अधिक सखोल व्हावे तसेच स्पर्धात्मक परीक्षांच्या दृष्टीने त्यांची तयारी मजबूत व्हावी, या उद्देशाने हा शैक्षणिक उपक्रम राबविण्यात येत आहे. ही स्पर्धा महाविद्यालयीन पदवी व पदव्युत्तर स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी खुली आहे. बदलत्या आर्थिक परिस्थिती, जागतिक अर्थव्यवस्थेतील घडामोडी, रिझर्व्ह बँकेच्या धोरणांपासून ते डिजिटल बँकिंग, वित्तीय साक्षरता, करप्रणाली, चलनविषयक धोरणे आदी विविध अंगांचा अभ्यास व्हावा या उद्देशाने याचे आयोजन केले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना केवळ पाठ्यपुस्तकापुरते मर्यादित न राहता व्यापक दृष्टीकोन विकसित करण्याची संधी मिळणार आहे. या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांमध्ये बौद्धिक स्पर्धा, तर्कशक्ती आणि आत्मविश्वास वाढीस लागणार असून शैक्षणिक वातावरण अधिक सक्रिय होण्यास मदत होईल जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे, असे आवाहन प्राचार्य डॉ.सत्यजित शहा यांनी केले आहे. स्पर्धेसाठी नोंदणी व अधिक माहितीसाठी विरेश स्वामी (मो. ९४२०२७११३५) यांच्याशी संपर्क साधावा.



### शमा उर्दू शाळेत टीबी रोगावर जनजागृती शिबीर

**सोलापूर, दि. ५ फेब्रुवारी-**

सोलापूर महानगर पालिका राष्ट्रीय क्षयरोग दूरीकरण कार्यक्रमाअंतर्गत आरोग्यअधिकारी डॉ. राखी माने व शहर क्षयरोग अधिकारी डॉ. अरुधंती हराळकर यांच्या मार्गदर्शना खाली मजरेवाडी येथील शमा उर्दू प्राथमिक शाळेत क्षयरोग म्हणजे टीबी रोगावर जनजागृतीबद्दल माहिती देण्यात आली. डॉ. बरुडकर यांनी म्हणाल्या, वेळेवर उपचार व आहारा व विशेष लक्ष दिल्यास हा रोग बरा होऊ शकतोघाबरण्याचे काही कारण नाही. या रोगाबाबत अनेक गैरसमज आपल्या समाजात असतात. त्यामुळे मनात भिती निर्माण होत असते. परंतु महानगरपालिका दवाखान्यात या रोगा बाबत रोग निदान होत असते याचा लाभ घेण्याची गरज आहे ''जन सेवेचे कार्य महान, शंभर दिवशीय टीबी मुक्त भारत अभियानच्या माध्यमातून हा संदेश घरोघरी पोहच करून या रोगावर आपण मात करू शकतो. नई जिंदगी आरोग्य केंद्रामार्फत हा कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. टीबी हारेल, देश जिंकेल ! असा विश्वास ही यावेळी व्यक्त करण्यात आला.शमा शाळेतर्फे सर्व डॉक्टर्सचा सत्कार दिलशाद अ रजाक यांच्या हस्ते करण्यात आला कार्यक्रमाचे सुत्रसंचलन शाहीन सदफ यांनी केले. अबरार नल्लामंदू यांनी आभार मानले.

### जिल्हा खासगी प्राथमिक शिक्षक पतसंस्थेच्या चेअरमनपदी कल्लप्पा फुलारी

**सोलापूर, दि. ५ फेब्रुवारी-**

सोलापूर सोलापूर जिल्हा खासगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेत्तर सेवक सहकारी पतसंस्थेच्या सन २०२५-२०३१ या पाच वर्षासाठी चेअरमनपदी कल्लप्पा फुलारी, व्हा. चेअरमनपदी रमेश बेडगे, सचिवपदी महादेव होमकर तर खजिनदारपदी शोभा चव्हाण यांची निवडणूक निर्णय अधिकारी विजय चवरे यांच्या अध्यक्षतेखाली बिनविरोध निवड झाली. संस्थेचे संस्थापक कै. चं. कां. कोळशेट्टी यांनी स्थापन केलेल्या या पतसंस्थेची निवड प्रक्रिया विजय चवरे यांची निवडणूक निर्णय अधिकारी तथा सहकारी अधिकारी श्रेणी एक यांच्या अध्यक्षतेखाली पतसंस्थेच्या कार्यालयात सर्व नुतन संचालकांची सभा घेण्यात आली. निवडीनंतर निवडणूक निर्णय अधिकारी विजय चवरे यांनी चेअरमनसह सर्व पदाधिकारी यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी नूतन संचालक आरती गायकवाड, राजश्री तडकासे, उर्मिला जगदाळे, निलप्पा वाघोले, जावेद काझी, निलकंठ पटणे, किरण गाटे या सर्वाचे अभिनंदन केले. पतसंस्थेचे मार्गदर्शक शांतप्पा कुडल, माजी सचिव आणि मार्गदर्शक गुलजार चव्हाण, माजी चेअरमन लक्ष्मण सुतार, माजी संचालक शिवप्पा शेतसंदी यांनी नूतन पदाधिकाऱ्यांचे आणि संचालकांचे अभिनंदन केले.

### बेशुद्ध अवस्थेत आढळलेल्या अनोळखी इसमाचा मृत्यू

**सोलापूर :** पुणे विजापूर हायवेवर बेशुद्ध अवस्थेत आढळलेल्या अनोळखी इसमाचा उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. अनोळखी पुरुष वय ४५ ते ५० वर्षे हा ५ फेब्रुवारी रोजी पुणे विजापूर वरील केगाव ते हत्तुरकडे जाणाऱ्या बायपास हायवे रोडवरील देशमुख पाटील वस्ती जवळ ब्रिजच्या फुटपाथवर बेशुद्ध अवस्थेत मिळून आल्याने त्याला उपचारासाठी फौजदार चावडी पोलीस ठाण्याचे एम.एल. गायकवाड यांनी शासकीय रुग्णालय येथे दाखल केले होते.

**Change In Name**

I HERE BY DECLARE THAT MY OLD NAME : ASIF MUSHTAQUE SHAIKH HAS BEEN CHANGED TO NEW NAME : ASIF MUSTAK SHAIKH (ADDRESS SHIVGANGA NAGAR NAI JINDGI.413003) KINDLY NOTE THE SAME

**मध्य रेल्वे**

सोलापूर विभाग

विद्युत कामे

मध्य रेल्वे, सोलापूर येथील वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (TRD), भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्या वतीने रेल्वे ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट www.ireps.gov.in वर खालील कामांसाठी प्रतिष्ठित, अनुभवी आणि परवानाधारक विद्युत कंत्राटदारांकडून ऑनलाइन ई-निविदा मागवत आहेत. निविदा क्रमांक SUR/TD/T/2025/26R, कामाचे नाव: टिकेकरवाडी येथील प्रस्तावित कोचिंग मेंटेनन्स डेपो (फेज-1) (पुनर्निमंत्रण) च्या संदर्भात कामाचा विद्युत TRD भाग अंदाजे किंमत: 5,62,96,465.20. बोली सुरक्षा: 4,31,500/-, पूर्ण कालावधी: 12 महिने. ऑफरची वैधता: 60 दिवस. वेबसाइटवर निविदा बंद होण्याची तारीख आणि वेळ: 02.03.2026 दुपारी 15.00 वाजता. EXP-06

तिकिटांसाठी UTS ॲप डाउनलोड करा

# विरोधाला न जुमानता बाळीवेस परिसरात अतिक्रमण विरोधात कारवाई

## टपरी चालकांची अरेरावी, महिलेने थेट महापालिकेच्या गाडीसमोर घातले लोटांगण

### दोन खोके, एक दालचावलची गाडी केली निष्काशीत




**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ५ फेब्रुवारी-**

सोलापूर महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक पथकाच्या वतीने आज पुन्हा कस्तुरबा मंडई आणि बाळीवेस परिसरात अतिक्रमण हटाव मोहीम राबवण्यात आली. टपरी चालकांची अरेरावी केली तर एका महिलेने थेट महापालिकेच्या गाडीसमोर लोटांगण घातले. या ठिकाणी विरोधाला न जुमानता अखेर कारवाई पूर्ण करण्यात आली. दोन खोके, एक दाल चावलची गाडी केली निष्काशीत करण्यात आली.

सोलापूर महापालिकेच्या अतिक्रमण प्रतिबंधक विभागाची शहरभर धडक कारवाई सुरू आहे. गुरुवारी बाळीवेस कस्तुरबा मार्केट परिसरात करण्यात आलेल्या अतिक्रमण हटाव कारवाईदरम्यान टपरी चालक व फेरीवाले यांनी थेट महापालिका अधिकाऱ्यांसोबत अरेरावी करत कारवाईला विरोध केला. या वेळी एका दाल-चावल गाडी चालवणाऱ्या महिलेने महापालिकेच्या वाहनासमोरच लोटांगण घालत कारवाई रोखण्याचा प्रयत्न केल्याने परिसरात काही काळ तणाव निर्माण झाला.

कस्तुरबा मार्केट हा शहरातील वर्दळीचा भाग असून येथे मोठ्या प्रमाणावर अवैध टपऱ्या व फेरी व्यवसाय सुरू असल्याने वाहतुकीस अडथळे निर्माण होत होता. नागरिकांच्या तक्रारीनंतर महापालिकेच्या अतिक्रमण विभागाने गुरुवारी सकाळी कारवाई हाती घेतली. मात्र, कारवाई सुरू होताच संबंधित टपरी चालक आणि फेरीवाल्यांनी अधिकाऱ्यांवर दबाव टाकण्याचा प्रयत्न करत जोरदार आरडाओरडा केला.

दरम्यान, एका महिला फेरीवाल्याने 'माझी गाडी भरून घेतल्याशिवाय मी उठणार नाही,' अशी भूमिका घेत थेट अतिक्रमण विभागाच्या वाहनासमोरच लोटांगण घातले. अचानक घडलेल्या या प्रकारामुळे उपस्थित अधिकाऱ्यांची तारांबळ उडाली. अखेर संबंधित महिलेला सम जावून सांगत परिस्थिती नियंत्रणात आणण्यात आली. पोलीस बंदोबस्तात विरोधाला न जुमानता अखेर कारवाई पूर्ण करण्यात आली. दोन खोके, एक दालचावलची गाडी केली निष्काशीत करण्यात आली.

महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या आदेशानुसार उपअभियंता तपन डंके यांच्या नियंत्रणाखाली या विभागाचे अधीक्षक जगन्नाथ बनसोडे यांच्या माध्यमातून मोहीम राबविण्यात येत आहे. सार्वजनिक रस्ते व बाजारपेठा अतिक्रमणमुक्त ठेवणे, वाहतूक सुरळीत करण्यात येत आहे. वारंवार सूचना देऊनही नियमांचे उल्लंघन होत असल्याने कठोर कारवाई करावी लागत आहे. यापुढेही नियम मोडणाऱ्यांवर कारवाई सुरूच राहणार असल्याचा इशारा महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे अधीक्षक जगन्नाथ बनसोडे यांनी दिला आहे.




## 'एमआयटी'तर्फे विविध सामाजिक उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ फेब्रुवारी-**

एमआयटी विश्वशांती गुरुकुल स्कूल व ज्युनियर कॉलेजतर्फे माईर्स एमआयटी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्सचे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ कराड यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमांने साजरा करण्यात आला. विश्वशांती प्रार्थनेने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रा. डॉ. विश्वनाथ कराड यांच्या प्रेरणादायी जीवनकार्याचा, मानवतावादी मूल्यांचा तसेच शिक्षण व समाजासाठी दिलेल्या अमूल्य योगदानाचा गौरव यावेळी करण्यात आला.

डॉ. कराड यांच्या जीवनकार्याची, दूरदृष्टीची व राष्ट्रनिर्माणासाठी असलेल्या त्यांच्या समर्पणाची संक्षिप्त पण प्रभावी ओळख विद्यार्थ्यांना त्यांच्या प्रेरणादायी जीवनप्रवासावर आधारित विशेष चित्रफीतीच्या माध्यमातून करून देण्यात आली. विद्यार्थ्यांनी त्यांच्या शांतता, मानवता आणि विश्वबंधुत्वाच्या तत्त्वज्ञानावर आधारित विचार व भाषणे सादर करून कार्यक्रम अधिक प्रेरणादायी केला.

मुख्याध्यापिका रेखा पाटील यांनी उपस्थितांना संबोधित करत डॉ. कराड यांच्या आदर्शांचा दैनंदिन जीवनात अंगीकार करण्याचे आवाहन केले. प्राचार्य राजकुमार गायकवाड यांनी विद्यार्थ्यांना प्रा. डॉ. कराड यांचा संघर्ष, दृढनिश्चय आणि दूरदृष्टीपूर्ण विचारांची ओळख करून दिली. तसेच कठोर परिश्रम, शिस्त आणि सामाजिक जबाबदारीच्या जाणिवेची प्रेरणा आपण सर्वांनी डॉ. कराड सरांच्या जीवनप्रवासातून घेतली पाहिजे, असे मनोगत त्यांनी व्यक्त केले.

याप्रसंगी सामाजिक बांधिलकी जपत विद्यार्थी व विश्वशांती गुरुकुलच्या कर्मचाऱ्यांमार्फत गरजूंसाठी कपडे, स्टेशनरी, खाद्यपदार्थ व इतर आवश्यक वस्तू जमा करण्यात आल्या. यानंतर शिक्षक व विद्यार्थ्यांनी प्रार्थना फाउंडेशनच्या अनाथ आश्रमाला प्रत्यक्ष भेट देऊन सर्व वस्तूंचे वाटप केले. यावेळी फाउंडेशनचे प्रसाद मोहिते उपस्थित होते.



## महापालिकेतर्फे पत्रकार दिनानिमित्त पत्रकारांचा सन्मान

**सोलापूर, दि. ५ फेब्रुवारी-**

पत्रकारिता हा लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे. सोलापूरला जाज्वल्य पत्रकारितेचा इतिहास असून ही परंपरा जोपासण्याचे काम पत्रकारितेमधील विद्यमान पिढीकडून होत आहेत, असे गौरवोद्गार महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी काढले. पत्रकार दिनानिमित्त सोलापूर महापालिकेच्यावतीने आयोजित पत्रकारांच्या सन्मान सोहळ्यात ते बोलत होते. या कार्यक्रमात आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या हस्ते याप्रसंगी विविध वृत्तपत्र व वाहिन्यांच्या पत्रकारांचा सन्मान करण्यात आला. यावेळी महापालिका अतिरिक्त आयुक्त वीणा पवार, उपायुक्त आशिष लोकरे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी महापालिका पत्रकार संघाच्या वतीने अध्यक्ष किरण बनसोडे यांच्या हस्ते आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांचा सत्कार करण्यात आला.

अतिरिक्त आयुक्त वीणा पवार यांनी प्रास्ताविक केले. यावेळी अध्यक्ष किरण बनसोडे यांनी म हापालिका आयुक्त डॉ. ओम्बासे यांनी गेल्या ३४९ दिवसांमध्ये केलेल्या वैशिष्ट्यपूर्ण कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख केला. यावेळी महापालिकेचे जनसंपर्क अधिकारी गणेश बिराजदार, राजपाल जेटीथोर आदी उपस्थित होते. कामगार कल्याण व जनसंपर्क अधिकारी अजितकुमार खानसोळे यांनी सूत्रसंचालन केले.

## बनावट उत्पादनांविरोधात लढा देण्यासाठी टाटा सॉल्टची मोहीम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ फेब्रुवारी-**

भारतातील आयोडाइज्ड मीठ विभागात १९८३ पासून अग्रणी आणि बाजारातील आघाडीचा ब्रँड असलेल्या टाटा सॉल्टतर्फे 'हर नारंगी पॅक टाटा नमक नही होता' हा ठाम संदेश देत, बनावट मीठ पॅकविरोधात लढ्याचे नेतृत्व करण्यात येत आहे. विशेषतः उत्तर प्रदेशमध्ये मोठ्या प्रमाणावर अस्तित्वात असलेल्या असंघटित मीठ बाजारपेठेत आणि बनावट मीठ पॅकच्या वाढत्या प्रमाणाच्या पार्श्वभूमीवर शुद्धता व विश्वासाचे नवे मापदंड प्रस्थापित करत, ही जाहीर घोषणा टाटा सॉल्टच्या उत्कृष्ट दर्जाचे मीठ पुरवण्याच्या ठाम वचनबध्दतेचे प्रतीक आहे. 'हर नारंगी पॅक टाटा नमक नही होता' या घोषणेचा उद्देश प्रत्येक केशरी रंगाचा पॅक टाटा सॉल्टचाच नसतो, याबाबत जनजागृती करण्याचा आहे.

**Karmayogi Sudhakarpant Paricharak Pandurang Sahakari Sakhar Karkhana Ltd., Shreepur**

Shreepur, Tal- Malshiras Dist - Solapur. Pin Code - 413112
Phone-02185-255233, 255344. Email ID-spssk sugar@yahoo.com

**DECLARATION OF PURCHASE NOTICE**

We are inviting Quotations / Offers for Purchasing Consumable Materials & Services against our Enquiries for crushing season 2026-2027. The purchase notice is displayed on our official web site - http://www.pandurangsugar.com

**Dr. Yashwant Kulkarni** Managing Director | **K.S.Khule** Vice Chairman | **Prashantrao Paricharak** Hon. Charirman

**जाहीर नोटीस**

**पावती हरवली आहे**

श्री. शिरीष महाबळेश्वर गवसाने राहणार वैराग ता बार्शी यांनी महाराष्ट्र वखार महामंडळ , पुणे यांनी चालवलेल्या बार्शी ता बार्शी येथील वेअरहाऊस मध्ये ५४६ कट्टे सोयाबीन पावती क्रमांक १८०८१०४९३३ दिनांक १७ /१० /२०२५ व २०५ कट्टे सोयाबीन पावती क्रमांक १८०८१०४९४२ दिनांक १८ /१० /२०२५ बार्शी वेअरहाऊस मध्ये साठवणुकीत आहे .वर निर्देशित केलेल्या माल ठेवणाऱ्याने वर दाखविलेल्या मालाबद्दल वेअर हाऊस पावती क्रमांक १८०८१०४९३३ दिनांक १७/१०/२०२५ व पावती क्रमांक १८०८१०४९४२ दिनांक १८/१०/२०२५ गहाळ झाली आहे. व ती सापडत नसल्याबद्दल आम्हास कळविले आहे . त्याबद्दल या नोटीसीद्वारे मालाची वेअर हाऊस पावती कोणास सापडली असल्यास अगर मिळाली असल्यास ती धारण करणाऱ्या वर नमूद केलेली वखार पावती ७ ( सात ) दिवसाच्या आत (जाहिरातीच्या) दिनांकापासून आमच्या ऑफिसमध्ये वेअर हाऊसमन बार्शी यांच्या समोर कार्यालयीन वेळेत हजर करावी व स्वतःच्या कोणत्याही प्रकारचा बोजा अगर मासिक हक्क काही प्रस्थापित करावा. वरील वेअर हाऊस पावती व तक्रार अगर हक्क काही प्रस्थापित न केल्यास वर नमूद केलेल्या माल ठेवणाऱ्याला डुप्लिकेट रिसीट आणल्यास ती रद्दबातल समजली जाऊन त्याबद्दल कोणताही विचार केला जाणार नाही.

**ठिकाण - बार्शी**
**तारीख - ५/२/२०२६**

**सही/-**
**कार्यालय साठा अधीक्षक**
**महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ**
**बार्शी, जि. सोलापूर**

**मध्य रेल्वे**

सोलापूर विभाग

विविध कामे

विभागीय रेल्वे व्यवस्थापक (काम), मध्य रेल्वे, सोलापूर, राष्ट्रपतींच्या वतीने, खालील कामांसाठी नामांकित फ्लाईम/ठेकेदाराकडून ई-निविदा मागवत आहेत. निविदा सूचना क्रमांक 01-2026-SrDENC, कामाचे नाव: (1) लातूर स्थानकावरील पीएफ-02 च्या रुंदीमध्ये वाढ करण्याची तरतूद. (2) एडीईएन/पीव्हीआर उपविभागांतर्गत रेल्वे वसाहतींमध्ये संपर्क रस्त्याची तरतूद. कामाची अंदाजे किंमत: 75413262.26. बयाणा रक्कम: 527100.00, काम पूर्ण करण्याचा कालावधी: 6 महिने. देखभाल कालावधी: 12 महिने. www.ireps.gov.in वेबसाइटवर कोट केलेल्या निविदा अपलोड करण्याची अंतिम तारीख आणि वेळ: 23.02.2026 दुपारी 3.00 वाजेपर्यंत. www.ireps.gov.in वर निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ: 23.02.2026 दुपारी 3.30 वाजता. संभाव्य निविदाधारकांना निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी या निविदेसाठी जारी केलेले कोणतेही बदल/शुद्धीपत्रक लक्षात घेण्यासाठी वेबसाइटला वारंवार भेट देण्याचा सल्ला देण्यात येत आहे. वेबसाइट: www.ireps.gov.in EXP-05

तिकिटांसाठी UTS ॲप डाउनलोड करा

**राज्यकर सहआयुक्त, (व्हॅट प्रशा) सोलापूर**
**वस्तू व सेवाकर भवन, होटगी रोड,**
**सोलापूर - ४१३००३**
**दुरध्वनी - ०२१७.२६००८२१**

**ई-निवीदा सुचना**

वस्तू व सेवाकर कार्यालय सोलापूर, या कार्यालयाकडून खालील नमुद केलेल्या कामासाठी ई- टेंडरिंग पध्दतीने निविदा मागविण्यात येत आहे.

| कामाचे नाव | निविदा रक्कम | कामाची मुदत | इसारा रक्कम | अनामत रक्कम | निविदा फॉर्म फी |
|---|---|---|---|---|---|
| वस्तू व सेवा कर कार्यालय सोलापूर, या कार्यालयातील साफसफाई करण्यास कंत्राटी पध्दतीवर दोन सफाईगार पुरविणे. | रू. ११,०७,६००/- | ३० महिने | रू. ११,०७६/- | रू.५५,३८०/- | ५०० |

**निविदेचे वेळापत्रक**

| | |
|---|---|
| ई-निविदा उपलब्ध कालावधी | दि. १०/०२/२०२६ ते २३/०२/२०२६. |
| ई-निविदा अंतिम वेळ व दिनांक | दि. २३/०२/२०२६ दुपारी ३.०० वा. |
| निविदा उघडण्याचा दिनांक | दि. २४/०२/२०२६ दुपारी ३.०० वा. |

निविदा सुचनेची संपुर्ण माहिती अटी व शर्ती, निविदा शेडयूल्ड ईत्यादी बाबतची माहिती www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. कोणतेही कारण न देता निविदा पुर्णतः किंवा अंशतः मंजुर अथवा नामंजुर करण्याचा अधिकार मा. राज्यकर सहआयुक्त सोलापूर यांनी स्वतःकडे राखून ठेवला आहे.

**सही/-**
**सुधीर ना. चेके**
**राज्यकर सहआयुक्त (प्रशा)**
**सोलापूर विभाग, सोलापूर.**

**विमाका/पुणे/जाहि. /३०३/२०२५-२६**

**जाहीर प्रसिध्दीकरण**

दि. कि. अर्ज नं. ४/२०२६
नि-५

**बार्शी येथील मे. सिव्हील जज्ञज्युनिअर डिव्हीजन सो. यांचे कोर्टात**

१) श्रीमती उज्वला प्रकाश स्वामी, वय ६७ वर्षे,
धंदा - घरकाम, रा. शेळगांव (आर),
ता. बार्शी, जि. सोलापूर
२) गौरीशंकर प्रकाश स्वामी, वय- ३६ वर्षे,
धंदा - शेती, रा. सदर -- **अर्जदार**
३) शिवशंकर प्रकाश स्वामी, वय- ३९ वर्षे,
धंदा - नोकरी, रा. सदर
४) कल्पना गणेश मठपती, वय- ४१ वर्षे,
धंदा - घरकाम, रा. वैराग, ता. बार्शी, जि. सोलापूर

**विरूध्द**

कोणी नाही -- **सा.वाला**

**अर्ज वारस दाखला मिळणेबाबत**

**ज्या अर्थी,** यातील अर्जदार नं. १ श्रीमती उज्वला प्रकाश स्वामी हि अर्जदार नं. २ ते ४ याची आई असून मयत कै. प्रकाश भिमाशंकर स्वामी यांची पत्नी व मुले आहे. मयत कै. प्रकाश भिमाशंकर स्वामी हे ता. १९/१०/२०२० रोजी मयत झालेले आहेत. मयत कै. प्रकाश भिमाशंकर स्वामी यांचे पश्चात यातील अर्जदार नं. १ ते ४ हेच जवळचे व कायदेशीर वारस आहेत. यातील अर्जदारांशिवाय मयत कै. प्रकाश भिमाशंकर स्वामी यांना दूसरे कोणीही जवळचे वारस नव्हते व नाहीत.

मयत जयंत कै. प्रकाश भिमाशंकर स्वामी यांचे बँक ऑफ इंडिया, शाखा शेळगांव (आर) येथे बचत खाते क्र. ०७४२१०१००००२७७० असून त्यामध्ये दि.०१/०८/२०२२ अखेर र.रू. १,१५,९५७-१७ पैसे एवढी रक्कम जमा आहे. वरील रक्कम वारस हक्काने यातील अर्जदार नं. १ ते ४ यांना कायद्याने मिळणे जरुरीचे आहे. त्यामुळे अर्जदार यांनी वारस प्रमाणपत्र (Succession Certificate) मिळणेसाठी सदरचा अर्ज केला आहे.

त्या अर्थी, सदर अर्जदार यांचे व्यतिरीक्त मयत कै. प्रकाश भिमाशंकर स्वामी यांचे पश्चात इतर कोणाचा वारसाहक्क हित संबंध असलेस त्यांनी सदर जाहीर प्रसिध्दी करणापासून ३० दिवसाचे आत किंवा नेमली ता. १८/०३/२०२६ रोजी सदरकामी हजर राहून आपले म्हणणे वा हरकत लेखी स्वरूपात पुराव्यानिशी दाखल करावी मुदतीत कोणाची हरकत वा म्हणणे आले नाही. तर कोणाचे काही म्हणणे नाही असे समजून यातील अर्जदारांना अर्जाप्रमाणे वारस दाखला देणेत येईल.

कळावे हे प्रसिध्दीकरण मे. कोर्टाचे सहीशिक्क्यानिशी दिले असे. ता. ४/२/२०२६

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहाय्यक अधिक्षक**
**मा. दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर बार्शी**

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांना विषेषतः कासारवाडी व बार्शी तालुक्यातील लोकांना आमचे आशिलांनी तोंडी माहिती दिल्यावरुन व जाहीर नोटीस देण्यास सांगितलेवरुन या जाहीर नोटीशीने कळविणेत येते की,

मिळकतीचे वर्णन डि सोलापूर सब डि व ता. बार्शी पैकी ग्रा.पं. मौजे कासारवाडी हद्दीतील खुली जागा याचा तपशिल ग्रा. पं. घर नं. ६३५/अ **ज्याचे क्षेत्रफळ २७९४ चौ. फुट** याचे चौ.मी २५९.६६ आहे, याचे मोजमाप ग्रा.पं. रेकॉर्डप्रमाणे पुर्वपश्चिम फुट ४२.६ व दक्षिणोत्तर फुट ६५.६ आहे. संपुर्ण खुली, यासी चतुः सिमा पुर्वेस- क्षिरसागर यांची जागा, दक्षिणेस- ३० फुट रुंदीचा रस्ता, पश्चिमेस -गलांडे यांची जागा, व उत्तरेस - गुंड यांची जागा आहे. याचे पाणी व वागणुक दक्षिण बाजुचे रस्त्याने जाते व आहे.

वरील वर्णनाची खुली जागा ही फारुक रफीक बागवान रा. बार्शी यांचे खरेदी मालकीची असुन मालकी हक्कपत्रकी ग्रा.पं. कासारवाडी यांचे रेकॉर्डला मालक म्हणुन त्यांचे नावावर दाखल आहे. व त्यांचे कबजात आहे. वर नमुद जागा फारुक रफिक बागवान यांनी आमचे आशिलांना कायम स्वरुपी विक्री करणेचे ठरविले असुन सदर जागा विक्रीच्या ठरलेल्या किंमतीपैकी आमचे आशिलाकडून इसाराची रक्कम रोख घेतलेली आहे. सदर जागेचे रजिस्टर खरेदीखत ता. १६/०२/२०२६ रोजी करणेचे ठरलेले आहे. वर नमुद जागा ही निर्वेध निजोखमी, बिनकर्जी व बिनबोजाची असलेचा भरवसा फारुक बागवान यांनी आमचे आशिलांना दिलेला आहे.

तरी वरील वर्णनाच्या जागेबाबत जर कोणाचा काही हक्क, हितसंबंध, गहाण, दान, मालकी, टाच, पोटगी, जप्ती, बोजा, भाडेपट्टा, बक्षीस, साठेखत, बँकलोन, दावा, वा अन्य कोणताही कायदेशीर हक्क, हितसंबध असल्यास त्याबाबतची लेखी माहिती आमचे आशिलांना खालील पत्त्यावर नोटीस प्रसिध्द झालेपासुन आठ दिवसात कळवावी, मुदतीत कोणाची काही हरकत वा तक्रार न आल्यास सदरजागेचा खरेदीखताचा व्यवहार आमचे आशिल पुर्ण करतील त्यानंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची तक्रार चालणार नाही. व आमचे आशिलाचे खरेदीखतावर त्याचा कसलाही कायदेशीर परिणाम होणार नाही. याची नोंद घ्यावी. ही जाहीर नोटीस दिली दिनांक ५/०२/२०२६.

**सही/-**
**ॲड. श्री मोहन जाधव रा. बार्शी**
रा. घ.नं. २, कसबापेठ, बार्शी जि. सोलापूर
मोबाईल नं. ९४२२६ ५२३३६
**अशिलातर्फे ॲडव्होकेट बार्शी**

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांना विशेषतः कासारवाडी व बार्शी तालुक्यातील लोकांना आमचे आशिलांनी तोंडी माहिती दिल्यावरुन व जाहीर नोटीस देण्यास सांगितलेवरुन या जाहीर नोटीशीने कळविणेत येते की,

मिळकतीचे वर्णन - डि सोलापूर सब डि व ता. बार्शी येथील प्रभाव क्षेत्राखालील मौजे कासारवाडी येथील जागा, जि.प.सोलापूर व ता.पं.समिती बार्शी प्रभाव क्षेत्राखालील मौजे कासारवाडी गावठाण हद्दीतील खुली जागा तिचा तपशिल **ग्रा.पं.घ.नं. ६३५/ब याचे क्षेत्र १५०८.०० चौ. फुट चे** चौ.मी १४०.१४ अशी खुली जागा. याची मोजमापे पुर्वपश्चिम बाजु फुट ६५.५ व दक्षिणोत्तर बाजु फुट २३.०० आहे. यासी चतुःसिमा पुर्वेस - शेळके यांची जागा, दक्षिणेस - ३० फुट रुंदीचा रस्ता, पश्चिमेस -खांडवीकर यांची जमिन, व उत्तरेस - गुंड यांची जागा आहे. याचे पाणी व वागणुक दक्षिण बाजुचे रस्त्याने जाते व आहे. येणे प्रमाणे खुली जागा.

वरील वर्णनाची खुली जागा ही सिध्दिक रफिकसो. बागवान रा. बार्शी यांचे खरेदी मालकीची असुन मालकी हक्कपत्रकी ग्रा.पं. कासारवाडी यांचे रेकॉर्डला मालक म्हणुन त्यांचे नावावर दाखल आहे. व त्यांचे कबजात आहे. वर नमुद जागा सिध्दिक बागवान यांनी आमचे आशिलांना कायम स्वरुपी विक्री करणेचे ठरविले असुन सदर जागा विक्रीच्या ठरलेल्या किंमतीपैकी आमचे आशिलाकडून इसाराची रक्कम रोख घेतलेली आहे. सदर जागेचे रजिस्टर खरेदीखत ता. १६/०२/२०२६ रोजी करणेचे ठरलेले आहे. वर नमुद जागा ही निर्वेध निजोखमी, बिनकर्जी व विनबोजाची असलेचा भरवसा सिध्दिक बागवान यांनी आमचे आशिलांना दिलेला आहे.

तरी वरील वर्णनाच्या जागेबाबत जर कोणाचा काही हक्क, हितसंबंध, गहाण, दान, मालकी, टाच, पोटगी, जप्ती, बोजा, भाडेपट्टा, बक्षीस, साठेखत, बँकलोन, दावा, वा अन्य कोणताही कायदेशीर हक्क, हितसंबध असल्यास त्याबाबतची लेखी माहिती आमचे आशिलांना खालील पत्त्यावर नोटीस प्रसिध्द झालेपासुन आठ दिवसात कळवावी, मुदतीत कोणाची काही हरकत वा तक्रार न आल्यास सदरजागेचा खरेदीखताचा व्यवहार आमचे आशिल पुर्ण करतील त्यानंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची तक्रार चालणार नाही. व आमचे आशिलाचे खरेदीखतावर त्याचा कसलाही कायदेशीर परिणाम होणार नाही. याची नोंद घ्यावी. ही जाहीर नोटीस दिली दिनांक ५/०२/२०२६.

**सही/-**
**ॲड. श्री मोहन जाधव रा. बार्शी**
रा. घ.नं. २, कसबापेठ, बार्शी जि. सोलापूर
मोबाईल नं. ९४२२६ ५२३३६
**अशिलातर्फे ॲडव्होकेट बार्शी,**

## महत्त्वाचे

### झाग्रेब रँकिंग कुस्तीत सुजीत कालकलला सुवर्ण

**झाग्रेब :** भारताने झाग्रेब आंतरराष्ट्रीय रँकिंग मालिका कुस्ती स्पर्धेत शानदार सुरुवात केली. भारताने पुरुषांच्या फ्रीस्टाइल कुस्तीमध्ये पहिल्या दिवसाअखेर एक सुवर्ण, एक रौप्य आणि एक कांस्यपदक जिंकले. एकमेव सुवर्णपदक सुजीत कालकलने पुरुषांच्या ६५ किलो गटाचे विजेतेपद जिंकले. पॅरिस ऑलिम्पिक कांस्यपदक विजेता अमन सेहरावतने ६१ किलो वजनी गटात रौप्यपदक पटकावले. अमनने जॉर्जियाच्या जॉर्जी गोनियाश्विलीला १०-० व इराणच्या रझा मोमेनिजोउजादेहला १२-२ असे हरवले. तिसऱ्या फेरीत अमनला अमेरिकेच्या ऑस्टिन डीसँटोने रोखले. ७० किलो वजनी गटात अभिमन्यू मांडवालने कांस्यपदक मिळवले. त्याने कांस्यपदकाच्या सामन्यात इयान पार्कर (अमेरिका) विरुद्ध ६-३ असा विजय मिळवून पुनरागमन केले. दरम्यान, मुकुल दहियाने ८६ किलो वजनी गटातील कांस्यपदकाच्या सामन्यात थोडक्यात संधी गमावली, त्याला इराणच्या अली सवादकोहीकडून ५-६ असा पराभव पत्करावा लागला.

### शेअर बाजार

| | |
|---|---|
| **सेन्सेक्स** | ८३,३१३.९३ (-५०३.७६) |
| **निफ्टी** | २५,६४२.८० (-१३३.२०) |



### सराफा

| | |
|---|---|
| **सोने** (स्टँण्डर्ड/१० ग्रॅम) | रु. १,५१,३०० |
| **चांदी** (प्रतिकिलो) | रु. २,६१,६०० |

### तापमान

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| सोलापूर | ३२.६ | १९.१ |
| अमरावती | ३१.० | १६.१ |
| भंडारा | ३०.० | १६.० |
| बुलडाणा | ३१.७ | १६.२ |
| चंद्रपूर | ३२.४ | १६.८ |
| गडचिरोली | ३१.२ | १६.० |
| गोंदिया | ३०.२ | १४.८ |
| नागपूर | ३०.९ | १४.६ |
| वर्धा | ३२.० | १५.४ |
| वाशीम | ३१.८ | १४.२ |
| यवतमाळ | ३०.७ | १२.० |

# भारत सहाव्यांदा विश्वचषक जिंकण्यास उत्सुक

## इंग्लंडविरुद्धच्या अंतिम सामन्यासाठी सज्ज ● कर्णधार आयुष म्हात्रे, जॉर्ज फॉर्मात

**♦ हरारे, ५ फेब्रुवारी**

आयसीसरी १९ वर्षांखालील क्रिकेट स्पर्धेत शुक्रवारी येथील हरारे स्पोर्ट्स क्लबवर भारत आणि इंग्लंड याच्यादरम्यान अंतिम सामना खेळला जाणार आहे. भारताचा युवा संघ विक्रमी सहाव्यांदा विश्वविजेतेपद जिंकण्यास उत्सुक आहे, तर इंग्लंड आपल्या दुसऱ्या १९ वर्षांखालील विश्वचषक विजेतेपदासाठी प्रयत्न करत आहेत. इंग्लंडने पहिले विजेतेपद १९९८ मध्ये मिळाले होते.

भारताची निर्णायक झुंज कडव्या इंग्लंड संघाशी होणार असल्यामुळे हा सामना अत्यंत चुरशीचा होण्याची शक्यता आहे.

भारतीय संघ आपल्या धडाकेबाज फलंदाजी फळीवर अवलंबून असेल. कर्णधार आयुष म्हात्रे व आरोन जॉर्ज पुन्हा फॉर्मात परतले आहे. या दोघांनी उपांत्य सामन्यात अफगाणिस्तानविरुद्ध मोठ्या धावसंख्येचा यशस्वी पाठलाग केला व भारताला विजय मिळवून दिला. हे पाच वेळा विजेतेपद पटकावलेल्या भारतासाठी शुभसंकेत आहे. भारताने २०१२ मध्ये शेवटचे विजेतेपद पटकावले होते आणि आता ते पुन्हा एकदा ही विश्वचषक जिंकण्याचे लक्ष्य ठेवत आहेत.



### दोन्ही संघ आतापर्यंत अपराजित

भारताने अमेरिकेविरुद्धच्या पहिल्या गट सामन्यापासूनच जबरदस्त निर्धार दाखवला आहे. भारताने उपांत्य सामन्यात अफगाणिस्तान संघाचा धुव्वा उडवला व आपला अपराजित विक्रम कायम ठेवला.

आता भारतासमोर इंग्लंडच्या रूपाने आणखी एक अपराजित संघ आहे. इंग्लंडने गतविजेत्या ऑस्ट्रेलियाला हरवून अंतिम फेरी गाठली आहे व त्यांचा आत्मविश्वास खूप उंचावलेला असेल, याची भारताला जाणीव आहे.

### वैभव सूर्यवंशीकडून खूप आशा

आता विजय मिळवण्यासाठी भारताला आपल्या संघात असलेल्या प्रतिभेला साजेशी सांघिक कामगिरी करावी लागेल. या संघात वैभव सूर्यवंशीसारखा प्रतिभावान फलंदाज आहे, त्याच्या आक्रमक फलंदाजीमुळे प्रतिस्पर्धी संघांना प्रत्युत्तर देताना संघर्ष करावा लागला. पुढील महिन्यात १५ वर्षांचा होणारा वैभव सूर्यवंशीने आतापर्यंत तीन अर्धशतके व एक धडाकेबाज शतक झळकावले आहे. अंतिम सामन्यातील त्याचे शतक भारताला विजेतेपदापर्यंत पोहोचवणारे प्रमुख कारण ठरू शकते.



### मॅनी लम्सडेन डोकेदुखी ठरू शकतो

तथापि, वैभवला इंग्लंडच्या मजबूत वेगवान गोलंदाजी आक्रमणाविरुद्ध सावधगिरी बाळगावी लागेल. या गोलंदाजी विभागाचे नेतृत्व मॅनी लम्सडेन करत आहे. जर भारताच्या आघाडीच्या फलंदाजांनी निष्काळजीपणे फटकेबाजी केली, तर तो त्यांच्यासाठी मोठी डोकेदुखी ठरू शकतो. या जागतिक वयोगट स्पर्धेच्या अंतिम सामन्यांमधील भारताचा विक्रम उत्कृष्ट आहे. भारताने आतापर्यंत दहाव्यांदा अंतिम फेरी गाठली आहे. २०१२ च्या वेस्ट इंडीजमधील स्पर्धेत अंतिम सामन्यात इंग्लंडला हरवल्यामुळे इतिहासही भारताच्या बाजूने आहे. या स्पर्धेत भारताकडून विहान मल्होत्राने अनेक उत्कृष्ट खेळी खेळली आहे. यष्टिरक्षक-फलंदाज अभिज्ञान कुंडूने दोन अर्धशतके व यष्टिमागे उत्तम कामगिरी करून आपले महत्त्व सिद्ध केले आहे. त्यामुळे भारताच्या मधल्या फळीला अधिक मजबुती मिळाली आहे.



दीपेश देवेंद्रन, हेनिल पटेल आणि आर.एस. अंबरीश यांचा समावेश असलेल्या भारतीय वेगवान गोलंदाजी विभागाने आतापर्यंत चांगली कामगिरी केली आहे. कनिष्क चौहान व खिलान पटेल या फिरकी गोलंदाजांच्या जोडीवर अधिक अवलंबून राहू शकतो, तथापि अंतिम निर्णय खेळपट्टीच्या परिस्थितीवर अवलंबून असेल.

> **भारत- इंग्लंड अंतिम सामना आज**
>
> **स्थळ** : हरारे स्पोर्ट्स क्लब, हरारे
>
> **वेळ** : दुपारी १:०० वाजतापासून
>
> **थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्स व जिओ हॉट स्टार ॲपवर

### मॅनी लम्सडेनचे १५ बळी

इंग्लंडच्या मॅनी लम्सडेनने १५ बळी घेऊन आघाडी घेतली आहे. स्पर्धेतील सर्वाधिक बळी घेणाऱ्या पहिल्या पाच गोलंदाजांमध्ये एकाही भारतीय गोलंदाजाचा समावेश नसणे ही एक किरकोळ चिंतेची बाब असू शकते.

इंग्लंड आपल्या सर्वाधिक धावा करणाऱ्या फलंदाजांवर मोठ्या प्रमाणावर अवलंबून असेल. बेन मेयस १९१ धावांची सर्वोच्च खेळी व दोन अर्धशतकांसह उत्कृष्ट फॉर्ममध्ये आहे, त्यामुळे तो ३९९ धावांसह स्पर्धेतील दुसरा सर्वाधिक धावा करणारा फलंदाज बनला आहे. ◂(वृत्तसंस्था)

# आम्ही कोलंबोला जात आहोत : सूर्यकुमार

**♦ मुंबई, ५ फेब्रुवारी**

जरी शेजारील देशाने सामन्यावर बहिष्कार टाकण्याची घोषणा केली असली तरी, आमचा भारतीय संघ पाकिस्तानविरुद्धच्या आयसीसी टी-२० विश्वचषक सामन्यासाठी कोलंबोला जात आहे, असे भारताचा कर्णधार सूर्यकुमार यादवने गुरुवारी सांगितले.



भारताचा सामना १५ फेब्रुवारी रोजी पारंपरिक प्रतिस्पर्धी पाकिस्तानशी होणार आहे, परंतु सुरक्षेच्या कारणास्तव भारतात खेळण्यास नकार दिल्यामुळे बांगलादेशच्या जागी स्कॉटलंडला स्थान दिल्यानंतर पाकिस्तानच्या क्रिकेट संघाला त्यांच्या सरकारने भारताविरुद्धचा सामना न खेळण्यास सांगितले आहे.

मला वाटते की त्यांचा निर्णय माझ्या नियंत्रणात नाही. त्यांची निर्णय घेण्याची शक्ती माझ्याकडे असती तर बरे झाले असते, पण तो त्यांचा निर्णय आहे. आम्ही आशिया चषकामध्येही खेळलो होतो व आम्ही त्यांच्याशी तीन वेळा खेळलो, असे सूर्यकुमारने येथील स्पर्धेपूर्वीच्या कर्णधारांच्या पत्रकार परिषदेत सांगितले.टी-२० विश्वचषक स्पर्धा शनिवारी सुरू होत आहे व भारत त्याच सायंकाळी आपल्या पहिल्या सामन्यात अमेरिकेशी झुंजणार आहे.

आमची मानसिकता अगदी स्पष्ट आहे. आम्ही पाकिस्तानविरुद्ध खेळण्यास नाही म्हटलेले नाही. त्यांनी म्हटले आहे. आयसीसीने वेळापत्रक दिले आहे. आमचे विमान तिकीट बुक झाले आहे आणि आम्ही कोलंबोला जात आहोत,असे तो म्हणाला.

आम्ही आधी ७ फेब्रुवारीला खेळणार आहोत, त्यानंतर आम्ही तिथे जाऊ अशी संघातील चर्चा अशी आहे, असे त्याने सांगितले.

आम्ही त्यांच्याविरुद्ध चांगला क्रिकेट खेळलो आहोत. आम्हाला सांगण्यात आले आहे की सामना १५ तारखेला आहे, सामना तटस्थ ठिकाणी आहे आणि आम्हाला संधी मिळाल्यास आम्ही खेळू. हा पाकिस्तानी खेळाडूंसाठी सुद्धा एक कठीण निर्णय आहे, असे त्याने निरीक्षण नोंदवले. ◂(वृत्तसंस्था)

**आशियाई नेमबाजी**

# सुरुची-राणाला रौप्यपदक

**♦ नवी दिल्ली, ५ फेब्रुवारी**

भारताची उदयोन्मुख नेमबाज सुरुची सिंग व विश्वविजेता सम्राट राणाने शानदार कामगिरी करत गुरुवारी येथे झालेल्या आशियाई नेमबाजी स्पर्धेत १० मीटर एअर पिस्तूल मिश्र सांघिक प्रकारात रौप्यपदक पटकावले.

बुधवारी ईशा सिंगने महिलांच्या एअर पिस्तूल प्रकारात सुवर्णपदक जिंकल्यामुळे उत्साहित असलेल्या भारतासाठी हा दिवस फलदायी ठरला, मात्र वरिष्ठ गटात त्यांना सर्वोच्च स्थान मिळवता आले नाही.



रौप्यपदक विजेती भारतीय जोडी सुरुची सिंग व सम्राट राणा (डावीकडे)

सुरुची-राणा जोडीने ४७९.६ गुण मिळवले असून हा एक नवीन जागतिक व आशियाई कनिष्ठ विक्रम आहे. उझबेकिस्तानने ४८१.३ गुणांच्या जागतिक विक्रमासह सुवर्णपदक जिंकले. चीन तैपेईने ४१२.२ गुणांसह तिसरे स्थान मिळविले.

भारतीय जोडीने दमदार सुरुवात करत पहिल्या मालिकेत १००.५ गुण मिळवून चार संघांच्या अंतिम फेरीत आघाडी घेतली.

परंतु उझबेकिस्तानची जोडी, निगिना सैदकुलोवा व मुखम्मद कमलोव तिसऱ्या मालिकेपर्यंत पुढे सरसावली आणि एलिमिनेशन टप्प्यातही आपली आघाडी कायम ठेवत सुवर्णपदक पटकावले.

१९ वर्षीय सुरुची सिंगने गत वर्षी चार आयएसएसएफ विश्वचषक सुवर्णपदके जिंकली होती आणि दोहा येथील हंगामाच्या अखेरीस झालेल्या विश्वचषक फायनलमध्ये अव्वल स्थान पटकावले होते व सम्राटने पात्रता फेरीत एकूण ५८३ गुणांसह वर्चस्व गाजवले.

दोन सुवर्ण, एक रौप्य आणि एक कांस्यपदकासह भारताच्या वरिष्ठ गटातील पदकांची संख्या आता चार झाली आहे: कनिष्ठ गटात गत वर्षीच्या कनिष्ठ विश्वचषक व आशियाई विजेत्याने आणखी एक सुवर्णपदक जिंकले, तिने २३७.९ गुणांसह महिलांच्या १० मीटर एअर पिस्तूल प्रकारात विजय मिळवला, तर तिची सहकारी वंशिका चौधरीने २३६.७ गुणांसह रौप्यपदक पटकावले. कनिष्ठ संघानेही सुवर्णपदक पटकावले. ◂(वृत्तसंस्था)

# बहिष्कार टाकण्याचा निर्णय योग्य, बांगलादेशला पाठिंबा

### पाकिस्तानची भूमिका

**♦ कराची, ५ फेब्रुवारी**

पाकिस्तानने भारताविरुद्धच्या टी-२० विश्वचषक सामन्यावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय योग्य असून बांगलादेशला पाठिंबा देण्यासाठी ही एक विचारपूर्वक घेतलेली भूमिका आहे, असे पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी म्हटले आहे.

सुरक्षेच्या कारणास्तव भारतात आपले सामने खेळण्यास नकार दिल्यामुळे बांगलादेशच्या जागी स्कॉटलंडची निवड करण्यात आल्यानंतर, सरकारने पाकिस्तानच्या क्रिकेट संघाला १५ फेब्रुवारी रोजी कोलंबो येथे होणारा सामना न खेळण्याचे निर्देश दिले आहेत. आम्ही टी-२० विश्वचषकाबाबत खूप स्पष्ट भूमिका घेतली आहे. आम्ही भारताविरुद्धचा सामना खेळणार नाही, कारण खेळाच्या मैदानावर राजकारण होता कामा नये, असे शरीफ येथील एका सरकारी बैठकीनंतर म्हणाले.

आम्ही एक अतिशय विचारपूर्वक भूमिका घेतली आहे, आणि आम्ही बांगलादेशच्या पाठीशी पूर्णपणे उभे राहिले पाहिजे, आणि हा एक अतिशय योग्य निर्णय आहे. आम्ही बांगलादेशसोबत आहोत, असे ते म्हणाले.

याला प्रतिसाद म्हणून, बांगलादेशचे क्रीडा सल्लागार आसिफ नझरुल यांनी शरीफ यांच्या विधानावर आपल्या अधिकृत फेसबुक पेजवर 'धन्यवाद, पाकिस्तान' असे पोस्ट केले.

बांगलादेशने आपल्या सामन्यांसाठी भारतात प्रवास करण्यास नकार दिल्यानंतर, बीसीसीआयच्या सूचनेनुसार त्यांचा वेगवान गोलंदाज मुस्तफिझुर रहमानला आयपीएलमधून बाहेर काढण्यात आले होते. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने याची कारणे स्पष्ट केली नाहीत, परंतु हे तेथील हिंदूंवरील वाढत्या हल्ल्यांच्या पृष्ठभूमीवर घडले. ◂(वृत्तसंस्था)







**सोलापूर :** आंतर विद्यापीठ कर्मचारी कुलगुरू करंडक टी-२० क्रिकेट स्पर्धेत रेल्वे मैदानावर मनीष गायकवाड व माणिक ढगे यांना सामनावीर पुरस्कार देताना विद्यापीठाचे सिनेट सदस्य प्रा.जैनोद्दीन मुल्ला व नीता मंकणी. यावेळी प्रा. संतोष गवळी, मलीक रोकडे, एस. एस. स्वामी

# सोलापूर, परभणी, म.प्रा.म.वि., गोंडवाना, नाशिक, पुणे, शिवाजी विद्यापीठाचे दमदार विजय

### विद्यापीठ कर्मचारी कुलगुरू करंडक टी-२० क्रिकेट

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ५ फेब्रुवारी-**

राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त राजमाता अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ आयोजित महाराष्ट्र राज्यातील विविध विद्यापीठ शिक्षक व कर्मचारी वृंद यांच्यासाठी क्रिकेट स्पर्धा सोलापुरात सुरू झाली असून तिसऱ्या दिवशी साखळी फेरीचे ६ सामने पार पडले व त्यात सकाळच्या सत्रात गडचिरोली च्या गोंडवाना, कोल्हापूरचे शिवाजी विद्यापीठाने आणि पुण्याचे सावित्रीबाई फुले विद्यापीठ तर दुपारच्या सत्रात परभणी, नाशिक आणि महाराष्ट्र ॲनिमल फिशरी सायन्स विद्यापीठांनी दमदार विजय मिळवले असून नाशिक, परभणी या विद्यापीठ संघांनी सलग दोन विजय प्राप्त केले आहेत.

तिसऱ्या दिवसाचे वैशिष्ट्य म्हणजे पुण्याच्या सावित्रीबाई फुले विद्यापीठाच्या संघातील खेळाडू मनीष गायकवाड याने तडफदार नाबाद शतक झळकावत अष्टपैलू कामगिरी करताना ३ बळी देखील मिळवत १ अप्रतिम झेल घेतला. तसेच अजय गावंडे, प्रवीण पाहाणते, रुपेश मेश्राम यांनी अर्धशतके लगावली.

या स्पर्धेत १७ संघांनी सहभाग नोंदविला असून त्यांची विभागणी ४ गटात केली असून प्रथम साखळी पद्धतीने टी पद्धतीत लेदर चेंडूवर रंगीत पोशाखात अतिशय सुंदर नेटके नियोजन अंतर्गत सामने पार पडत आहेत. चारही मैदानावर सोलापूरच्या विद्यापीठाचे कर्मचारी, शिक्षक, प्राध्यापक हे समन्वयाची भूमिका पार पाडत असून जिल्हा क्रिकेट पंच संघटनेचे सर्वोतोपरी सहकार्य मिळत आहे.

इंदिरा गांधी पार्क स्टेडियम, डॉ.बाबासाहेब आंबेडकर क्रीडा संकुल रेल्वे मैदान, भंडारी स्पोर्ट्स क्लब व दयानंद कॉलेज या ठिकाणी रोज २ सामने होत असून तिसऱ्या दिवशी इंदिरा गांधी पार्क स्टेडियमवर आज सिनेट सदस्य चन्नवीर बंकुर यांचे हस्ते सामनावीराचा पुरस्कार प्रवीण पाहाणते याला, रेल्वे मैदानावर सोशल महाविद्यालयाचे प्राध्यापक तथा सिनेट सदस्य जैनुद्दीन मुल्ला, प्राध्यापिका नीता मंकनी यांचे हस्ते मनीष गायकवाड व माणिक ढगे यांना सामनावीराचे पुरस्कार देण्यात आले. या सर्व सामन्यासाठी मझहर मंगोली, महेश सोनवणे, इरशाद बिराजदार, दया नवले, सुहेल शेख, चिराग शहा, चंदू मंजेली यांनी पंच म्हणून तर गुणलेखक म्हणून मिलिंद गोरे, प्रसाद शावंतुल यांनी काम पाहिले.

## संक्षिप्त धावफलक

**१) इंदिरा गांधी पार्क स्टेडियम**

**गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली :** १८५/४ (१८) प्रवीण पाहाणते नाबाद ५७, सतीश एस. ३७, अनिल चव्हाण २९, अवांतर २२ धावा राजीवरंजन मिश्रा २६/२, मंगेश आटे व रुपेश मेश्राम प्रत्येकी १ बळी. **विजयी विरुद्ध रामटेक :** १२२/१ (१८)रुपेश मेश्राम नाबाद ५३, विजयेंद्र पांडे नाबाद ३०, दीपक जोंधळे २१, अवांतर धावा १८ भीमराव उराडे १ बळी.

**नाशिक :** १४७/६ (२०) नंदकिशोर ठाकरे ४५, संदीप चौधरी ३१, सचिन शिराळ २७, अवांतर २३ धावा ज्ञानेश्वर भोई ३३/२, सुनील थोरात व महादेव वालेकर प्रत्येकी १ बळी **विजयी विरुद्ध पु.अ.हो. सोलापूर विद्यापीठ :** सर्वबाद १२१ (१९.३)हनुमंत लोखंडे ३४, मुख्तार शेख २५, सुनील थोरात १९ संदीप चौधरी, पुष्कर तऱ्हाळ, योगेश राऊत, महेंद्रनाथ चौधरी, संतोष जाधळ प्रत्येकी २ बळी

**२) रेल्वे मैदान**

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ :** १६९/५ (२०) मनीष गायकवाड नाबाद १०८, दीपक गजरमल २७, नितीन प्रसाद १४ सिद्धेश चव्हाण ३३/२, सिद्धेश चव्हाण ३९/२ बळी **विजयी विरुद्ध मुंबई विद्यापीठ :** विपुल खंदारे ३३, अवांतर धावा १२ मनीष गायकवाड १५/३, अक्षय वाल्मिकी २८/३, बसवंत गजलवार संतोष सुगावे प्रत्येकी १ बळी

**डॉ. लोणेरे :** सर्व बाद ११० (२०) दिशांत शिंदे ३५, ओंकार बोधिळकर २३, नितेश पाटील १८, आदेश सोनार १४ धावा जमीर शेख १६/३, माणिक ढगे २०/२, मारोती शेल्हाळे २२/२ व मुजीब शेख, मनोज कऱ्हाळे प्रत्येकी १ बळी **पराभूत विरुद्ध परभणी :** ११२/७ (१६.३)धीरज पाथरीकर ४१, संतोष यादव नाबाद ३१, माणिक ढगे १३ धावा. जितू अंधेरे १८/३, रोहित गमरे २२/२, नितेश पाटील व अल्पेश कोरपे प्रत्येकी १ बळी

**३) दयानंद कॉलेज मैदान**

**जळगाव :** ११९/६ (२०) - रश्मिकांत जाधव २५, चंदन मोरे २०, अरुण सपकाळे १८, स्नेहल कुवर १७ राजू मुपडे २०/२, अनिल पाटील व विनायक शिंदे प्रत्येकी १ बळी **पराभूत विरुद्ध शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर :** १२३/५ (१६.४) हरी मस्के नाबाद २३, युवराज साबळे विनायक शिंदे प्रत्येकी २१, अभिजीत कोठावळे १८, अवांतर १५ धावा जितेंद्र पाटील, किशोर पवार, सुभाष पवार, अरुण सपकाळे प्रत्येकी १ बळी

**यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ नाशिक :** १४८/८ (२०) - निखिल शिंदे ३९, संदीप भागवत २६, योगेश जाधव ३१, अवांतर धावा २४ विठ्ठल धायगुडे २४/३, अतुल ढोक ३१/२ बळी **पराभूत विरुद्ध महाराष्ट्र ॲनिमल अँड फिशरी सायन्स विद्यापीठ :** १४९/९ (१८) अजय गावंडे नाबाद ८२, अविनाश जाधव १५, अवांतर धावा १८. निखिल शिंदे व दिगंबर गाडे प्रत्येकी २ तर संदीप भागवत लक्ष्मण शेंडे प्रत्येकी १ बळी.

## महत्वाचे...

### प्राध्यापकांना उपयुक्त ठरणाऱ्या ॲक्युसॅट पुस्तकाचे प्रकाशन

**सोलापूर, दि. ५ फेब्रुवारी-**

प्राध्यापकांना उपयुक्त ठरणाऱ्या, सोलापूर सोशल कॉलेजचे सेवानिवृत्त ग्रंथपाल डॉ.रामप्रकाश आमिरचंद पंजाबी लिखित ॲक्युसॅट अर्थात असोसिएशन ऑफ कॉलेज अँड युनिव्हर्सिटी सुपर ॲन्यूएटेड टीचर्स महाराष्ट्र-संभाजीनगर या पुस्तकाचे प्रकाशन थाटात करण्यात आले. सेवानिवृत्त प्राध्यापकांच्या प्रश्नांवर असोसिएशनने उच्च न्यायालय, सर्वोच्च न्यायालयात लढा दिला. ३५ पैकी ३१ प्रकरणांमध्ये प्राध्यापकांना न्याय मिळाला आहे. या सर्व केसेसची माहिती या पुस्तकात देण्यात आली आहे. जवळपास ३३७ पानांचं हे पुस्तक आहे. प्रा.ए.बी पाटील, प्रा.डॉ.अरविंद शेंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले, असे डॉ.रामप्रकाश पंजाबी यांनी सांगितले. यावेळी आनंद भोसले, राजीव पंजाबी, किशोर मोरे आदी उपस्थित होते.

### लहान मुलांच्या भांडणातून मोठा वाद; दगड-काठीने हल्ला, सहाजणांविरुद्ध गुन्हा

**सोलापूर, दि. ५ फेब्रुवारी-**

शहरातील लहुजी चौक परिसरात लहान मुलांच्या भांडणाचे कारण पुढे करत सहाजणांनी मिळून एका दाम्पत्यावर हाताने, लाथाबुक्याने तसेच दगड व लाकडी काठीने मारहाण केल्याची गंभीर घटना घडली आहे. या प्रकरणी बार्शी शहर पोलीस ठाण्यात दखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी दिपाली दिनेश पारडे (वय ३८ धंदा मजुरी, रा. लहुजी चौक, बार्शी) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादीनुसार, दि. ३० जानेवारी रोजी दुपारीच्या दरम्यान त्यांच्या घरासमोर हा प्रकार घडला. संशयित आरोपी सचिन विष्णु झोंबाडे, निकीता सचिन झोंबाडे, तेजु भोला देडे, नाना गणेश पारडे, पवन गणेश पारडे व कोमल (पूर्ण नाव माहित नाही) सर्व रा. लहुजी चौक, बार्शी यांनी लहान मुलांच्या भांडणावरुन वाद घालत फिर्यादी व त्यांचे पती दिनेश यांना शिवीगाळ करुन मारहाण केली. मारहाणीत दगड व लाकडी काठीचा वापर करण्यात आला. तसेच निकिता झोंबाडे हिने फिर्यादीच्या उजव्या हाताच्या मनगटास चावा घेऊन जखमी केल्याचे फिर्यादीत नमूद आहे. या घटनेत फिर्यादी दिपाली पारडे व त्यांचे पती दिनेश पारडे हे जखमी झाले आहेत. याप्रकरणी बार्शी शहर पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरुन गुन्हा दाखल झाला आहे याबाबत शहर पोलीस तपास करीत आहेत.

### मतदानासाठी दि. ६ व ७ फेब्रुवारी रोजी शाळांना सुट्टी जाहीर

**सोलापूर, दि. ५ फेब्रुवारी-**

मतदान प्रक्रिया पार पडणाऱ्या शाळांना शुक्रवार, दि. ६ फेब्रुवारी २०२६ रोजी सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. तसेच उद्योग उर्जा, कामगार व खनिकर्म विभागाच्या परिपत्रकानुसार शनिवार, दि. ७ फेब्रुवारी २०२६ रोजी निवडणूक होणाऱ्या क्षेत्रातील सर्व शाळांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. ज्या शाळांतील प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांची निवडणुकीच्या कामाकरिता नियुक्ती केलेली नाही, त्या शाळांना शुक्रवार, दि. ६ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ७.३० ते ११.३० या वेळेत शाळा भरविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.



राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या निर्देशानुसार सोलापूर जिल्हयातील जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२६ साठी सुधारित निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. निवडणुकीचे मतदान शनिवार, दिनांक ७ फेब्रुवारी २०२६ रोजी पार पडणार आहे. मतदान कर्तव्याकरिता अधिकारी, कर्मचारी, मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आली असून, नियुक्त मतदान पथकांना शुक्रवार, दि. ६ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ९ वाजल्यापासून तालुकास्तरावरून साहित्य वाटप करण्यात येणार आहे. त्यानंतर हे पथक सकाळी ११.३० वाजता नेमून दिलेल्या मतदान केंद्रावर पोहोचण्यास सुरुवात करणार आहे. सदर आदेशाचे तात्काळ पालन करण्यात यावे, असे प्रभारी जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी यांनी कळविले आहे.

## निधन वृत्त...

### सुदर्शन कुरापाटी



**सोलापूर, दि. ५ फेब्रुवारी-**

दत्त नगर येथील प्रसिद्ध हातमाग उद्योजक श्री. सुदर्शन सत्तया कुरापाटी (वय ७९) यांचे गुरुवार, दिनांक ५ फेब्रुवारी रोजी दुपारी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, चार मुले, दोन मुली, सुना व नातवंडे असा मोठा परिवार आहे. मास लॉ असोसिएट्सचे संस्थापक तसेच जिल्हा व सत्र न्यायालयातील ज्येष्ठ विधिज्ञ ड. मोहन कुरापाटी यांचे ते वडील होत.

### दत्तात्रय चाटी



**सोलापूर, दि. ५ फेब्रुवारी-**

दत्तात्रय बिंदूराव चाटी (वय८३) यांचे बुधवारी दि. ४ फेब्रुवारी रोजी पुणे येथे वृद्धापकाळाने निधन झाले. लक्ष्मी विष्णू टेक्स्टाईल मिल येथे त्यांनी सुमारे ४५ वर्ष सेवा केली होती. त्यांच्यावर पुण्यात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सून, नातवंडे असा परिवार आहे.

### दत्तात्रेय दीक्षित



**सोलापूर, दि. ५ फेब्रुवारी-**

पांचाळ सोनार समाजातील ज्येष्ठ समाजसेवी व श्री संत नरहरी सोनार समाज सेवी संस्थेचे संचालक सदस्य दत्तात्रय त्र्यंबक दीक्षित, (मार्डीकर) (वय ८४) यांचे गुरुवारी पहाटे ५.३०च्या सुमारास वृद्धापकाळाने निधन झाले आहे. त्यांच्या पार्थिवावर सायंकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले.

### महादेव डोंगरे



**अक्कलकोट, दि. ५ फेब्रुवारी-**

अक्कलकोट शहरातील प्रसिद्ध व ज्येष्ठ अडत व्यापारी महादेव गोविंद डोंगरे यांचे बुधवार ४ फेब्रवारी २०२६ रोजी अकस्मात निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर दुपारी ४ वाजता अक्कलकोट येथील हिंदू स्मशान भूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात आई,पत्नी,दोन मुले, असा परिवार आहे.

# अकलूजमध्ये अग्नितांडव ८० लाखांचे नुकसान

### मशिनरीच्या दुकानातील साहित्य अन् दुचाकी व चार चाकींसह साहित्य खाक

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि.५ फेब्रुवारी-**





अकलूज येथील महावीर पथावरील जैन मंदिराशेजारी रूपाली मशनरी या दुकानास पहाटे आग लागून सुमारे ८० लाखांचे नुकसान झाले. सुदैवाने जीवित हानी झाली नाही. ही आग चार्जिंगला लावलेली दोन चाकी पहाटे साडेचार ते पाच च्या दरम्यान पेटल्याने लागल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. किंवा शॉर्टसर्किटने आग लागण्याची शक्यता वर्तवली जात आहे. या आगीत चार चाकी, दोन चाकी दोन वाहनासह दुकानातील माल जळून खाक झाला आहे. याबाबत दुकानाचे मालक सुहास श्रेणिक गांधी यांनी पोलिसांत तक्रार नोंदवली आहे.

प्राथमिक माहिती अशी की, अकलूज येथील महावीर मंदिराला चिकटून असणाऱ्या रुपाली मशीनरी या पाईप, सबमरसिबल व विहिरीवरील मोटरी विकणाऱ्या दुकानाला पहाटे आग लागली. दुकानाच्या बाहेर असणाऱ्या पत्र्याच्या शेडमध्ये एक इलेक्ट्रिकल दुचाकी चार्जिंगला लावली होती. ती ओव्हर चार्ज होऊन पेटली असावी किंवा दुकानातील वायरिंग शॉर्ट सर्किट झाले असावे असे वेगवेगळे अंदाज व्यक्त करण्यात येत आहेत. दुचाकी पेटल्यानंतर तिच्या शेजारी असलेल्या चार चाकी वाहनाने पेट घेतला. या दोन्ही वाहणाने पेट घेतल्यामुळे दुकानाला आग लागली. सदर दुकानामध्ये विहिरीवरील मोटरी, पिव्हीसी पाईप, केबल, तांब्याच्या तारा असा माल असल्यामुळे आग भडकली. कोट्यावढी रुपयांचा माल या आगीत जळून खाक झाला आहे. आगीची माहिती समजताच अकलूज नगर परिषदेचे टँकर बोलवण्यात आले. या टँकरची प्रेशर क्षमता कमी असल्याने आग आटोक्यात येत नव्हती. त्यानंतर श्रीपूर येथील पांडुरंग साखर कारखाना, यशवंतनगर येथील सहकार महर्षी साखर कारखाना व सदाशिवनगर येथील शंकर साखर कारखान्याच्या अग्निशमनच्या गाड्या आल्यानंतर आग आटोक्यात आली. अकलूज नगर परिषदेचे दोन टँकर पाच वेळा भरून आणावे लागले. सुमारे दहा ते पंधरा गाड्या भरून पाणी मारल्यानंतर आग विझली.

पुढील बाजूस दुकान आणी मागील बाजूस घर अशी रचना होती. घरामध्ये सुहास श्रेणिक गांधी, त्यांची दोन मुले, सुन व दोन नातू इतके लोक रहात होते. आग दुकानाच्या तोंडालाच लागली असल्यामुळे घराबाहेर पडण्यासाठी जागा नव्हती. त्यामुळे परिसरातील नागरिकांनी घरामागील खिडक्या तोडून आतील लोकांना बाहेर काढले.

पोलिसांनी तत्परतेने घटनास्थळी येऊन त्या रोडवरील वाहतूक वळवली. जेसीबीच्या सहाय्याने शटर, ग्रील तोडून दुकानात पाणी मारले. दुकानाला लागलेली आग प्रचंड भडकलेली होती. ती शेजारील एच डी एफ सी बँकेत पोहोचली. आगीमुळे बँकेचा दरवाजा, पुढील भाग, ए टी एम रूमचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. परिसरातील जैन समाजाच्या नागरिकांनी आग विझवण्यासाठी खूप मेहनत घेतली. आगीची माहिती समजताच माजी ग्रामपंचायत सदस्य सतीश व्होरा, आदित्य आर्वे, नगरसेवक महेश शिंदे, योगेश गांधी यांनी घटनास्थळी धाव घेतली. पहाटे चार ते सकाळी आठ वाजेपर्यत आग विझवण्याचे काम सुरु होते.

सन २०२१ साली अकलूज नगर परिषदेची स्थापना करण्यात आलेली आहे. २०२१ पासून जानेवारी २०२६ पर्यंत नगर परिषदेवर प्रशासकाचा कारभार चालत होता. या काळात नगर परिषदेची अग्निशमन यंत्रणा अद्यावत करण्यात आली नाही. आज जेव्हा आग लागली तेव्हा नगर परिषदेचे टँकर कुचकामी ठरले. या टँकरने कितीही पाणी मारले तरी आग विझत नव्हती. जेव्हा परिसरातील साखर कारखान्याच्या गाड्या आल्या व त्यांनी प्रेशरने पाणी मारले तेव्हा आग विझली. अकलूज नगर परिषदेने आपली अग्निशमन यंत्रणा आद्यवत करून घेणे गरजेचे आहे. अकलूज नगर परिषदेचे नगराध्यक्ष रेश्मा आडगळे उप नगराध्यक्ष शिवतेसिंह मोहिते पाटील आमदार रणजितसिंह मोहिते पाटील यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली.



## सांगोल्यात एक एकरही जिरायत ठेवणार नाही : शहाजीबापू पाटील

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.५ फेब्रुवारी -**

माणनदी व कोरडा नदीला कॅनॉलचा दर्जा दिला आहे. भविष्यातही माण नदीचे पाणी हटू देणार नाही. तालुक्यातील एक एकरही क्षेत्र जिरायत ठेवणार नाही असे आश्वासन माजी आ.शहाजीबापू पाटील यांनी दिले. ते कडलास जि.प.गटाच्या महायुतीच्या उमेदवार शोभाताई खटकाळे व पं.स.गणाच्या उमेदवार राणीताई पाटील यांच्या प्रचारार्थ वाटंबरे येथे आयोजित सभेत बोलत होते. यावेळी भाजपच्या राजश्री नागणे पाटील, शिवाजीराव गायकवाड, योगेश खटकाळे, प्रतीक पवार, मधुकर पवार, दत्तात्रय पवार, विकास पवार, सुनील शिंदे, ड.महादेव कांबळे, शोभाताई खटकाळे, राणीताई पाटील, उपनगराध्यक्ष नितीन इंगवले, नगरसेविका राणी माने, तनुजा एरंडे, अशोक शिंदे, सुभाष पवार, नगरसेवक माऊली तेली, अरूण पाटील, प्रशांत धनवजीर, काशिलिंग गावडे, तारका खटकाळे, बाळासाहेब आसबे, भागवत शिंदे, अनिल खटकाळे, राजलक्ष्मी पाटील, बाळासाहेब झपके, गुंडादादा खटकाळे, महादेव शिंदे, समाधान खटकाळे उपस्थित होते.

पुढे बोलताना शहाजीबापू पाटील म्हणाले, ग्रामविकास खाते पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे आहे. तसेच शिवसेनेचे मंत्री भरतशेठ गोगावले व संजय शिरसाट यांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील विकासासाठी निधीची कमतरता पडू देणार नाही. तालुक्यातील दोन्ही आमदारांच्या हातून गेल्या वर्षभरात एकही विकासाचे काम झालं नाही. परंतु मी आणलेल्या साडेपाच हजार कोटी रुपये निधीतून तालुक्याचा विकास आजही सुरू आहे.

## रामसखा बडवे यांना ब्रम्हभूषण, पंकज देव यांना काण्ववेद पुरस्कार

### पंढरपूर काण्व वेदपाठ शाळेचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.५ फेब्रुवारी -**



येथील काण्ववेद पाठशाळेकडून दिला जाणारा ब्रम्हभूषण पुरस्कार येथील रामसखा कृष्णाजी बडवे यांना तर काण्ववेद पुरस्कार वाशिमचे ज्येष्ठ वैदिक, भागवताचार्य पंकजजी देव महाराज यांना मंगळवारी (ता.३) प्रदान करण्यात आले.

काण्ववेद पाठशाळेचे अध्यक्ष ह.भ.प.शंकरमहाराज बडवे यांनी या कार्यक्रमातच पुरस्कार राशी पाच सहस्त्रावरुन अकरा सहस्र केल्याची घोषणा केली. काण्ववेदपाठशाळेचे प्रधानाचार्य वे.शा. सं.शंकरमहाराज गलगलकर यांनी शाळेच्या पंचवीस वर्षांहून अधिक काळांचा व यापूर्वीच्या वैदिक विद्वज्जनांच्या पुरस्कारांचा उहापोह केला. वेदप्रसारकार्य व शिक्षण कार्य पुढे ही चांगलेच चालू राहील असे अभिवचन दिले. शिक्षक शिकवायला तयार आहेत पण विद्यार्थी मिळत नाहीत ही खंतही व्यक्त केली. याच कार्यक्रमात पंढरपूर नगरपरिषदेचे नवनिर्वाचित युवा नगरसेवक भागवत महाजन बडवे यांचा या निमित्ताने सत्कार करण्यात आला. यावेळी नगरसेवक बडवे यांनी काण्ववेद पाठशाळेस सर्व प्रकारचे सहाय्य करीत राहू असे आश्वासन दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैभव मुंडेवाडीकर यांनी केले. दोन्ही पुरस्कारार्थींचा अल्पपरिचय हिंदू महासभेचे नेते अभयसिंह कुलकर्णी इचगावकर यांनी करून दिला. या काण्ववेदपाठशाळेच्या वर्धापन दिनानिमित्त अन्य काही धार्मिक कार्यक्रम भागवत महाजनबडवे आणी अभिराज बडवे यांचेकडून संपन्न झाले. अतिशय पवित्र आणी मंगलमय वातावरणात मंदिर परिसरातील श्री त्र्यंबकेश्वर मंदिरात हा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमास पाठशाळेतील विद्यार्थ्यां समवेतच इतर नागरिक देखील उपस्थित होते.

**ब्रम्हभूषण पुरस्कार मिळालेले रामसखा बडवे यांचा परिचय**

सावरकरांचे सहकारी, क्रांतिवीर वसंतदादा बडवे व त्यांचे सर्व बंधू राष्ट्रभक्तीने प्रेरित होते. हे काय बंधू असतो जरी सात आम्ही, त्वस्थंडिच असते दिधले बळी मीअशा पध्दतीने हे सातबंधू देशसेवेसाठी क्रांती, सावरकर समादेशाप्रमाणे सैन्यसेवा व हिंदुमहासभा विचारांतून देशसेवा करीत होते. रामसखा यांनी षट्कर्मांचे यथास्थित पालन करून ब्राम्हतेज टिकविले. स्वतः वेदाध्ययन करुन नवीन युवकांना विनाअट निःशुल्क शिकविले. वेदविद्या ही पोटभरणेची विद्या नसून ते कर्तव्य आहे याचे भान राखले. अखिल हिन्दुत्वाच्या भावनेने अनेक बहुजन युवकांना मार्गदर्शन केले. अनेक ब्राह्मण युवकांना वेदाध्ययनाची गोडी लावून संहितेपर्यंत शिकविले.

**काण्ववेद पुरस्कार मिळालेले पंकजजी देव परिचय**

या कार्यक्रमातील मुख्य असा, काण्ववेद पुरस्कार विदर्भातील वाशीम नगरीचे, बालाजी मंदिराचे अधिकारी, वैदिक वारकरी विद्वान, भागवताचार्य, पंकजजी देव महाराज यांना देण्यात आला. त्यांनी पंचवीस वर्षांहून अधिकवेळा वारीला आलो, आज पांडुरंग प्रसाद मिळाला तो पांडुरंगचरणी लीन आहे असे भावगर्भ ऊद्गार काढले. त्यांचे मार्गदर्शन व जटा क्रमसहित अल्प वेदपठनाने उपस्थित भारावून गेले व त्यांना काही सेवेसाठी पुन्हा पंढरीला या असे आवाहन केले.

# सीना-भोगावती प्रश्न : राजकीय इच्छाशक्तीचा कस

### जोड कालवा की केवळ जोडलेली आश्वासनं?

**तभा वृत्तसेवा,**
**वाळूज, दि. ५ फेब्रुवारी-**

गेल्या ३० वर्षापासून लोकसभा, विधानसभा, जिल्हा परिषद, पंचायत समिती प्रत्येक निवडणुकीत भाषणांच्या सर्वोच्च स्थानी असलेला मुद्दा म्हणजे सीना-भोगावती नदीजोड कालवा. नरखेड पंचक्रोशीत या विषयावर सभेत जोरदार भाषणं होतात, आश्वासनांची सरबत्ती होते; मात्र मतदान संपताच हा विषय पुन्हा फाईलमध्ये गाडला जातो. गेल्या तीन दशकांपासून या प्रश्नावर कृतीपेक्षा आश्वासनांनाच पाणी घातले गेले आहे.

जिल्ह्यातील मोहोळ, माढा व बार्शी तालुक्यांतून वाहणारी भोगावती नदी आणि तिच्या काठावरील परिसर हा अवर्षणप्रवण आहे. येथील जमीन काळी, कसदार आणि उच्च प्रतीची असतानाही शेतकरी पाण्यापासून कायम वंचित राहिला आहे. पावसाळ्यात कधीतरी वर्षातून एकदा भोगावती भरून वाहते; मात्र उर्वरित वर्षभर ती तहानलेलीच असते. परिणामी हा परिसर वर्षानुवर्षे दुष्काळाच्या छायेत आहे. भोगावती नदीकाठावरील माढा तालुक्यातील अंजनगाव, सुर्डी, उंडेगाव; बार्शी तालुक्यातील काळेगाव, इर्ले, ढोराळे, यावली, तडवळे, वैराग, मुंगशी (वा); मोहोळ तालुक्यातील मनगोळी, वाळूज (दे), भैरववाडी, देगाव (वा), नरखेड, म सलेचौधरी, डिकसळ, भोयरे, हिंगणी (नि.); तसेच उत्तर सोलापूर तालुक्यातील साखरेवाडी, कळमण, भागाईवाडी आदी अनेक गावे या पाण्याअभावी त्रस्त आहेत. दुसरीकडे उजनी धरण भरल्यावर भीमा व सीना नदीतून अतिरिक्त पाणी सोडावे लागते, ज्यामुळे पूरस्थिती निर्माण होऊन नुकसान होते. हेच वाहून जाणारे अतिरिक्त पाणी जर सीना-भोगावती जोड



कालव्याच्या माध्यमातून वापरले, तर संपूर्ण परिसराचे चित्र बदलू शकते. प्रश्न असा की हे वाहून जाणारे पाणी उपयोगात आणण्याची दूरदृष्टी का दाखवली जात नाही ? सीना-भोगावती नदीजोड कालव्याचा प्रस्ताव यावर ठोस उत्तर देतो. या प्रस्तावानुसार, सीना नदीवरील रिधोरे (ता. माढा) येथील बंधाऱ्यातून कालवा व बोगद्याच्या माध्यमातून पाणी इर्ले (ता. बार्शी) येथे भोगावती नदीत सोडण्यात येईल. पुढे भोगावती नदीतून भोयरे (ता. मोहोळ) बंधाऱ्यातून नान्नज मार्गे एकरुख तलाव (सोलापूर) येथे पाणी नेण्याचा सुमारे ५५ किमीचा प्रस्ताव आहे. यामुळे भोगावती नदीअंतर्गत ५ कोल्हापूर पद्धतीचे बंधारे भरून घेणे शक्य होणार आहे. महत्त्वाचे म्हणजे, उजनी धरणातून भीमा-सीना जोड कालव्याद्वारे ज्या पद्धतीने गुरुत्वाकर्षणाने पाणी आणले जाते, त्याच धर्तीवर सीनेतून भोगावतीत पाणी नेणे तांत्रिकदृष्ट्या शक्य आहे. सीना नदीची तळपातळी १५७५ फूट, तर भोगावती नदीची तळपातळी १५४० फूट आहे. जवळपास ३५ फूट नैसर्गिक उतार आणि केवळ २३ किमी अंतर असल्याने कमी खर्चात, कायमस्वरूपी पाणीपुरवठा शक्य आहे. या प्रकल्पामुळे सुमारे ४० हजार हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येऊ शकते. ही योजना तांत्रिकदृष्ट्या शक्य, आर्थिकदृष्ट्या परवडणारी आणि पर्यावरणदृष्ट्या कमी नुकसान करणारी आहे.

या प्रश्नासाठी सन २००६ मध्ये चार तालुक्यांतील शेतकऱ्यांनी 'पाणीसंघर्ष समिती' स्थापन केली. या समितीचे संस्थापक अध्यक्ष वाळूजचे कै. सुशांत कादे होते.(मा. सभापती आरोग्य व शिक्षण समिती, जि. प सोलापूर) प्रशासकीय सर्वेक्षणे, राजकीय गाठीभेटी, संबंधित मंत्र्यांसोबत बैठका-शेती आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कसा सुटू शकतो, यासाठी त्यांनी सातत्याने संघर्ष केला.

केंद्रीय जलशक्ती मंत्र्यांपर्यंतही हा विषय पोहोचवण्यात आला होता आणि त्यावेळी सकारात्मक प्रतिसादही मिळाला होता. सध्या या समितीचे अध्यक्षपद डॉ. संदेश कादे यांच्याकडे असून तेही सातत्याने पाठपुरावा करत आहेत. मात्र गेल्या अनेक वर्षांत फक्त राजकीय आश्वासनं मिळाली. प्रत्यक्षात शासनपातळीवर ठोस कृती झाली नाही. प्रशासनाच्या उदासीनतेमुळे हा प्रकल्प आजही प्रलंबित आहे. विशेष म्हणजे, हा प्रकल्प नदीजोड योजनेच्या धोरणात बसणारा, कमी खर्चात जास्त लाभ देणारा आणि विद्यमान शासनाच्या जाहीर भूमिकेशी सुसंगत आहे. सीना-भोगावती जोड कालवा हा त्याचा आदर्श नमुना ठरू शकतो. कमी खर्च, जास्त लाभ आणि पूरनियंत्रण-तीन उद्दिष्टे एकाच प्रकल्पातून साध्य होतात तरीही प्रश्न सुटत नाही, ही खेदाची बाब आहे. नरखेड गटातील शेतकरी व मतदारांची ठाम मागणी आहे की शासनाने या जोड कालव्याकडे गांभीर्याने लक्ष द्यावे. दर पंचवार्षिक निवडणुकीत हा मुद्दा कळीचा ठरतो. प्रचारसभा या विषयाशिवाय होत नाहीत-सत्ताधारी असोत वा विरोधक. पण ३० वर्षांत प्रश्न सुटत नाही, हीच शोकांतिका आहे. गरज आहे राजकीय इच्छाशक्तीची आणि सर्वपक्षीय ऐक्याची. अनिश्चित पाऊसमान, सततची निसर्गाची अवकृपा, घटते शेतीउत्पन्न आज शेती असूनही परवडत नाही. अशा वेळी सीना-भोगावती नदीजोड कालवा हा केवळ विकास प्रकल्प नसून शेतकऱ्यांच्या जगण्याचा प्रश्न आहे. हा प्रश्न सुटेल की नाही, की नदीकाठच्या शेतकऱ्यांच्या नशिबी पुन्हा भाषणं आणि आश्वासनंच राहतील-हे येणारा काळच ठरवेल.

**प्रकल्पाचे फायदे :**

- पूरस्थितीत वाहून जाणाऱ्या पाण्याचा उपयोग,
- दुष्काळग्रस्त भागाला कायमस्वरूपी पाणी, कमी खर्चात जास्त लाभ
- शेती व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निकाली
- प्रलंबित कालावधी : सुमारे ३० वर्षे
- मुळ अडथळा : राजकीय इच्छाशक्तीचा अभाव व प्रशासकीय विलंब

**सीना-भोगावती नदीजोड कालवा**

**प्रस्तावित कालवा :** सीना-भोगावती नदीजोड, प्रमुख स्रोत : सीना नदी - रिधोरे बंधारा (ता. माढा), अंतिम टप्पा : भोगावती नदी -इर्ले बंधारा (ता. बार्शी), एकूण अंतर : सुमारे २३ कि.मी. (सीना-भोगावती)

**एकूण प्रस्ताव लांबी :** अंदाजे ५५ कि.मी., बोगद्याची लांबी : १२.५० कि.मी., कालव्याची लांबी : ११.५० कि.मी., सीना नदी तळपातळी : १५७५ फूट, भोगावती नदी तळपातळी : १५४० फूट, नैसर्गिक उतार : सुमारे ३५ फूट (गुरुत्वाकर्षणावर आधारित प्रवाह),

**प्रस्तावित लाभ क्षेत्र :** सुमारे ४०,००० हेक्टर, लाभार्थी तालुके : मोहोळ, माढा, बार्शी, उत्तर सोलापूर, भरून येणारे बंधारे : ५ (कोल्हापूर पद्धतीचे ), पाणीपुरवठा: १०० गावे.

## महत्वाचे...



### स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्यावतीने नूतन नगरसेवकांचा सत्कार

**अक्कलकोट, दि.५ फेब्रुवारी-**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या हस्ते न्यासाच्या वतीने पुणे महानगरपालिकेच्या नवनिर्वाचित नगरसेवकांचा सत्कार करण्यात आला. अनेक स्वामी भक्त व न्यासाच्या कार्यात नेहमीच मोलाचे सहकार्य करणारे असे राज्यात झालेल्या महानगरपालिकेच्या निवडणुकीत घवघवीत यश संपादन केले आहेत. यामध्ये पुणे महानगरपालिकेच्या एकूण सदस्यपैकी १४५ हून अधिक नगरसेवकांचा समावेश आहे. मंजुश्री खर्डेकर यांचा सन्मान न्यासाच्या वतीने श्रींची, छत्रपती शिवाजी महाराजांची विशेष कलाकृती प्रतिमा, कृपावस्त्र देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी निवेदिता एकबोटे, भरत मित्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब दाभेकर, पुणे, संदीप खर्डेकर आदी उपस्थित होते.

### सहकारमहर्षि शंकरराव मोहिते-पाटील पुण्यतिथीनिमित्त कार्यक्रमांचे आयोजन

**अकलूज, दि.५ फेब्रुवारी-**

सहकार महर्षि कै.शंकरराव नारायणराव मोहिते-पाटील यांच्या ४७ व्या पुण्यतिथीनिमित्त सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखाना लि. शंकरनगर व विविध संस्थांचे वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. बुधवार, ११ फेब्रुवारी रोजी सहकार महर्षिच्या समाधीचे दर्शन घेऊन प्रतिमेची मिरवणूक काढण्यात येणार आहे. मुख्य कार्यालयसमोरील संस्थापक सहकार महर्षि काकासाहेब यांचे पुर्णाकृती पुतळ्यास पुष्पचक्र अर्पण करण्यात येणार आहे. सहकार महर्षिच्या जीवनावर शालेय विद्यार्थी मनोगत व्यक्त करणार आहेत. श्री विजय गणेशोत्सव मंडळ ट्रस्ट, शंकरनगर-अकलूजच्या वतीने ह.भ.प.अंकुश रणखांबे यांच्या कीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे, असे सांगण्यात आले.





### संभाजी आरमारच्या पालखी सोहळा प्रमुखपदी अर्जुन शिवसिंगवाले

**सोलापूर, दि.५ फेब्रुवारी-**

१९ फेब्रुवारी २०२६ रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९६ वी जयंती साजरी करण्यात येणार आहे. संभाजी आरमार संचलित छत्रपती शिवाजी महाराज पालखी सोहळाच्या अध्यक्षपदी अर्जुन शिवसिंगवाले यांची निवड करण्यात आली. जयंती साजरी करण्यासंदर्भात डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृह येथे संभाजी आरमारचे संस्थापक अध्यक्ष श्रीकांत डांगे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. यावेळी जयवंत सलगर, उत्तरा बरडे, कृष्णा सुरवसे, ॲड.रमाकांत बापट यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी माजी उपमहापौर पद्माकर काळे, संभाजी आरमारचे कार्याध्यक्ष शिवाजी वाघमोडे, उद्योजक मनीष सुरवसे, राज्य कर्मचारी संघटनेचे नेते शंतनु गायकवाड, ज्येष्ठ पत्रकार समाधान वाघमोडे, आप्पासाहेब सावंत आदी उपस्थित होते.

### पंख्याला गळफास घेत वृध्दाची आत्महत्या

**सोलापूर, दि.५ फेब्रुवारी-**



राहत्या घराच्या छताच्या पंख्याला गळफास घेतलेल्या अवस्थेत एक वृद्ध आढळल्याने त्यांना शासकीय रुग्णालयात दाखल केले असता उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. दीपक शांतमल कलशेट्टी वय ५५ रा. प्लॉट नंबर ४०३ भंडारी हाऊस, जुना वेडी घरकुल सोलापूर हे दि. ५ फेब्रुवारी रोजी राहत्या घरी अज्ञात कारणावरून स्लॅबच्या छताच्या पंख्याला साडीच्या साह्याने गळफास घेतलेल्या अवस्थेत मिळून आल्याने त्यांना नातेवाईकांच्या सहाय्याने खाली उतरवून बेशुद्ध अवस्थेत उपचारासाठी एमआयडीसी पोलीस ठाण्याचे डी.जी नवले यांनी शासकीय रुग्णालय येथे दाखल केले असता उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. अशी नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### पगार मागण्यासाठी गेले असता केली मारहाण

**सोलापूर, दि.५ फेब्रुवारी-**

शेतात पगार मागण्यासाठी गेले असता एकास दोघांनी लाकडाने व लाथा बुक्क्याने मारहाण केल्याने मुक्कामार लागल्याने शासकीय रुग्णालयात करण्यात आले दाखल. शब्बीर मोहम्मद सय्यद वय ३९ राहणार अंत्रोळी ता. दक्षिण सोलापूर जि. सोलापूर हा दि. २ फेब्रुवारी रोजी शेतात पगार मागण्यासाठी गेला असता पैसे देत नाही असे म्हणून त्याला नितीन करपे व नवनाथ करपे या दोघांनी मिळून लाकडाने व लाथा बुक्क्याने मारहाण केल्याने अंगास मुकामार लागल्याने उपचारासाठी सरकारी दवाखाना मंद्रुप येथे दाखल करण्यात आले होते. तेथून त्याला शासकीय रुग्णालय येथे दाखल करण्यात आले. अशी नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.




# जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणूक

# ९ वर्षात ३ लाख मतदार वाढले

**२०१७ ला होते २१ लाख ३१ हजार ८३० मतदार**

**२०२६ ला झाले २४ लाख ५९ हजार २२७ मतदार**

**तभा वृत्तसेवा । अविनाश गायकवाड**
**सोलापूर, दि.५ फेब्रुवारी-**

सोलापूर जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकांसाठी गेल्या ९ वर्षात म्हणजे २०१७ ते आजतागायत तब्बल ३ लाख २७ हजार ३९७ मतदार वाढले आहेत. २०१७ साली २१ लाख ३१ हजार मतदार होते. यंदा एकूण २४ लाख ५९ हजार २२७ मतदार झाले आहेत. शनिवार, दि.७ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ७:३० ते संध्याकाळी ५:३० वाजेपर्यंत मतदान तर सोमवार, दि.९ फेब्रुवारी २०२६ रोजी मतमोजणी होणार आहे.

२०१७ साली झालेल्या निवडणुकीत २१ लाख ३१ हजार ८३० होते. यामध्ये ११ लाख ३७ हजार २३२ पुरुष, ९ लाख ९४ हजार ५७९ महिला मतदारांचा समावेश होता. त्यापैकी २ लाख ७४ हजार ८१० पुरुष, ६ लाख ५२ हजार ६३२ महिला असे एकूण १४ लाख २७ हजार ४४२ मतदारांनी मतदानाचा हक्क बजाविला होता.

यंदाच्या म्हणजे २०२६ च्या निवडणुकीसाठी एकूण २४ लाख ५९ हजार २२७ मतदार आहेत. यामध्ये १२ लाख ७७ हजार ०६१ पुरुष, ११ लाख ८२ हजार ०८३ महिला तर ८३ इतर मतदारांचा समावेश आहे. दरम्यान, प्रचाराची वेळ संपल्याने मतदान संपेपर्यंत कोणत्याही प्रकारच्या जाहीर सभा, मिरवणुका किंवा सोशल मीडियावरील प्रचारावर निर्बंध राहणार आहेत.



### कोण मिळविणार मिनी मंत्रालयाचा ताबा?

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, पालकमंत्री जयकुमार गोरे, शिक्षणमंत्री दादा भुसे, खासदार धैर्यशील मोहिते-पाटील, खासदार प्रणिती शिंदे, आमदार सुभाष देशमुख, आमदार सचिन कल्याणशेट्टी, माजी आमदार दिलीप माने, माजी आमदार राजेंद्र राऊत, माजी आमदार ॲड.शहाजीबापू पाटील, माजी आमदार संजयमामा शिंदे आदी नेत्यांनी प्रचारात उतरुन आपापल्या पक्षाच्या उमेदवारांना बळ दिले. ही बाब लक्षात घेता ग्रामीण विकासाचा केंद्रबिंदू असलेल्या मिनी मंत्रालयाचा ताबा कोण मिळविणार? याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागून राहिले आहे.

### २ हजार ७५८ मतदान केंद्रांची उभारणी

सोलापूर जिल्ह्यातील ११ तालुक्यांमध्ये जिल्हा परिषदांच्या ६८ गटांसाठी, पंचायत समितीच्या १३६ गणांसाठी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. त्यासाठी एकूण २ हजार ७५८ मतदान केंद्रांची उभारणी करण्यात आली आहे. १५ हजार २०० कर्मचाऱ्यांच्या नेमणुका केल्या आहेत. मतदान प्रक्रिया शांततेत पार पाडण्याच्या अनुषंगाने तगडा बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे. यामध्ये दीड हजारांहून अधिक पुरुष व महिला पोलिस, होमगार्ड यांचा समावेश आहे.

### आज मतपेट्यांसह कर्मचारी राहणार हजर

करमाळा तालुक्यात २४४ मतदान केंद्र, माढा २६९, बार्शी २५६, उत्तर सोलापूर ९७, मोहोळ २२०, पंढरपूर ३०९, माळशिरस ३६३, सांगोला २७४, मंगळवेढा १८९, दक्षिण सोलापूर २४७ व अक्कलकोट २९०. अशा एकूण २७५८ मतदान केंद्रांची निर्मिती जिल्ह्यात केली आहे. जिल्हा प्रशासनाकडून शुक्रवारीच सर्व मतपेट्या, कर्मचारीवर्ग मतदान कक्षात पोहोचणार असल्याचे सांगण्यात आले.

## महापौर, उपमहापौर निवडीसाठी महापालिका सज्ज

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ फेब्रुवारी-**



सोलापूर महानगरपालिकेत उद्या होणाऱ्या महापौर, उपमहापौर पदाच्या निवड प्रक्रियेच्या पार्श्वभूमीवर महापालिका आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे यांनी महापौर कार्यालय, उपमहापौर कार्यालय, सभागृह नेते कार्यालय तसेच कै. यशवंतराव चव्हाण सभागृह येथे प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली.

महापौर व उपमहापौर निवड प्रक्रिया कोणत्या पद्धतीने पार पडणार आहे, कायदेशीर तरतुदी, नियमावली तसेच निवड प्रक्रियेदरम्यान घ्यावयाच्या दक्षता याबाबतची सविस्तर माहिती नगर सचिव प्रवीण दंतकाळे यांच्याकडून आयुक्तांनी घेतली. निवड प्रक्रिया सुरळीत, पारदर्शक व नियमानुसार पार पडावी, यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्याच्या सूचना आयुक्तांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

महापालिकेच्या लोकशाही प्रक्रियेतील महत्त्वाचा टप्पा असलेल्या या निवड प्रक्रियेसाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करून आवश्यक त्या सुविधा व व्यवस्था उपलब्ध करून द्याव्यात, असेही आयुक्तांनी यावेळी निर्देशित केले. यावेळी उपायुक्त आशिष लोकरे, नगर अभियंता सारिका आकुलवार, अंतर्गत लेखा परीक्षक राहुल कुलकर्णी, उपअभियंता प्रकाश दिवाणजी, कर संकलन विभाग अधीक्षक युवराज गाडेकर, विद्युत विभाग अभियंता महादेव इंगळे, सामान्य प्रशासन विभाग अधीक्षक रजाक पेंढारी, नितीन गायकवाड, मुख्य सफाई अधीक्षक नागनाथ बिराजदार उपस्थित होते.

**हायटेक साऊंड सिस्टीम व्यवस्था; एआय माध्यमातून प्रोसिडिंग करण्याची तयारी**

महापालिकेच्या सभागृहात एकूण ५५ बेंचवर सदस्यांना बसण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. प्रत्येक बेंचवर एक ते ५५ असे नंबर चिटकवण्यात आले आहेत. हायटेक अशी साऊंड सिस्टिम करण्यात आली आहे. महापौर यांच्या डायस समोरही नवे पाच माईक लावण्यात आले आहेत. हायटेक मिक्सर लावण्यात आला आहे. या मिक्सरला ब्लूटूथ अटॅच आहे. ऑटोमॅटिक रेकॉर्डिंगची ही व्यवस्था आहे. त्या आधारे एआय सिस्टीमच्या माध्यमातून भविष्यात व्हॉइस रेकॉर्डिंग वरून प्रोसिडिंग टाईप करण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे. या सर्व सिस्टिमची यशस्वी चाचणीही आज करण्यात आली. वायफायची ही व्यवस्था ठेवण्यात आली आहे.




## 'भाजपा'च्या शहराध्यक्षा तडवळकर यांनी नगरसेवकांना बजावला व्हिप

**आज सकाळी १० वाजता उपस्थित राहावे**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ फेब्रुवारी-**

महापौर व उपमहापौर पदासाठी शुक्रवार, दि. ६ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता होणार आहे. या अनुषंगाने भाजपाच्या नगरसेवकांनी सकाळी १० वाजता पक्षनेता कार्यालयात उपस्थित राहावे, अशा आशयाचा व्हिप भाजपाच्या शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर यांनी बजावला. तत्पूर्वी भाजपाच्या ८७ नगरसेवकांची सारस्वत मंगल कार्यालय येथे बैठक घेण्यात आली.

भाजपाच्या शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर, महापालिकेतील गटनेते नरेंद्र काळे यांनी महापौर व उपमहापौर पदाच्या निवडीच्या कामकाजाविषयी सविस्तर माहिती विशद केली. यावेळी महापौर पदाचे उमेदवार विनायक कोंड्याल, उपमहापौर पदाचे उमेदवार ज्ञानेश्वरी देवकर, महिला मोर्चाच्या शहराध्यक्षा रंजीता चाकोते, शहर भाजपाचे सरचिटणीस नारायण बनसोडे, सरचिटणीस सुधा अळ्ळीमोरे आदी उपस्थित होते.

### कपडे धुण्यासाठी गेलेल्या महिलेचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ५ फेब्रुवारी**

पाण्याची खान येथे कपडे धुण्यासाठी गेलेल्या एका महिलेचा पाय घसरून पडल्याने त्या बेशुद्ध आढळल्या. त्यांना शासकीय रुग्णालय येथे दाखल केले असता त्यांना उपचारापूर्वीच मृत घोषित करण्यात आले.

कल्पना शिवाजी गायकवाड वय ३२ रा. भोगाव ता. उत्तर सोलापूर जि. सोलापूर या दि. ५ फेब्रुवारी रोजी कपडे धुण्याकरिता पंधे पाण्याची खाण भोगाव येथे गेले असता ते कपडे धुत असताना पाण्यात पाय घसरून पडल्याने त्या बेशुद्ध अवस्थेत आढळल्या. त्यांना तालुका पोलीस ठाण्याचे एस.डी. मुल्ला यांनी शासकीय रुग्णालय येथे दाखल केले असता डॉक्टरांनी त्यांना उपचारापूर्वीच मयत घोषित केले. याची नोंद सिविल पोलीस चौकीत झाली आहे.

## २२ हजार ८८० लाभार्थ्यांचे रेशनधान्य होणार कायमचे बंद

**मिशन सुधार'चा दणका; हजारो बनावट नोंदी उघड**

**१०० वर्षांवरील आणि १८ वर्षांखालीलही कुटुंबप्रमुख**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ फेब्रुवारी-**

राज्य शासनाच्या 'मिशन सुधार' उपक्रमाच्या दणक्याने सोलापूर शहर व जिल्ह्यातील हजारो बनावट नोंदी उघड झाले आहेत. तब्बल २२ हजार ८०० अपात्र लाभार्थ्यांचे रेशनधान्य कायमचे बंद करण्यात येणार आहे. गेल्या सहा ते बारा महिन्यांपासून मोफत धान्य न उचलणाऱ्या लाभार्थ्यांची सखोल पडताळणी केल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला आहे.

अंत्योदय व प्राधान्यक्रम कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीस दरमहा पाच किलो मोफत धान्य दिले जाते. मात्र, इतकी सवलत उपलब्ध असूनही हजारो लाभार्थ्यांनी दीर्घकाळ धान्यच घेतले नसल्याचे उघड झाले. शहरात पुरवठा निरीक्षकांमार्फत तर ग्रामीण भागात तलाठ्यांमार्फत प्रत्यक्ष तपासणी करून अहवाल सादर करण्यात आला.

अनेक लाभार्थ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारलेली आहे, काहीजण जिल्ह्याबाहेर स्थलांतरित झाले आहेत, काही लाभार्थी मयत असून त्यांच्या नावावर रेशनधान्य सुरु यांसारखे प्रकार उघडकीस आलेले आहेत. विशेष म्हणजे, १०० वर्षांवरील आणि १८ वर्षांखालील कुटुंब प्रमुखांचा यात समावेश आहे. एकाच व्यक्तीची अनेक कार्ड, संशयित आधार नोंदी, एकापेक्षा जास्त तालुका किंवा जिल्ह्यात नोंद असलेले रेशनकार्ड असेही दिसून आले. या मोहिमेमुळे शासनाचा कोट्यवधींचा अपव्यय थांबणार असून, खऱ्या गरजू कुटुंबांना वेळेवर व पुरेसे धान्य मिळण्याचा मार्ग मोकळा होण्याचा आणि रेशन व्यवस्थेतील वर्षानुवर्षांचा गोंधळ दूर होण्याची चिन्हे दिसत आहेत.



'मिशन सुधारअंतर्गत चुकीच्या वयोगटातील नोंदी, आधारमधील त्रुटी, दीर्घकाळ धान्य न घेणारे लाभार्थी व एकाच व्यक्तीची अनेक रेशनकार्ड यांची सखोल तपासणी सुरु आहे. अपात्र लाभार्थ्यांचे रेशन निश्चितपणे बंद करण्यात येत आहे, असे सोलापूर शहरचे अन्नधान्य वितरण अधिकारी ओंकार पडोळे यांनी सांगितले.

## विश्वात्मक सूर

**विश्वाच्या पाठीवर सदा सर्वकाळ कुठे ना कुठेतरी लतादीदींचा स्वर्गीय सर उमटत राहतो, निनादत राहतो आणि त्यामुळेच लतादीदी अमर आहेत. त्यांचा दैवीय स्वर हा त्यांच्या अस्तित्वाची सदैव साक्ष देत राहील. देव, देश आणि धर्मासाठी त्या जगल्या आणि सातत्याने तीस वर्षे याची अनुभूती एक स्वामी भक्त म्हणून मी घेऊ शकलो. 'देव' म्हणून त्यांच्या आयुष्यामध्ये मंगेशी देवी नंतर स्वामींचे अनन्यसाधारण महत्त्व होते. 'देशा'साठी-स्वदेशासाठी प्राण देणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल त्यांची असीम निष्ठा होती. 'राष्ट्र'धर्म ज्यांनी जागवला त्या स्वातंत्र्यवीर सावरकरांबाबत त्यांच्या भावविश्वात अनन्यसाधारण महत्त्व होते.**

श्री स्वामी समर्थ आणि अक्कलकोट हे त्यांच्या विशेष श्रध्देचे विषय होते. त्याच माध्यमातून त्यांच्याशी सूर जुळले. केवळ परंपरा म्हणून नव्हे तर एक स्वामी सेवक म्हणून अक्कलकोटमध्ये येणाऱ्या प्रत्येक भुकेलेल्या व्यक्तीला अन्न आणि भाविकाला छत्र देण्याची अन्नछत्र मंडळाची संकल्पना त्यांना खूप भावली आणि त्यातून त्यांनी स्वामी चरणी आपल्या वैभवातील काही मोती दान केले. गेली तीस वर्षे या स्नेहमयी माऊलीच्या सहवासामध्ये वावरण्याचा आणि त्याची अनुभूती घेण्याचे सुवर्णमयी पर्व मी अनुभव शकलो.

छत्रपती शिवाजी महाराज हे त्यांचे आणि माझे सामायिक अधिष्ठान! त्यामुळे हे सूर अधिकच घट्ट झाले. स्वातंत्र्यवीर सावरकरांची प्रखर देशभक्ती त्यांच्यामध्ये उतरली होती. स्वामीनिष्ठा, राष्ट्रनिष्ठा, सूरनिष्ठा या त्रयींचा संगम दीदींच्या ठाई होता. अक्कलकोटमध्ये सुरु असलेले कोट्यवधी रुपयांचे प्रकल्प आणि त्यातून स्वामी भक्तांना मिळणाऱ्या सुविधा हा नेहमीच त्यांच्याकरिता अत्यंत संवेदनेचा विषय राहिला. त्यासाठी त्यांनी भरपूर सहकार्य देखील केले आणि आमच्या विचारांना नवी दिशा दिली.

आजही मंगेशकर कुटुंबियांनी मला अंतर दिले नाही. आजही उषा दीदी, मीना दीदी, पंडितजी आणि सर्वच मंगेशकर कुटुंबीय यांच्या अतिव सद्भावनेतून, प्रेमातून त्यांनी अक्कलकोटशी आणि स्वामी भक्तांची असलेला संवाद कायम ठेवला आणि याच माध्यमातून लतादीदींच्या इच्छेचा, भावनेचा, स्वप्नांचा अखंड जागृत यज्ञ सुरु राहिला आहे, अशी माझी भावना आहे. महाराष्ट्राला त्या गानकोकिळा म्हणून परिचित असतील. परंतु स्वामी भक्तांसाठी त्या एक दानशूर कर्तृत्व म्हणून परिचित आहेत. सरस्वतीच्या दरबारातील हे माणिक अखंड हिंदुस्तानच्या शिरावर शोभून दिसत होते. मात्र ते विश्व तेजाचे ही समर्पक द्योतक होते. भारत आणि सीमा रेषेवरील राष्ट्र सीमा आपल्या प्रेममयी स्वरांनी एकत्रित करुन विश्वाला गवसणी घातली आणि वसुधैव कुटुम्बकमचा संस्कार जगासमोर ठेवला. आजही प्रत्येक कंठस्थ आराधने मध्ये लतादीदी जिवंत आहेत. आज यानिमित्ताने लता वैद्यक पुरस्कार देण्याची एक अत्यंत चांगली संकल्पना साकारली जात आहे.



आपल्या आयुष्याच्या अखेरच्या पर्वात त्यांनी शिक्षण आणि वैद्यकीय क्षेत्रामध्ये फार मोठे समर्पण दिले. एमआयटीच्या माध्यमातून त्यांच्या स्मृतीत सप्तसुरांचे विश्वविद्यालय उभा राहिले तर दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाच्या माध्यमातून रुग्णसेवेचा एक महायज्ञ सुरु झाला. दक्षिणेमध्ये जन्मलेले परंतु जगभरात आपल्या वैद्यक विज्ञान विद्वत्तेने विख्यात झालेले एस.राजशेखरन यांना हा पुरस्कार दिला जात आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी एमआयटीचे विश्वनाथ कराड हे आहेत; हा एक अपूर्व योगायोग आहे. दीदींनी जी दोन उदात्त स्वप्ने पहिली त्यांना साकारणारे हे दोन महान दूत खऱ्या अर्थाने त्या देवीचे स्वप्न पूर्ण करीत आहेत. अशा या कार्यक्रमाला मला उपस्थित राहण्याचा मिळालेला सन्मान मोलाचा समजतो. हा माझा व्यक्तिशः सन्मान नाही तर सगळ्या स्वामी भक्तांच्या वतीने प्रातिनिधिक स्वरुपाचा बहुमान मी मानतो. दीदींचा स्वर अमर आहेच. तथापि त्यांच्या स्वप्नांच्या परिघावर असलेल्या या संस्था आणि संस्थांच्या माध्यमातून दिले जाणारे पुरस्कार आणि त्यातून समाजाला मिळणारी प्रेरणा ही अशीच अखंडित प्रवाहित राहो, हीच स्वामी चरणी प्रार्थना!



**-श्री.जन्मेजयराजे विजयसिंहराजे भोसले,**
**संस्थापक अध्यक्ष : अन्नछत्र मंडळ, अक्कलकोट.**
**(शब्दांकन : अनिरुध्द बडवे)**

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९७६७०९९७११ / ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.**Publised at** TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 |**RNI No. MAHMAR/2023/86468**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

CMYK

धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## मतदानाच्या दिवशी जिल्ह्यातील १५ आठवडी बाजार बंद

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.५ फेब्रुवारी -**

जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणूक २०२६ अनुषंगाने मतदान प्रक्रिया शांततेत, निर्भय व सुरळीत पार पडावी,या उद्देशाने जिल्ह्यातील ६ तालुक्यातील १५ आठवडी बाजार ७ फेब्रुवारी २०२६ (शनिवार) रोजी बंद ठेवण्याचे आदेश जिल्हादंडाधिकारी तथा जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी दिले आहेत.

राज्य निवडणूक आयोगाने घोषित केलेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार जिल्ह्यातील धाराशिव, तुळजापूर, उमरगा, लोहारा, भूम, परंडा, कळंब व वाशी या पंचायत समित्यांमध्ये मतदान होणार आहे.

मतदानाच्या दिवशी कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी या आदेशानुसार धाराशिव तालुक्यातील पाडोळी (आ.), जागजी, बामणी. तुळजापूर तालुक्यातील निलेगाव, जळकोट, आरळी (बुद्रुक). उमरगा तालुक्यातील तुरोरी, समुद्राळ, केसर जवळगा. भूम तालुक्यातील ईट. कळंब तालुक्यातील मंगरुळ, नायगाव, पिंपळगाव (कोठावळा) तसेच वाशी तालुक्यातील तेरखेडा व बावी या १५ गावांतील आठवडी बाजार मतदानाच्या दिवशी भरविण्यात येणार नाहीत.



# स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक प्रचाराची सांगता

**ग्रामीण विकास केंद्रस्थानी.... अनेक स्टार नेत्यांच्या सभा रद्द.... धाराशिव जिल्ह्यात प्रमुख पक्षांचे नेते मैदानात !...**

**अनिल आगलावे**
**धाराशिव, दि.५ फेब्रुवारी -**

जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांसाठी सुरू असलेल्या प्रचाराचा कालावधी संपल्याने प्रचाराच्या तोफा थंडावल्या आहेत. मागील काही दिवसांपासून जिल्ह्यातील शहरी तसेच ग्रामीण भागात प्रचाराचा जोर मोठ्या प्रमाणात पाहायला मिळत होता. प्रचाराच्या अंतिम टप्प्यात विविध राजकीय पक्षांचे उमेदवार आणि अपक्ष उमेदवारांनी मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी सभांपासून ते घरोघरी जाऊन संपर्क साधण्यावर भर दिला.

या निवडणुकीत धाराशिव जिल्हा परिषदेच्या ५५ गटांसाठी तसेच जिल्ह्यातील धाराशिव,तुळजापूर, भूम, परंडा, वाशी, कळंब, लोहारा, उमरगा या आठ पंचायत समितींच्या ११० गणांसाठी मतदान होणार आहे. एकूण ११ लाख ४५ हजार ८८८ मतदार या निवडणुकीत आपला मतदानाचा हक्क बजावणार असून, ही निवडणूक




जिल्ह्याच्या राजकीय भविष्याचा आरसा ठरणार आहे.

या निवडणुकीत ग्रामीण विकास हा प्रमुख मुद्दा ठरला. गावातील अंतर्गत रस्ते, पाणीपुरवठा, वीज, आरोग्य सेवा, शाळा, अंगणवाडी, स्वच्छता, तसेच शेतकरी आणि युवकांशी संबंधित प्रश्नांवरून प्रचारात चांगलीच रंगत आली. अनेक ठिकाणी विकासकामांच्या आश्वासनांबरोबरच मागील कार्यकाळातील कामगिरीवरून एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करण्यात आले. प्रचार सभांमध्ये आरोपांच्या टिकास्त्रांनी वातावरण तापले होते.

जिल्ह्यात ७ फेब्रुवारी रोजी मतदान होणार असून त्यासाठी जिल्हा प्रशासनाने तयारीला वेग आला आहे. मतदान प्रक्रिया शांततेत आणि पारदर्शक पद्धतीने पार पडावी यासाठी प्रशासन सज्ज झाले आहे. मतदान केंद्रांवर मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात येत असून सुरक्षा व्यवस्थाही कडक करण्यात आली आहे. संवेदनशील मतदान केंद्रांवर अतिरिक्त पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात येणार आहे.

धाराशिव जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांसाठी सुरू असलेल्या प्रचाराचा कालावधी संपल्याने प्रचाराच्या तोफा थंडावल्या आहेत. मागील काही दिवसांपासून जिल्हाभरात राजकीय वातावरण चांगलेच तापले होते.




विविध राजकीय पक्षांनी आपापल्या ताकदीचे प्रदर्शन करत प्रचारात मोठी आघाडी घेतली. भारतीय जनता पार्टीकडून राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आमदार राणाजगजितसिंह पाटील, माजी आमदार सुजितसिंह ठाकूर, माजी मंत्री बसवराज पाटील, जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी यांनी जिल्ह्यातील विविध भागांत प्रचार सभा घेतल्या. सरकारच्या योजना, विकासकामे आणि भविष्यातील धोरणे यांची माहिती देत त्यांनी मतदारांशी संवाद साधला.

भाजपच्या प्रचार सभांमुळे अनेक ठिकाणी वातावरण धुराळ्याने भरले होते. शिवसेनेकडून (शिंदे गट) राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, पालकमंत्री प्रताप सरनाईक, माजी मंत्री तानाजी सावंत, संपर्क प्रमुख राजन साळवी, माजी आमदार ज्ञानराज चौगुले, माजी खासदार रवींद्र गायकवाड यांनी सरकारची भूमिका मांडत जोरदार सभा गाजवल्या. विकासाभिमुख निर्णय, पायाभूत सुविधा आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांवर सरकारने घेतलेल्या भूमिकेचा त्यांनी प्रचारात उल्लेख केला. काँग्रेस पक्षाकडून प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, माजी आमदार धिरज देशमुख, स्टार प्रचारक व प्रदेश प्रवक्ते हनुमंत पवार, जिल्हाध्यक्ष धीरज पाटील यांनी जिल्ह्यात प्रचार सभा घेत काँग्रेसची भूमिका स्पष्ट केली.

### उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे प्रचाराला अचानक ब्रेक...



धाराशिव जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या प्रचाराच्या शेवटच्या टप्प्यात असतानाच एक दुर्दैवी घटना घडली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे राज्यातील राजकीय वातावरणावर शोककळा पसरली असून याचा थेट परिणाम निवडणूक प्रचारावर झाला आहे. या घटनेच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह अनेक स्टार प्रचारकांच्या नियोजित सभा रद्द करण्यात आल्या. जिल्ह्यात विविध पक्षांकडून जोरदार प्रचार सुरू असताना अचानक आलेल्या या दुःखद बातमीमुळे सर्वच राजकीय पक्षांनी आपापल्या प्रचार कार्यक्रमांना स्थगिती दिली. शोक व्यक्त करत अनेक नेत्यांनी प्रचार दौरे रद्द केले असून नियोजित सभा, पदयात्रा आणि रोड शो थांबवण्यात आले. ग्रामीण विकास, स्थानिक प्रश्न, शेतकरी, पाणीटंचाई, रस्ते आणि रोजगार या मुद्द्यांवरून प्रचार रंगला होता. मात्र उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे राजकीय आरोप-प्रत्यारोपांना अचानक पूर्णविराम मिळाला.

महागाई, बेरोजगारी, शेतकरी प्रश्न आणि ग्रामीण विकासाच्या मुद्द्यांवरून त्यांनी सत्ताधाऱ्यांवर टीका केली. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाकडून उपनेत्या सुषमा अंधारे, खासदार ओमराजे निंबाळकर, जिल्हाप्रमुख तथा आमदार कैलास पाटील, युवा नेते ऋषिकेश मगर यांनी जिल्ह्यातील विविध ठिकाणी प्रचार सभा घेतल्या. लोकशाही मूल्ये, स्थानिक स्वराज्य संस्थांचे स्वातंत्र्य आणि विकासकामांचा मुद्दा त्यांनी उपस्थित केला. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून जिल्हाध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील यांनी एकाकी खिंड लढवत प्रचार केला.

मर्यादित साधनसामग्रीतून त्यांनी विविध भागांत संपर्क साधत पक्षाची भूमिका मतदारांपर्यंत पोहोचवली. आता ७ फेब्रुवारी रोजी मतदान होणार असून जिल्हा प्रशासनाने तयारी पूर्ण केली आहे. मतदान प्रक्रिया शांततेत पार पडावी यासाठी सुरक्षाव्यवस्था कडक करण्यात आली असून आचारसंहितेची काटेकोर अंमलबजावणी सुरू आहे. प्रचार थांबल्याने मतदार शांतपणे विचार करून मतदानाचा निर्णय घेणार आहेत.

## संक्षिप्त वृत्त...



### तेरणा महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे विशेष युवक शिबीर संपन्न

**धाराशिव, दि.५ फेब्रुवारी -**

तेरणा महाविद्यालय, धाराशिव येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने पाणलोट व्यवस्थापन व पडीक जमिनीच्या शाश्वत विकासासाठी विशेष युवक शिबीर गडदेवदरी (जि. धाराशिव) येथे दि.३१ जानेवारी ते ६ फेब्रुवारी या कालावधीत मोठ्या उत्साहात आयोजित करण्यात आले आहे. या शिबिराचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.डी.बी. मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपात प्रा. अमोल भोयटे यांनी युवकांनी सामाजिक बांधिलकी जपून कार्य करावे, असे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. तुळशीराम उकिरडे यांनी केले. सूत्रसंचालन मनीषा जांगीड यांनी केले तर आभार गायत्री जांगीड यांनी मानले. या कार्यक्रमास राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. सुशीलकुमार सरवदे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच गावातील ग्रामस्थ अजय सुरवसे, मोहन बर्वे, दिनेश ताकपिरे, श्रीमंत बाबा रणखांब यांच्यासह अनेक नागरिक व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक उपस्थित होते.

### जि.प. व पं.स. निवडणूक : मतदान केंद्रात मोबाईलला बंदी

**धाराशिव, दि.५ फेब्रुवारी -**

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांनी २९ जानेवारी रोजी जि.प. व पं.स. सार्वत्रिक निवडणुकांसाठी सुधारित निवडणूक कार्यक्रम जाहीर केला आहे. त्यानुसार धाराशिव जि.प. व अंतर्गत आठ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुका निश्चित वेळापत्रकानुसार पार पडणार असून, जिल्ह्यातील १,३०८ मतदान केंद्रांवर ७ फेब्रुवारी रोजी प्रत्यक्ष मतदान होणार आहे. निवडणूक प्रक्रिया पारदर्शक, शांततापूर्ण व निर्भय वातावरणात पार पडावी यासाठी राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार आवश्यक खबरदारी घेण्यात येत आहे. मतदान प्रक्रियेतील शिस्त व गोपनीयता राखण्यासाठी मतदानाच्या दिवशी उमेदवार, त्यांचे प्रतिनिधी तसेच मतदारांना मोबाईल (भ्रमणध्वनी) घेऊन मतदान केंद्रात प्रवेश करण्यास मनाई करण्यात आली आहे. मतदानाच्या वेळी मोबाईल फोन सोबत आणू नयेत, मोबाईल आढळून आल्यास मतदान केंद्रात प्रवेश नाकारला जाईल, याची नोंद मतदारांनी घ्यावी, असे आवाहन प्रशासनामार्फत करण्यात आले आहे.

### वृंदावनी गवळी यांचे निधन

**धाराशिव, दि.५ फेब्रुवारी -**

अपंग अखिल भारतीय भ्रष्टाचार संघर्ष समितीच्या धाराशिव जिल्हाध्यक्षा वृंदावनी बाळासाहेब गवळी यांचे



दि.४ फेब्रुवारी रोजी सोलापूर येथे उपचार सुरू असताना सायंकाळी ६ वाजेच्या सुमारास हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांनी अपंग अखिल भारतीय भ्रष्टाचार समितीमार्फत अनेक अपंग बांधवांना न्याय मिळवून देण्यासाठी लढा दिला. दि.५ फेब्रुवारी रोजी दुपारी १ वाजता कपिलधारा स्मशानभूमी, धाराशिव येथे वृंदावनी गवळी यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पती, मुले, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. यावेळी विविध क्षेत्रातील राजकीय मंडळी, नातेवाईक, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विकासाला मत द्या; आम्ही विकास करून दाखवू : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.५ फेब्रुवारी -**

उमरगा-लोहारा मतदारसंघातील जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर महायुतीच्या सर्व उमेदवारांच्या प्रचारार्थ शिवसेना मुख्यनेते तथा महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची लोहारा तालुक्यातील जेवळी येथे भव्य जाहीर सभा पार पडली.

यावेळी उपस्थितांना संबोधित करताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, तुम्ही आम्हाला मत द्या, आम्ही विकास करून दाखवू. शेतकरी, मजूर व युवकांच्या प्रश्नांवर बोलताना त्यांनी ठोस आश्वासने दिली.

ते म्हणाले की, युवकांच्या हाताला काम देण्यासाठी लोहारा तालुक्यात एम.आय.डी.सी. उभारली जाईल.



स्थानिक युवकांना रोजगाराच्या अधिकाधिक संधी उपलब्ध करून दिल्या जातील.

शेतकरी व मजुरांच्या विकासासाठी ठोस आणि परिणामकारक निर्णय घेतले जातील. 'लाडकी बहीण' योजना बंद होणार नाही, तसेच योजनेअंतर्गत वेतनात योग्य वेळी वाढ करण्यात येईल.

लोहारा-उमरगा तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी राज्य सरकार कटिबद्ध असल्याचे सांगत, महायुतीच्या उमेदवारांना मोठ्या मताधिक्याने विजयी करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

या जाहीर सभेस जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, संपर्क प्रमुख राजन साळवी, माजी खासदार प्रा. रविंद्र गायकवाड, शिवसेना उपनेते तथा माजी आमदार ज्ञानराज चौगुले, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे सुरेश बिराजदार, भगवान देवकाते, सुरज साळुंके, अजित पिंगळे, जितेंद्र शिंदे, नगराध्यक्ष किरण गायकवाड, नगराध्यक्षा वैशाली खराडे, शिवसेना जिल्हाप्रमुख मोहन पनुरे, सुनील साळुंके, योगेश केदार, युवा सेना मराठवाडा निरीक्षक आकांक्षा चौगुले, बळीराम सुरवसे, जगन पाटील, अमीन सुंबेकर यांच्यासह उमरगा व लोहारा तालुक्यातील जिल्हा परिषद गट व गणातील महायुतीचे स्थानिक नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## खोटा व न वटणारा चेक दिल्याप्रकरणी आरोपीस दोन वर्षे सश्रम कारावास

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.५ फेब्रुवारी -**

परंडा येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालयाने दि.२९ जानेवारी रोजी खोटा व न वटणारा चेक दिल्याप्रकरणी आरोपीस दोन वर्षे कारावासाची शिक्षा सुनावली आहे. तसेच फिर्यादीस ४५ हजार रुपये नुकसानभरपाई, ५० हजार रुपये दंड व दंड न भरल्यास आणखी सहा महिने कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली आहे. यासोबतच आरोपीची मालमत्ता जप्त करून लिलावाद्वारे विक्री करून दंडाची रक्कम न्यायालयात भरण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

परंडा येथील श्री भगवंत मल्टिस्टेट क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी लि., बार्शी शाखा (परंडा) येथून आरोपी भाऊराव बिभीषण भानवसे याने ५० हजार रुपयांचे कर्ज घेतले होते.

मात्र सदर कर्जाची रक्कम मुदतीत न भरल्याने बँकेने वारंवार मागणी केली. त्यानंतर आरोपीने बँकेकडे ४४,८०७ रुपयांचा उस्मानाबाद जनता सहकारी बँक, शाखा परंडा यांचा सही केलेला चेक दिला होता. मात्र आरोपीच्या खात्यावर पुरेशी शिल्लक नसल्याने सदर चेक बाउन्स झाला. या प्रकरणाचा निकाल देताना प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी डि.जी. जगताप यांनी वरीलप्रमाणे शिक्षा सुनावली.

फिर्यादी बँकेच्या वतीने अॅड. तानाजी वाघमारे यांनी काम पाहिले. त्यांना अॅड. राहुल वाघमारे तसेच बँकेचे मॅनेजर गणेश गायकवाड यांनी सहकार्य केले.

### लाडक्या बहिणीसाठी भावाचा प्रण

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.५ फेब्रुवारी -**

जि.प. व पं. स. निवडणुकीच्या प्रचाराला वेग आला असतानाच केसरजवळगा गणातील महायुतीच्या अधिकृत उमेदवार अॅड. आकांक्षा चौगुले यांच्या विजयासाठी कंटेकुर येथील शिवसैनिक जागृत शिंदे यांनी उमेदवार निवडून येईपर्यंत चप्पल न घालण्याचा प्रण घेतला आहे. येत्या ७ फेब्रुवारी रोजी मतदान होणार असून ९ फेब्रुवारी रोजी निकाल जाहीर होणार आहे.

## कळंब परिसरात जाणवलेला धक्का भूकंपाचा नाही : प्रशासनाची स्पष्टोक्ती

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ फेब्रुवारी -**

आज दि.५ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी सुमारे ३.०९ वाजण्याच्या सुमारास कळंब, जि. धाराशिव परिसरात भूगर्भातून गूढ आवाज होऊन भूकंपासारखा धक्का जाणवल्याची माहिती स्थानिक प्रशासनास प्राप्त झाली होती.

सदर घटनेची तात्काळ दखल घेत जिल्हा प्रशासनाने राष्ट्रीय स्तरावरील नॅशनल सेंटर फॉर सिस्मॉलॉजी (छउड) यांच्याकडे पडताळणीसाठी माहिती पाठविली. त्यांच्या तपासणीनुसार संबंधित परिसरात भूकंपाची कोणतीही अधिकृत नोंद झालेली नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे ही घटना भूगर्भातील नैसर्गिक आवाजाचा प्रकार असण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

धाराशिव जिल्ह्यासह शेजारील काही जिल्ह्यांमध्येही मागील काही दिवसांपासून अशा स्वरूपाचे भूगर्भातील आवाज ऐकू येत असल्याचे निदर्शनास आले आहे.

जिल्हा प्रशासनामार्फत नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे की, नागरिकांनी घाबरून जाऊ नये, सतर्क राहावे तसेच प्रशासनाकडून वेळोवेळी देण्यात येणाऱ्या अधिकृत सूचनांचे पालन करावे. कोणत्याही प्रकारच्या अफवांवर विश्वास ठेवू नये, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

## श्रीपतराव भोसले हायस्कूलमध्ये स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ फेब्रुवारी -**

येथील श्रीपतराव भोसले हायस्कूलमध्ये विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व उपजत प्रतिभेला वाव मिळावा, तसेच त्यांच्यातील सुप्त कला विकसित व्हावी या उद्देशाने प्रशालेच्यावतीने २६ जानेवारी, प्रजासत्ताक दिनानिमित्त स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरुवात गुरुवर्य के. टी. पाटील सर यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. हे पूजन आदर्श शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष सुधीर पाटील व सरचिटणीस प्रेमाताई पाटील यांच्या हस्ते पार पडले. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य पाटील, युवा नेते तथा हातलाई शुगर लिमिटेडचे चेअरमन अभिराम पाटील, प्लाईंग किड्स इंटरनॅशनल इंग्लिश स्कूलच्या सीईओ डॉ. मंजुळाताई आदित्य पाटील, शिक्षण विभागाच्या विस्तार अधिकारी दैवशाला हाके, प्राचार्य डॉ. गोरख देशमाने व प्राचार्य डॉ. गजानंद वाले उपस्थित होते. स्नेहसंमेलनात इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी हिंदी व मराठी गीतांवरील नृत्य, गायन, एकांकिका, लावणी नृत्य तसेच गोंधळी गीतांचे उत्कृष्ट सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली.

या कार्यक्रमाचे अध्यक्षपद प्राचार्य नंदकुमार नन्नवरे यांनी भूषविले. यावेळी उपप्राचार्य संतोष घार्गे, उपमुख्याध्यापक प्रमोद कदम, पर्यवेक्षक यशवंत इंगळे, बी.बी. गुंड, बी.एम. गोरे, प्रा. विनोद आंबेवाडीकर, कैलास कोरके, मोहन शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते.

### ओबीसी, विमुक्त व भटक्या जमातींच्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह व योजनांचे अर्ज सुरु

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ फेब्रुवारी -**

इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील १२ वी नंतर उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शासकीय वसतिगृह तसेच ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना व पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजनेअंतर्गत प्रवेश अर्ज सन २०२५-२६ पासून सुरू करण्यात आले आहेत.

अर्ज करण्याचा कालावधी ६ फेब्रुवारी २०२६ ते १५ फेब्रुवारी २०२६ असा असून ऑनलाईन अर्ज https://hmas.mahait.org या संकेतस्थळावर करावयाचे आहेत, असे आवाहन सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण कार्यालय, धाराशिव यांनी केले आहे.

## डॉ. सरोजनी राऊत यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमातून साजरा

**संत ज्ञानेश्वर म.निवासी मूकबधिर आश्रम शाळेत शालेय साहित्य तसेच मिठाई वाटप**



**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.५ फेब्रुवारी -**

श्रीलक्ष्मी सेवाभावी संस्था, हसेगाव (शि.) ता. कळंब यांच्या अध्यक्षा डॉ. सरोजनीताई राऊत यांच्या वाढदिवसानिमित्त कळंब येथील संत ज्ञानेश्वर महाराज निवासी मूकबधिर आश्रम शाळेत शालेय साहित्य व मिठाईचे वाटप करून वाढदिवस साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक माधवसिंग राजपूत यांनी केले. त्यांनी डॉ. सरोजनीताई राऊत यांच्या सामाजिक कार्याचा आढावा घेत समाजासाठी त्यांनी केलेल्या उल्लेखनीय कार्याची माहिती उपस्थितांना दिली.

यावेळी ज्येष्ठ महासंघाचे जिल्हाध्यक्ष हभप. महादेव महाराज आडसूळ यांनी मनोगत व्यक्त करत सामाजिक कार्याचे महत्त्व विशद केले. समाजातील दुर्बल घटकांसाठी केलेले कार्य हेच खरे ईश्वरसेवा असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमास एहसास फाउंडेशनचे अध्यक्ष वाजेद तांबोळी, उपाध्यक्ष आदिल सय्यद, सचिव अमन शेख, आरेफ शेख, तोफीक सय्यद आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच विद्यालयाचे प्राचार्य जाधवर, आडसूळ व कोठावळे यांचे सहकार्य लाभले.

हा कार्यक्रम डॉ. सरोजनीताई राऊत विचारमंच, धाराशिव व एहसास फाउंडेशन यांच्या विशेष परिश्रमातून आनंदी व उत्साही वातावरणात यशस्वीपणे पार पडला.

# चारित्र्य हा माणसाचा सर्वात मोठा दागिना आहे : शि.भ.प. धोंडिराज महाराज

**तभा वृत्तसेवा**

**उदगीर, दि. ०५ फेब्रुवारी :** चारित्र्य हा माणसाचा सर्वात मोठा दागिना आहे असे बहुमोल विचार शि.भ.प. धोंडिराज महाराज यांनी व्यक्त केले.

एस.टी.कॉलनी नविन वसाहत मलकापूर येथे ओंकारेश्वर महादेव मंदिरात शिवलिंग व नंदी प्रतिष्ठापना व कलशारोहण सोहळा निमित्त शि.भ.प. धोंडिराज महाराज गंगापुरकर यांचे शिव किर्तन संपन्न झाले.

शंकर हे नाम सुखाचे सदन भाऊ बाधाय जाय चुके येणे भ्रांतीचा पडदा शिवकृपे निघे समाधान या अभंगाव किर्तन करताना म्हणाले की, देवाला सदाचार प्रिय आहे प्रज्ञा पुरुषाची लक्षणे आहेत सदाचार व नामात लीन राहणे संसाराची गुरुकिल्ली असुन दृष्टी बदला सृष्टी बद्दल विचार बदला नशीब बदलेल, शंभर वेळा खोटे बोलण्यापेक्षा एक वेळा खरे बोला तुम्ही किती जगलात यापेक्षा कसे जगलात याला महत्व आहे.

वय व पैसा मोजल्या जात नाहीत कारण मोजलेल्या वस्तूचा नाश होतो नशिबावर अवलंबून न राहता कृतत्वावर विश्वास ठेवा या पद्धतीत वागला तर जीवन कथाअर्थ होते. सुनेला मुली सारखे वागवा, गाड्या मोठी इमारत यांना श्रीमंत म्हणू नका ज्या घरात वृद्ध मंडळी हसत आनंदाने आहेत ते घर श्रीमंताच समजा ज्या घरात वृद्ध मंडळी हसून आनंदाने आहेत ते घर श्रीमंताचा समजा. असे बहुमोल विचार किर्तनातून शि.भ.प.धोंडिराम महाराज गंगापुरकर यांनी व्यक्त केले.

या शिव किर्तनासाठी वादक कपिल तलखेडकर,गायक भिमाशंकर भुरे शिराढोण, संजय चव्हाण लाळी व योगेश इंगळे राजूळा यांच्या गायन वादनाने उपस्थित तल्लीन झाले होते. यावेळी बनशेळकी,विरशैव महिला भजनी मंडळ पिंपरी,गंगापूर,समतानगर, सिध्दरामेश्वर, शिवशक्ती आदी महिला भजनी मंडळांनी भाग घेतला.

ईरम्मा अशोक कवडगावे, वेष्णवी संगमेश्वर कड्डे, सौ.सरस्वती विष्णूकांत हलबर्गे, सौ.अंजली सुनिल पाटिल, सौ.शितल दिगंबर बिरादार, सौ. रेश्मा सुरेश राजपाल यांचे हस्ते आरती संपन्न झाली.

ओंकारेश्वर महिला भजनी मंडळाच्या मार्गदर्शक श्रीमती जगदेवी पोस्ते, अध्यक्ष सौ.सरस्वती हलहबर्गे, सचिव सौ. वनमाला कप्ते, उपाध्यक्षा श्रीमती सुनिता कड्डे, सौ.शितल बिरादार, सौ.मिनाताई हलकुडे सह महिला भजनी मंडळाचे सदस्य प्रयत्न करत आहेत.

शुक्रवार दि.६ फेब्रुवारी रोजी शिव लिंग, नंदी प्राणप्रतिष्ठा व कलशा रोहण सोहळा ष.ब्र. १०८ डॉ.शंभुलिंग शिवाचार्य महाराज यांचे शुभ हस्ते संपन्न होणार आहे. व ११ वाजता प्रसादाचे किर्तन ष.ब्र. डॉ.शंभुलिंग शिवाचार्य महाराज यांचे होणार आहे.



# राष्ट्रीय सेवा योजनेचे सात दिवसीय विशेष शिबिर दापका येथे संपन्न

**तभा वृत्तसेवा**

**निलंगा, दि. ०५ फेब्रुवारी :** निलंगा शहरातील महाराष्ट्र कॉलेज ऑफ फार्मसी, राष्ट्रीय सेवा योजना विभाग व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने मौजे दापका तालुका निलंगा येथे सात दिवसीय विशेष श्रमसंस्कार शिबिर दिनांक २४ जानेवारी ते ३० जानेवारी २०२६ या कालावधीत यशस्वीरित्या संपन्न झाले. सात दिवसीय शिबिराच्या समारोप कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. पाटील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. एस. व्ही. उसनाळे तसेच दापका येथील ग्रामस्थ शिवाजी भोपी, ज्ञानोबा घाडगे, शिवाजी लाटे, मधुकर भोपी, देविदास भोपी, वैजनाथ लाटे, सुभाष घाडगे, डॉ. माधव शेटकार, डॉ. संतोष कुंभार, रा से यो कार्यक्रमाधिकारी डॉ. सुनील गरड व महाविद्यालयातील प्राध्यापक, रा से यो स्वयंसेवक तसेच ग्रामस्थ उपस्थित होते. सदरील शिबिर हे जलसंधारण आणि



ओसाड भूमी विकास या विषयावरती विशेष भर देऊन पूर्ण करण्यात आले. याचबरोबर स्वच्छता, वृक्षरोपण, महिला सबलीकरण, पशु रोग तपासणी, आरोग्य तपासणी, सायबर सुरक्षा, एड्स जनजागृती, अंधश्रद्धा निर्मूलन या विषयावरती विविध मार्गदर्शकाद्वारे समुपदेशन करण्यात आले. आपल्या अध्यक्षीय समारोपाच्या भाषणामध्ये प्राचार्य डॉ. एस. एस. पाटील म्हणाले की, तरुणाई ही धाडसी असते, ती कधीच भीत नसते, व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण व विद्वत्ते शिवाय पर्याय नाही. निरंतर प्रयत्न हाच विद्यार्थ्यांचा यशाचा मार्ग आहे तसेच युवक आकाशाला गवसणी घालण्याचे कार्य करू शकतात. ग्रामसंस्कृती व रा से यो चे अनन्य साधारण महत्व आहे. श्रमासाठी झपाटलेले विद्यार्थी पाहायला मिळत नाहीत अशीही खंत त्यानी यावेळी व्यक्त केली.

समारोपाच्या दिवशी वृक्षारोपण करून झाडाना ट्री गार्ड लावण्यात आले. सात दिवसीय विशेष संस्कार शिबिराचे यशस्वीरित्या आयोजन दापका येथे केल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष श्री विजय पाटील निलंगेकर यांनी अभिनंदन केले. या शिबिराच्या यशस्वीतेसाठी डॉ. विनोद उसनाळे डॉ. रविराज मोरे, डॉ. सी. व्हि. पांचाळ, प्रा.सुजित पवार, प्रा. नंदा भालके, प्रा. प्रीती माकणे, प्रा. शिवराज हुनसनालकर, तंत्रज्ञ नारायणसिंह राजपूत व सर्व स्वयंसेवक यांनी विशेष परिश्रम घेतले.

# डॉ. मीनाक्षी बोंडगे यांच्या ‘हर्बेरियम’ ग्रंथाचे प्रकाशन

## वनस्पतीशास्त्र आणि पर्यावरणशास्त्र साहित्यात भर पडणार

**तभा वृत्तसेवा**

**निलंगा, दि. ०५ फेब्रुवारी :** महाराष्ट्र महाविद्यालयाच्या ग्रंथपाल डॉ .मीनाक्षी बोंडगे यांच्या 'हर्बेरियम' या ग्रंथाचे प्रकाशन महाराष्ट्र शिक्षण समितीचे अध्यक्ष श्री. विजय पाटील निलंगेकर यांच्या हस्ते संपन्न झाले. महाविद्यालयीन परिसरात २०० पेक्षा जास्त विविध प्रजातीच्या वृक्षवेलींची लागवड करण्यात आली असून त्यात दुर्मिळ, औषधी, आणि लुप्त होण्याच्या मार्गावर असलेल्या वनस्पतींचा समावेश आहे. वनस्पतींच्या



विविधतेचे दस्तऐवजीकरण करणे, संशोधनासाठी माहितीचा स्रोत निर्माण करण्याचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून या ग्रंथाची निर्मिती केल्याचे डॉ. बोंडगे यांनी सांगितले. महाविद्यालयात २०० वनस्पतींचा संग्रह जतन केला आहे. या संग्रहाचा वनस्पतींचे वर्गीकरण, उत्पत्ती, अधिवास, वितरण, विपुलता, विविधता आणि उत्क्रांती यांचा अभ्यास करण्यासाठी निश्र्चित उपयोगी होईल असे मनोगत त्यांनी व्यक्त केले. महाराष्ट्र शिक्षण समितीचे अध्यक्ष श्री. विजय पाटील निलंगेकर यांनी हा ग्रंथ दर्जेदार असून वनस्पतीशास्त्र, कृषी, पर्यावरणशास्त्र आणि संशोधनासाठी उपयुक्त असल्याचे सांगून डॉ. बोंडगे यांचे अभिनंदन केले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कर्मवीर कदम, उपप्राचार्य डॉ. भास्कर गायकवाड,प्रा. प्रशांत गायकवाड आणि महाविद्यालयातील शिक्षक वृंद उपस्थित होता.

### जिल्हा परिषद-पंचायत समिती निवडणुकीच्या अनुषंगाने

# पोलिसांचा रूट मार्च

**तभा वृत्तसेवा**

**किनगाव दि. ०५ फेब्रुवारी :** निवडणुकीत कोणत्याही प्रकारची अनुचित घटना घडू नये, यासाठी किनगाव पोलिस प्रशासन सज्ज झाले आहे. त्यासाठी तगडा पोलिस बंदोबस्त राहणार आहे. त्यानुषंगाने किनगाव येथील पोलिस ठाणे स्तरावर मोठ्या फौजफाट्यासह येथील मुख्य रस्त्यावरून रूट मार्च काढण्यात आला.

गुन्हेगार आणि सामाजिक तत्वांवर दबाव निर्माण करण्यासाठी पोलिस अनेक उपाययोजना करत आहेत.महत्त्वाच्या मार्गावरून पोलिसांनी रूट मार्च काढला. यामध्ये संबंधित किनगाव पोलीस स्टेशन चे सपोनी मानीकराव डोके साहेब यांच्या नेतृत्वाखाली पोलिस अधिकारी, होमगार्ड, पोलीस स्टेशनचे इतर अधिकारी अंमलदारांचा समावेश होता.



# विश्वेश्वरय्या पब्लिक स्कूलचा वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**

**उदगीर, दि. ०५ फेब्रुवारी :** विश्वेश्वरय्या पब्लिक स्कूल, लातूर येथे नुकताच शाळेचा वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा ‘‘विश्वोत्सव२०२६’’ उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

कार्यक्रमाचे उद्घाटन ज्येष्ठ कवी भारत सातपुते यांच्या हस्ते पार पडले. गटशिक्षणाधिकारी लातूर श्री. शेख सी. आर. तसेच मेट्रोबेन एज्युकेअर प्रा. लि., लातूरचे संचालक श्री. संतोष लोहार हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री विश्वेश्वर शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष श्री. शिवचरण धाराशिवे होते, तर संस्थेचे सचिव तसेच शाळेचे प्राचार्य श्री. बसवराज धाराशिवे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

तसेच वासनगाव केंद्राच्या केंद्रप्रमुख श्रीमती नंदा आचार्य यांच्यासह संस्थेचे उपाध्यक्ष प्रभाकर कापसे, विश्वनाथ निलंगेकर, दिलीप आडे, कथक डान्स अकॅडमी, लातूरच्या संचालिका श्वेता तंत्रे, सारिका शिरसेकर, विश्वेश्वरय्या अभियांत्रिकी पदविका महाविद्यालय, आलमला येथील प्राचार्य प्रशांत धाराशिवे, योगेश धाराशिवे,




शिवलिंगेश्वर कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. विश्वेश्वर धाराशिवे, विश्वेश्वरय्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य गोपाळ दंडिमे, ब्ल्यू बर्ड इंटरनॅशनल स्कूलच्या प्राचार्या स्वाती कापसे तसेच ब्ल्यू बर्ड ज्युनिअर सायन्स कॉलेजचे प्राचार्य योगेश माशाळकर यांची उपस्थिती लाभली.

कार्यक्रमात चिमुकल्या विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक नृत्य, ऐतिहासिक कला, नाटक व गीत-संगीताच्या माध्यमातून आपल्या अंगी असलेल्या सप्तकला गुणांचे आकर्षक सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. तसेच क्रीडा व अबॅकस स्पर्धांमध्ये यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार व बक्षीस वितरण करण्यात आले.

यावेळी ज्येष्ठ कवी भारत सातपुते यांनी संस्थेच्या कार्याची प्रशंसा करत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच गटशिक्षणाधिकारी श्री. शेख सी. आर. यांनी विद्यार्थ्यांना शिक्षणासोबत सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील राहण्याचे आवाहन केले. विश्वेश्वरय्या इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड टेक्नॉलॉजी, लातूरचे प्राचार्य किशोर जेवे यांनी शाळेच्या प्रगतीविषयी माहिती दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सायली देशमुख यांनी विद्यार्थी व शिक्षकांच्या सहकार्याने केले. कार्यक्रमाच्या शेवटी विश्वेश्वरय्या ज्युनिअर कॉलेज, लातूरचे प्राचार्य अमोल कुंभार यांनी उपस्थितांचे आभार मानले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेच्या सर्व शिक्षक व कर्मचारीवर्गाने विशेष परिश्रम घेतले.

# अंधश्रध्देची भक्ती पतनाकडे नेणारी : कैलास महाराज जामकर

**तभा वृत्तसेवा**

**उदगीर, दि. ०५ फेब्रुवारी :** निष्काम भक्तीने साक्षात्कार होतो चमत्कार नाही. मन्मथ स्वामींनी साक्षात्कार सांगीतला, चमत्कार सांगीतला नाही,साक्षात्कार आत्मत्वात होतो, आत्मतत्वाची भक्ती करा, कर्म चांगले करा कुण्या भोंदू बाबा कडे जाण्याची गरज नाही असे बहुमोल रोखठोक विचार शि.भ.प. कैलास महाराज जामकर यांनी किर्तनातून मांडले.

एस.टी.कॉलनी नविन वसाहत मलकापूर येथे ओंकारेश्र्वर महादेव मंदिरात शिवलिंग व नंदी प्रतिष्ठापना व कलशारोहण सोहळा निमित्त शि.भ.प. कैलास महाराज जामकर यांनी तया भावे शरण जावे सदा वाचे नाम घ्यावे शिवाचे या अभंगावर शिव सप्ताहातील शिवकिर्तनाचे चौथे पुष्प गुंफले.

विविध दृष्टांत देत कैलास महाराज म्हणाले की,

संत शिरोमणी मन्मथ स्वामींनी अंधश्रध्देच्या भक्तीला कधीही थारा दिला नाही भक्तीला प्राधान्य दिले




भक्ती श्रध्देंने करावी अंधश्रध्देने करु नये.वैभव लक्ष्मीची पोथी वाचल्याने वैभव प्राप्त होत नाही तर कष्ट केल्याने वैभव येते,श्रध्देसाठी वाचा धनासाठी नको श्रध्देच्या बाह्य अंगाची भक्ती देखाव्याची असुन देखाव्याची भक्ती करु नका,निष्काम भावाने शरण जावा वाचेने नाव घ्या जीवाच शिव व्हायला वेळ लागणार नाही,जीवनात चांगले कर्म करा जिवणात समस्याच येणार नाही,संत तत्वात अनुभवाला महत्व आहे असे सांगून १२ शतकात महात्मा बसवण्णानी भक्तीची वर्णवादी परंपरा मोडित काढली.

भगवंताच्या प्राप्तीचे स्वातंत्र्र बसवेश्र्वरांनी दिले भारतीय शास्राच्या दर्शन शास्र यातीत पहिले महात्मा गौतम बुध्द आहेत दुसरे महात्मा बसवणा आहेत,प्रत्येक संत नेहमीच महात्मा असतो,महात्म्याच्या विचाराने क्रांती घडते संत महात्म्याने जड जिवाचा उद्दार होतो.अनुभवाच्या बोलण्यात शक्ती आहे म्हणून संतत्व जगात महान आहे.

ईश्वराला शरणवृत्ती प्रिय असुन शरण वृत्ती ठेवा,अंतकरणात भाव ठेवा, शरण आल्यामुळे सर्व दोष दुर होतात

वाचे भगवंताचे नाव घ्या ,भक्ती करताना शिवा शिवाय कल्याणाचा दाता जगात नाही,जिवनाचे कल्याण करायचे असेल तर शिवाला मनोभावेने शरण जावा सर्व भक्तीचे सार भगवंताचे नामात आहे. नामा शिवाय भक्तीला अर्थ नाही, भक्ती निष्काम करा आपल्यामुळे दुसर्याला त्रास होईल असे वागू नका, निष्काम भावाने शरण जावे हीच ईश्वराची सर्वश्रेष्ठ भक्ती असे बहुमोल विचार व्यक्त केले. यावेळी वनमाला अशोक कप्ते, उदय कप्ते,मंजू कप्ते, अनुसया शिवराज स्वामी यांच्या हस्ते आरती संपन्न झाली. श्रीमती पोस्ते, सौ.छाया स्वामी,श्रीमती सुगला बावगे, सौ.ललिता कप्ते, श्रीमती मिना बावगे, श्रीमती उमादेवी हलकंचे, सौ.उमा कमठाणे, सौ.प्रिती महेश तोडकर, किरण तोडकर,सौ. शालू साखरे, सौ.शिला धानूरे, सौ. सुधा तिवारी, सौ.अयोध्या जाधव, सौ.स्वर्णा माळेवाडे, सौ.आशा नागराळकर,सौ.पुनम तिवारी, सौ. स्वर्णा गलबले, सौ.भारती गिरी, सौ.शितल बिरादार,सरुबाई हलबर्गे, श्रीमती सुनिता कड्डे यांच्या सह शिवभक्त परिश्रम घेत आहेत.

# स्थानिक परिसराच्या संशोधनात विद्यार्थ्यांची भूमिका मोलाची - डॉ. अनिल जायभाये

**तभा वृत्तसेवा**

**निलंगा, दि. ०५ फेब्रुवारी :** स्थानिक परिसराच्या संशोधनात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची भूमिका मोलाची असून आपण केलेल्या संशोधनाचा समाजाला निश्र्चित उपयोग झाला पाहिजे असे प्रतिपादन डॉ.अनिल जायभाये (स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड - उपकेंद्र लातूर) यांनी केले.

निलंगा तालुक्यातील औराद शहाजनी येथील मास्टर दीनानाथ मंगेशकर महाविद्यालयातील मादीमं संशोधन अकादमीच्या वतीने दि.४ फेब्रुवारी रोजी 'संशोधनातील नवीन क्षेत्र' या विषयावर आयोजित




अतिथी व्याख्यानाचे प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.शंकर कल्याणे होते. व्यासपीठावर डॉ.निशिकांत वारभुवन, मादीमं संशोधन अकादमीचे समन्वयक डॉ.आनंद मुसळे, डॉ.अशोक नारनवरे उपस्थित होते. पुढे बोलताना डॉ.अनिल जायभाये यांनी माहिती व तंत्रज्ञानाच्या युगात कृत्रिम बुद्धिमत्ता, प्राथमिक साधने, संदर्भ ग्रंथ इत्यादीचा वापर करून विद्यार्थ्यांनी आपण रहात असलेल्या स्थानिक परिसराचे शास्त्रीय संशोधन केले पाहिजे. तसेच समाजातील विषमता, अंधश्रद्धा, दारिद्र्य, बेकारी, गुन्हेगारी इत्यादी समस्यांचे निर्मूलन करण्यासाठी त्यांचा सखोल अभ्यास करून या समस्या सोडविण्यासाठी सकारात्मक प्रयत्न करणे आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले. यावेळेस डॉ.निशिकांत वारभुवन यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोप प्र.प्राचार्य डॉ.शंकर कल्याणे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. आनंद मुसळे यांनी केले व उपस्थितांचे आभार डॉ.अशोक नारनवरे यांनी मानले. यावेळी डॉ.अनिल जायभाये यांनी महाविद्यालयातील महिला सक्षमीकरण विभागास 'संघर्ष गाथा' हा ग्रंथ भेट दिला. याप्रसंगी डॉ. जाफर चौधरी, डॉ.सचिन हंचाटे, डॉ. शीतल गुंजटे, डॉ.सुचिता किडीले, डॉ. सत्यशीला जोंधळे, प्रा.अंजना मुळे, प्रा.आकांक्षा मुळे, प्रा.पल्लवी डोंगरगावे, पूनम सुर्यवंशी, रुपेश मोरे, विजयकुमार बाबछडे यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

जाहिर प्रगटन

लातूर जिल्हा परिसरातील तमाम जनतेस या जाहिर प्रगटना द्वारे सुचीत करण्यात येते कि , माझे पक्षकार **क्षिरसागर सुहास लक्ष्मण , रा. हिप्परगा ता.औसा जि लातूर** यांनी मला दिलेल्या माहिती व कागद पत्रावरुन व वकिल म्हणून अधिकृत केले वरून सर्व जनतेस खालील प्रमाणे जाहिर प्रगटन देत आहे.

माझे पक्षकार यांना **सौ विद्या आण्णासाहेब पवार , रा. फादर मायकेल सोसायटी ,विश्रांतवाडी ,पुणे** यांनी खरेदी खत दस्त क्र. ल. त. र – २-६३००/२००९ अन्वये खरेदी मालकीचा व कब्जेवाहिवाटीचा खुला प्लॉट मौ. चांडेश्वर ता. जि लातूर येथील जमीन गट नं ६० मधील खुला प्लॉट ज्यांचा एन. ए नं. २००६/जे . एम . बी /लातूर /सी . आर -८५७ ,दि- ०५/१२/२००६ ई . अन्वये मे. सब डिव्हीजनल ऑफिस ,लातूर यांनी मंजूर केलेला खुला प्लॉट याचा ले आऊट क्र. एल . टी. आर/एन. ए /सर्वे नं ६०/लातूर /एन. आर. एल/१७६३, दि.२७/११/२००६ ई. अन्वये मे. नगर रचनाकार, लातूर यांनी मंजूर केलेल्या पैकीचा खुला प्लॉट नं.८१(पूर्ण) याची लांबी पूर्व –पश्चिम १७ मी व रुंदी दक्षिण-उत्तर १२ मी . याचे एकूण क्षेत्रफळ २०४. चौ.मी आहे. प्लॉट चतु:र्सिमा - पुर्वेस - गट ६१ मधील जमीन, पश्चिमेस – ९ मी रुंदीचा रस्ता , दक्षिणेस - प्लॉट क्र ८२ उत्तरेस – प्लॉट क्र ८०

येणे प्रमाणे वरील चतु : सिमेच्या आतील मिळकत खरेदी करणेचा **लेखी** करार केला असुन ठरावापोटी ईसारा रक्कम दिलेली आहे तसेच सदरील मिळकत ही निर्वेध व निर्जोखिम असल्याची हमी विध्यमान मालकाने माझ्या पक्षकारास दिलेली आहे तरी सदर मिळकतीवर जर कोणाचा उजर , हक्कसंबंध कर्ज बोजा, गहाणखत, बक्षीस, कोर्टडिग्री, मृत्युपत्र, तारण, लिज, लिन, शेजाऱ्याचा वाद, शासकिय अथवा निमशासकिय कर्ज असेल तर त्यांनी सदर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन **सात ( ७ )** दिवसांचे आत माझ्या खालील पत्यावर लेखी आक्षेप नोंदवावा मुदतीत जर कोणाचा उजर आक्षेप आला नाही तर सदरील मिळकत ही निर्विवाद व निर्जोखिम समजुन माझे पक्षकार नोंदनिकृत खरेदीखत करुन घेतील मुदतीनंतर आलेले आक्षेप माझे पक्षकारावर बंधनकारक रहाणार नाही याची नोंद घ्यावी.

सबब हे जाहिर प्रगटन.

दिनांक - ०२/०२/२०२६

तर्फे. ॲड. अशोक ज्ञा. लोखंडे
नोटरी भारत सरकार.
शाहू चौक, लातूर
मो. न. ९४२१९८६४९५

जाहिर प्रगटन देणार
क्षिरसागर सुहास लक्ष्मण
**रा. हिप्परगा ता.औसा जि लातूर**
मो.नं.८६०५५५६५६७ / ७७७४८७२१४६

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



# ग्रामीण शेत -शिवारात आंबा मोहरला

**तभा वृतसेवा**
**आदमपूर, दि. ५ फेब्रूवारी-**

बिलोली तालुक्यातील आदमपूर परिसरातील काही भागात,शेत शिवारात किंवा बांधावर तुरळक असणाऱ्या आंब्याच्या झाडांना मागच्या कडाक्याच्या थंडीत तुडुंब मोहोर लगडलेला दिसून आला आहे. आंब्याला आलेला मोहोर पाहता यंदा गावरानी आंब्याची रसाळी चव शेतकरी तथा सर्वसामान्य नागरिकांना चाखायला मिळेल असे दिसते आहे.यंदा वर्षातील आम्रवृक्ष मोहोराची ही सुरूवात अंतर्गत मन उधाणत राहते.

अविट गोडीसाठी प्रसिद्ध असलेल्या गावरानी आंब्याची झाडे,आमराया, वरचेवर आता दुर्मिळ होत चालल्या आहेत.काही भागात नगण्य आंबा बागायतदार अजुनही आहेत.मागच्या वर्षात वादळी वारे व अवकाळी पावसाच्या तडाख्यात गावरानी आंब्यास प्रचंड फटका बसलेला होता.यावर्षी फुलोरा झाडांना अगदी लदबदून गेला आहे.

काही जुन्या जानत्या शेतकऱ्यांकडून खेडोपाडी



गावरानी आंब्याची झाडे आजही राखून ठेवलेली नक्कीच आहेत.

आंबा मोहोरला की वातावरणात एक आगळावेगळा सुवासिक गंध अगदी धुंद दरवळत राहतो.मोहोर आणि घनगर्द सावली पाहता कौटुंबिक स्त्रीमन माहेरी जाऊन सलामी देत असते.कैरी आणि पाड लगडल्यावर उनाड पोरांचे टोळके रानोरानी भटकंती करीत निघतात. आंबा हंगामात घरीदारी पाहुण्यांची ये-जा हमखास वाढलेली असते.कौटुंबिक नवीन नात्यांची नाजूक गुंफण घरादारांत बांधलेली असते.

आदमपूर,बिलोली,देगलूर परिसरातील काही नर्सरीतला आंबा चाखायला बाजारात येतो,मात्र,त्याची चव गावरानी फक्कड आंब्यासमोर फिकी पडलेली दिसून येते.विविध गावराणी आंब्याचे वाण बाजारात उपलब्ध होतात. त्यामुळेच कौटुंबिक रसाळी किंवा चव चाखण्यासाठी सर्वसामान्य लोक गावरानी आंब्याची बाजारात मागणी दरसाल करीत असतात.मोहरलेला हा आम्रवृक्ष पाहून खव्वयांच्या तोंडाला आतापासूनच पाणी सुटू लागले आहे.वादळी वारे,पाऊस न लागता वातावरण पोषक राहीले तर आंबे खाणाऱ्यांची यंदा सुग्गी होईल, अशी परिसरातील शेतकऱ्यांकडून आशा व्यक्त केली जात आहे.

# कारागिरांच्या व्यवसायवृध्दीसाठी प्रदर्शन व विक्री उपक्रम महत्वाचे :आयुक्त डॉ. डोईफोडे

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ५ फेब्रूवारी-**

कारागिरांच्या पारंपरिक व्यवसायाला मदत करणे हा पीएम विश्वकर्मा योजनेचा मुख्य उद्देश आहे. या योजनेत नोंदणी केलेल्या कारागिरांना विविध स्वरूपाचे लाभ उपलब्ध करून देण्यात येतात. कारागिरांच्या व्यवसायवृद्धीसाठी अशा प्रदर्शन व विक्री उपक्रमांना महत्त्व असून, नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या प्रदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांनी केले.

आज लोकमान्य मंगल कार्यालय, अण्णाभाऊ साठे चौक, सम्राट नगर, नांदेड येथे एमएसएमई विकास कार्यालय, छत्रपती संभाजीनगर तसेच खादी ग्रामोद्योग मंडळ, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित प्रधानमंत्री विश्वकर्मा योजनेअंतर्गत भव्य प्रदर्शन व विक्री कार्यक्रमाचे उदघाटन मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांच्या हस्ते संपन्न झाले.

यावेळी भारत सरकारच्या सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालयाचे सहाय्यक संचालक राहुलकुमार मिश्रा, जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी संजय सारंगधर यांच्यासह जिल्हा उद्योग केंद्र, कौशल्य विकास विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

हा कार्यक्रम ५ व ६ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत सर्व नागरिकांसाठी खुला राहणार आहे. या प्रदर्शनात पारंपरिक कारागीर व शिल्पकारांना त्यांच्या कौशल्याचे सादरीकरण व थेट विक्री करण्याची सुवर्णसंधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. यामध्ये सुतार, अस्त्रनिर्माते, लोहार, सुवर्णकार, कुंभार, मूर्तिकार, मोची, चटई व झाडू निर्माते, पारंपरिक बाहुली व खेळणी निर्माते, मालाकार आदी विविध व्यवसायांतील विश्वकर्मा बांधव सहभागी झाले आहेत.

जिल्ह्यात आतापर्यंत पीएम विश्वकर्मा योजनेत १ लाख ३३ हजार २५७ कारागिरांनी नोंदणी केली असून, यापैकी ४ हजार ८७४ कारागिरांना कर्ज मंजूर झाले असून यापैकी ४ हजार १०२ कारागिरांना कर्ज वाटप झाले आहे. तर ७ हजार ५९४ कारागिरांना टुलकिट वाटप करण्यात आले आहे अशी माहिती जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी संजय सारंगधर यांनी दिली. तसेच या प्रदर्शनीत ५० कारागिरांनी सहभाग नोंदविला असून विविध व्यवसायांतील विश्वकर्मा बांधवानी स्टॉल लावले आहेत. नागरिकांनी या प्रदर्शन व विक्रीचा लाभ घ्यावा असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

## गझलकार मानेमोड यांना राज्यस्तरीय ‘गावगाडा’ गझल साहित्य पुरस्कार

**नायगाव/नरसी** - मराठी गझल क्षेत्रात आपली आगळी वेगळी ओळख निर्माण करणारे नरसी येथील गझलकार मारोती मानेमोड उर्फ राया यांना



विश्वकर्मा तरुण मंडळ, वडशिवणे (ता. करमाळा, जि. सोलापूर) यांच्या वतीने दिला जाणारा स्व. सतीश दराडे राज्यस्तरीय ‘गावगाडा’ गझल साहित्य पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. अनोख्या खयालांची मांडणी, साधी पण आशय पूर्ण शब्दरचना आणि सामान्य माणसाच्या भाव भावनांना भिडणारी गझल ही मानेमोड यांच्या लेखनाची वैशिष्ट्ये आहेत. सध्या ते विदर्भात शिक्षकी पेशात कार्यरत असून, शिक्षण सेवेबरोबरच मराठी गझल क्षेत्रात सातत्यपूर्ण व दर्जेदार लेखन करत आहेत. त्यांचा पहिलाच गझलसंग्रह ‘निर्गुणी आकार’ वाचक आणि साहित्य वर्तुळात विशेष चर्चेत राहिला आहे. या संग्रहातील हृदयस्पर्शी व मर्मभेदी गझलांनी अनेक पुरस्कार मिळवले असून, संपूर्ण महाराष्ट्रभर या संग्रहाने लोकप्रियतेचा ठसा उमटवला आहे. या पुरस्कारामुळे मानेमोड यांच्या साहित्यिक वाटचालीत आणखी एका मानाच्या सन्मानाची भर पडली आहे. पुरस्काराची घोषणा मंडळाचे अध्यक्ष सोमनाथ टकले व संयोजक समितीने केली आहे. या यशाबद्दल नरसी परिसरासह साहित्यविश्वातून मारोती मानेमोड यांच्यावर अभिनंदन व शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## प्रियंका सूर्यतळे- बावस्कर यांची तंत्रज्ञ पदावर नियुक्ती

**नांदेड** - महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने नुकतेच तीन वर्षाचा



कंत्राटी कालावधी पूर्ण केलेल्या विद्युत सहाय्यकांना तंत्रज्ञ पदावर सामावून घेतले असून यात प्रियंका सूर्यतळे -बावस्कर यांचा समावेश आहे. महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने दिनांक ३ फेब्रुवारी २०२६ रोजी आदेश काढले असून या आदेशात तीन वर्षे कंत्राटी कालावधी पूर्ण केलेल्या पाच विद्युत सहायकांना तंत्रज्ञ पदावर सामावून घेतले आहे. यात प्रियंका सूर्यतळे -बावस्कर यांचा समावेश असून त्यांना संचलन व सुव्यवस्था उपविभाग २ नांदेड या ठिकाणी तंत्रज्ञ पदावर पदस्थापना देण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीमध्ये कायम झाल्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## नांदेड ते निजामबाद दरम्यान पुष पुल रेल्वे सेवा सुरु करा : पत्रकार संघ

**मुदखेड, दि. ५ फेब्रूवारी-** नांदेड ते निजामाबाद दरम्यान रेल्वे पुष पुल रेल्वे सेवा सुरु करण्यात यावी या संबंधी आज दि.५ फेब्रुवारी रोजी मुदखेड रेल्वे स्दटेशन येथे दक्षिण मध्य रेल्वे झोन सिकंदराबादचे



महाव्यवस्थापक संजयकुमार श्रीवास्तव यांची भेट घेत मुदखेड तालुका मराठी पत्रकार संघाच्या वतीने निवेदनाद्वारे मागणी केली आहे. दक्षिण मध्य रेल्वे सिकंदराबाद झोन चे महाव्यवस्थापक संजय कुमार श्रीवास्तव यांचं वार्षिक परीक्षण या हेतूने दक्षिण मध्य रेल्वे झोन मध्ये येणारे सर्व रेल्वे स्थानकांची पाहणी करत सुरू असलेल्या विकास कामांची माहिती घेत आज मुदखेड रेल्वे स्टेशनवर अमृत भारत योजनेत अंतर्गत मुदखेड रेल्वे स्टेशन पुनर्विकास योजनेअंतर्गत सुरू असलेल्या विकास कामांची माहिती घेतली यावेळी मराठी तालुका पत्रकार संघाच्या वतीने निवेदन स्वीकारले नांदेड पासून निजामाबाद दरम्यान सकाळी ९:०० नंतर देवगिरी एक्सप्रेस नंतर कोणतीच रेल्वे सेवा नसल्यामुळे या भागातील नागरिकांची खूपच प्रवास करण्यासाठी खूपच दमछाक होते त्यांना प्रवास करण्यासाठी एसटी किंवा खाजगी वाहतुकीनेच प्रवास करावा लागतो ती तात्काळ दूर करत नांदेड ते निजामाबाद दरम्यान पुषपुल सेवा रेल्वे सुरू करून होणारी गैरसोय दूर करून नागरिकांना रेल्वेची सेवा उपलब्ध करून द्यावी असे या निवेदनात प्रमुख मागणी केली आहे. याप्रसंगी तालुका अध्यक्ष सिद्धार्थ चौदंते, तालुका कार्याध्यक्ष दिनेश शर्मा, शहराध्यक्ष अतिक अहमद, शेख शमशोद्दीन, आणि मोहम्मद हकीम यांची उपस्थिती होती.

# आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांची आश्वासनपूर्ती

**तभा वृतसेवा**
**लोहा, दि. ५ फेब्रूवारी-**

नगर पालिका क्षेत्रात असलेले क्रिडा संकुलात सैन्य भरतीचा सराव करणाऱ्या तरुणांना भौतीक सुविधा पुरविण्यात येणार असे आ.प्रताप पाटील चिखलीकर यांनी क्रिडा संकुलाची पाहाणी करुन सराव करणाऱ्या तरुणाना विश्वास दिला

या मैदानावर पोलीस व सैन्य भरतीचा सराव करणाऱ्यांना तरुण-तरुणीना धावण्यासाठी तात्काळ ट्रॅक तयार करून देण्यात येणार आहे.या ठिकाणावरील जीममध्ये नविन व्यवस्था करुन त्यामध्ये साहित्य ठेवण्यासाठी सोया करण्यात येणार आहे.अशा सूचना आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यानी सार्वजनिक बांधकाम विभाग व क्रीडा अधिकारी यांना दिल्या आहेत.

तालुका क्रीडा संकुलाचे पाहणी करताना आ चिखलीकर यांच्या सोबत नगराध्यक्ष शरद पवार बांधकाम -विभागाचे उपअभियंता नरमिटवार तालुका क्रीडा अधिकारी, राहून श्रीरामवार, मुख्याधिकारी श्रीकांत लाळगे, उपनगराध्यक्ष करिम शेख, माजी कृउबा सभापती बाबुराव केंद्रे गटनेते भास्कर पवार , नगरसेवक अविनाश पवार,पंकज परिहार,



तुकाराम दाढेल , इरबाजी पवार क्रीडा तज्ज्ञ बी डी- जाधव, अभियंता सोमवंशी, शहर प्रमुख खंडू पवार यांसह कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित्र होते.

क्रीडा संकुलात सैन्य व पोलीस भरतीची तयारी करणाऱ्या तरुण-तरुणींसाठी धावण्याचा ट्रॅक , गोळा फेक, लांब उड्डी व शारीरिक चाचणी क्षमतासाठी उपयुक्त ठरणाऱ्या सुविधा देण्यात येणार आहेत . ४ फेब्रुवारी रोजी आ. . प्रताप पाटील चिखलीकर यांनी बेरळी रोड लगत लोहा तालुका क्रीडा संकुलाला भेट दिली तेथील दुरावस्था, वाढलेले गवत पाहून तालुका. अधिकारी यांना त्यांनी झापले. तसेच तेथे सैन्य व पोलीस भरतीची तयारी करणाऱ्या युवक युवतीशी त्यांनी संवाद साधला. आपल्या अडीअडचणी जाणून घेतल्या.

संबंधितांना तात्काळ सुचना देत आठ दिवसाच्या आत विद्यार्थ्यांसाठी धावण्याचा ट्रॅक तयार करावा इमारत परिसर स्वच्छता, रंगरंगोटी करावी तसेच या विद्यार्थ्यांना हॉल उपलब्ध देण्याच्या सूचना तसेच इमारत देखभाल साठीची व्यवस्था कसरण्याचे निर्देश दिले. सुनेगाव परिसरात सामाजिक वनीकरणाच्या जागेवर एखादा ट्रक तात्पुरता तयार करुन त्या भागातील विद्यार्थ्यांची गैरसोय व अडचण दूर होईल याची चाचपणी सुरू आहे.

# भू-विकास बँकेच्या ५ हजार १०६ कर्जदार शेतकऱ्यांचे कर्ज माफ

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ५ फेब्रूवारी-**

नांदेड जिल्ह्यातील भू-विकास बँकेच्या एकुण ५ हजार १०६ कर्जदार शेतकऱ्यांच्या ७/१२ उताऱ्यावरील भू-विकास बँकेच्या कर्ज बोजाची नोंद कमी करण्याबाबत जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी नुकतेच २ फेब्रुवारी रोजी परिपत्रक निर्गमीत केले आहे. त्यानुसार जिल्हयातील संबंधित सर्व तहसिलदार यांना तालुक्यातील एकुण ५ हजार १०६ थकबाकीदार शेतकऱ्यांची यादी देऊन सदर शेतकऱ्यांच्या ७/१२ उताऱ्यावरील भूविकास बँकेच्या (भु-तारण बँक, भूविकास बँक व महाराष्ट्र राज्य सहकारी कृषी ग्रामीण विकास बँक मर्या. मुंबई) कर्जबोजाची नोंद कमी करण्याबाबत तसेच यासाठी सर्व तालुक्यानी मंडळस्तरावर कॅम्प आयोजित करावीत व कर्ज बोजाची नोंद कमी केल्याचे प्रमाणपत्र निर्गमीत करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

नांदेड जिल्हा सहकारी कृषी ग्रामीण बहुउद्देशीय बँक (भू-विकास बँक ) नांदेड या बँकेची दिनांक ८ मार्च २०२५ रोजीच्या आदेशान्वये नोंदणी रद्द झाली असुन महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय एलडीबी १०१५/ प्र.क्र. २८ ( शिकाना / ७-स) दिनांक ९ नोव्हेंबर २०२२ अन्वये राज्यातील सर्व महाराष्ट्र राज्य सहकारी कृषी ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँक मर्या. मुंबई (शिखर भूविकास बँक) व जिल्हा सहकारी कृषी ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकाचे (जिल्हा भूविकास बँका) कर्ज घेतलेल्या शेतकऱ्यांचे संपूर्ण कर्ज पुर्णतः माफ झाले आहेत.

भु-तारण बँक, भूविकास बँक व महाराष्ट्र राज्य सहकारी कृषी ग्रामीण विकास बँक मर्या., मुंबई या बँकेचे सभासद असलेल्या शेतकऱ्यांनी नोंद कमी केल्याची खात्री करावी असे आवाहन केले.

# कलियुगामाजी करावें कीर्तन । तेणें नारायण देईल भेटी ।।
# या सद्भावनेने पैनगंगेच्या तीरावरील अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता.

**तभा वृतसेवा**
**माहूर, दि. ५ फेब्रूवारी-**

तालुक्यातील टाकळी गावच्या चोलेवाडी येथे लगतच्या पैनगंगेच्या तीरावरती गेल्या बारा वर्षापासून सतत सुरू असलेल्या हरीनाम सप्ताहाची सांगता

कलियुगामाजी करावें कीर्तन ।
तेणें नारायण देईल भेटी ।।

या सद्भावनेने ह. भ. प. शिवा महाराज यांच्या कल्याच्या कीर्तनाने करण्यात आली.

हरी नामाचा गजर हरिनामाचा काठी डाव मांडिला, पुंडलिक वरदे हरी विठ्ठल, विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल’ अशा विठूरायाच्या गजरात चोले वाडी टाकळी गावात हनुमान मंदिरा पासून दिंडी काढून हरीनाम सप्ताह सोहळ्यानिमित्ताने हरिनामाचा गजर करण्यात आला गावात घरो घरी रांगोळी सडा टाकून दिंडीचे स्वागत केले सात दिवसात सुरु असलेल्या पारायण, भागवत, हरिपाठ, भारूड, महाप्रसाद आणि रात्रीला कीर्तनाचा कार्यक्रम तसेच धार्मिक कार्यक्रमांमुळे पैंणगंगे काठावर जणू पंढरपुरासारखे वातावरण पाहायला मिळाले.या सोहळ्यात अनेक दानशूर व्यक्तीं यांच्या कडून महाप्रसाद देऊन विशेष सहकार्य केले तसेच या कीर्तन सोहळ्यात पारायण ह. भ. प.विलास महाराज टाकळीकर आणि भागवत ह. भ. प. शिवा बापू महाराज यांच्या मधुर वाणीतून भागवत कथा पार पडली. या अखंड हरिनाम सप्ताह विशेष म्हणजे चिमुकल्याने हरिपाठ करून उपस्थिताची मनं जिंकली.

यावेळी कीर्तन सोहळ्यात उपदेश करताना भावी



पिढीतला माणूस घडवण्यासाठी अशा सोहळ्याचे आयोजन करणे काळाची गरज असल्याची भावना ह. भ.प. निवृत्ती महाराज चाटे यांनी आपल्या कीर्तनातून व्यक्त केली.

महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. म्हणून या भूमीला खऱ्या अर्थाने संत परंपरेच अनुष्ठान लाभलं आहे. संत परंपरेमुळे महाराष्ट्राला मोठा वारसा लाभला आहे. याच माध्यमातून हा वारकरी संप्रदाय खऱ्या अर्थाने संपूर्ण जगभरात पोहोचायला मदत झाली. संत ज्ञानेश्वर, संत एकनाथ, संत गोरा कुंभार, संत चोखामेळा, संत जनाबाई, संत तुकाराम, संत नामदेव, संत निवृत्तीनाथ, संत मुक्ताबाई, संत सावता माळी, संत सोपानदेव यांच्यासोबतच अनेक संतांनी आपल्या अभंगातून, निरुपणातून समाजाला एक सकारात्मक दिशा देण्याच काम केलं.

संत बहिणाबाई आपल्या या अभंगात वारकरी संप्रदायाची मुहूर्तमेढ कशा पद्धतीने रोवली गेली याची माहिती देतात. बाराव्या शतकात संत ज्ञानेश्वरांनी या भूमीत वारकरी संप्रदायाचा पाया रचला. आणि तुकोबारायांनी त्यावर कळस चढवायच काम केलं.

नामदेव कीर्तन करी पुढे देव नाचे पांडुरंग। जनी म्हणे बोला ज्ञानदेवा अभंग।।

पहिले कीर्तनकार म्हणून संत नामदेव महाराज यांनी या परंपरेला सुरुवात केली. यावेळी ज्ञानोबाराय टाळकरी म्हणून तर गोरोबा काका पखवाज वाजवून नामदेवरायांना साथ द्यायचे. यावेळी चंद्रभागेच्या वाळवंटात ही कीर्तनं पार पडायची. इथूनच खऱ्या अर्थाने वारकरी कीर्तन परंपरेला प्रारंभ झाला आणि ही परंपरा आजतागायत सुरू आहे.

कालांतराने सात दिवसाचे पारायण सामूहिकरित्या सर्वांनी एकत्र येऊन पार पडू लागले. यातूनच सात दिवसाचा ‘अखंड हरिनाम सप्ताह’ खऱ्या अर्थाने सुरू झाला. सप्ताह म्हणजे वारकरी संप्रदायाची उपासना आहे. या सात दिवसात संतांचे अखंड नामचिंतन करण्यात येते.

पहाटे काकडा आरती. त्यानंतर ज्ञानेश्वरी किंवा गाथ्याचे सामुदायिक पारायण. दुपारी प्रवचन. संध्याकाळी हरिपाठ आणि रात्री हरिजागरण म्हणजेच कीर्तन, असा साधारण हरिनाम सप्ताहाचा दिनक्रम.

महाराष्ट्रात शेकडो वर्षांची परंपरा असलेले अखंड हरिनाम सप्ताह आजतागायत चालू आहेत. हिच परंपरा माहूर तालुक्यातील टाकळी गावच्या चोलेवाडी येथे गेल्या बारा वर्षांपासून सतत लगतच्या पैनगंगेच्या तीरावरती अखंडपणे सुरू आहे.

याठिकाणी सुरू असलेल्या सप्ताहात आघाताप्रमाणे पहिल्या दिवसाचे कीर्तन हे नामपर म्हणजे नाम महात्म्य सांगून देवाच्या स्वरुपाच वर्णन करणारं. दुसऱ्या आणि तिसऱ्या दिवशी संत महात्म्य म्हणजेच संतांच चरित्र सांगितलं गेलं. चौथ्या आणि पाचव्या दिवशी भक्तीपर. सहाव्या दिवशी वेदांताचे अभंग यावर तर सातव्या दिवसाचे मागणीपर आणि आठव्या म्हणजेच शेवटच्या दिवशी काल्याचे कीर्तन केले गेले.

टाकळीच्या चोलेवाडी येथील पैनगंगेच्या तीरावरती आयोजित हरिनाम सप्ताहात गावातील सर्वच ग्रामस्थ, विविध संस्थांच्या वतीने सप्ताहाचा नियोजन करण्यात आले. आजूबाजूच्या गावातील लोकांना देखील यावेळी सप्ताहाच आमंत्रण दिलं गेलं. यातून गाव परिसरातील सर्व टाळकरी, माळकरी, भाविक, भजनी मंडळ यांनी एकत्र येऊन हा सप्ताह साजरा केला.रोजच्या कीर्तनाला टाळकरी, पखवाज वादक, पेटी वादक, गायक, विनाधारी असे सर्वजण पांढऱ्या शुभ्र कपड्यात हजर होते. डोक्यावर टोपी, खांद्यावर उपरणे, गळ्यात टाळ, कपाळावर बुक्का असा एकंदरीत पेहराव होता.

विनाधारी महाराजांकडे विना देण्यात आली आणि एकमेकांच्या पाया पडत ‘राम कृष्ण हरी’ भजनाने रात्रीच्या कीर्तनाला सुरुवात केली गेली.

हा अभंग झाल्यावर विठोबा रखुमाई भजन सुरुवात तर शेवटी ‘जय विठ्ठल जय हरी विठ्ठल’ भजन होऊन कीर्तनाची सांगता होत होती.

अशा पद्धतीने सात दिवसाच्या सप्ताहात विविध महाराजांची कीर्तन झालीत. सप्ताहाचा शेवट काल्याच्या कीर्तनाने झाला. श्रीकृष्णाच्या जीवनातील महत्वाच्या प्रसंगांची माहिती यावेळी सांगितली गेली. यावेळी साधारण शेवटच्याच दिवसाचे कीर्तनकारांनी मुक्कामी थांबून दुसऱ्या दिवशी सकाळी काल्याचे कीर्तन केले. हे कीर्तन सकाळी साधारण दहाला सुरू झाले. या कीर्तनात कृष्णाच्या विविध लीला सांगणाऱ्या गौळणी म्हटल्या गेल्या. शेवटी दह्याच्या प्रसादाचं मडकं फोडून काला साजरा केला गेला. दुपारी सर्व ग्रामस्थांसाठी महाप्रसाद दिला गेला. यावेळी सप्ताहासाठी ज्यांनी ज्यांनी योगदान दिलं अशा मंडळींचे आयोजकांच्या वतीने आभार मानून सप्ताहाची सांगता करण्यात आली.

# नांदेडमध्ये दुग्ध व्यवसायवाढीला गती मिळणार; खा.डॉ. अजित गोपछडे यांच्या प्रस्तावाला केंद्राचा हिरवा कंदील

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ५ फेब्रूवारी-**

नांदेडमध्ये दुग्ध व्यवसायवाढीला केंद्राने हिरवा कंदील दाखवला असून जिल्ह्यातील दुग्धव्यवसायाची मोठी क्षमता लक्षात घेता, दुग्ध उत्पादन वाढीसाठी केंद्र सरकारकडून ठोस पावले उचलण्यात येत असल्याची ग्वाही केंद्रीय दुग्धविकास, पशुसंवर्धन व मत्स्यव्यवसाय मंत्री राजीव रंजन सिंह यांनी खा.डॉ.अजित गोपछडे यांना राज्यसभेत दिली.

राज्यसभा खासदार डॉ. अजित गोपछडे यांनी नांदेडसह मराठवाड्यातील दुग्धविकासाबाबत अत्यंत महत्त्वपूर्ण प्रश्न उपस्थित करून सभागृहाचे लक्ष वेधले. त्यावर उत्तर देताना मंत्री राजीव रंजन सिंह यांनी त्यांचे प्रथम अभिनंदन केले व या प्रश्नामुळे दुग्ध उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नांना राष्ट्रीय पातळीवर वाचा मिळाल्याचे नमूद केले.

मंत्री राजीव रंजन सिंह यांनी सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली केंद्र व राज्य सरकारांच्या समन्वयातून भारत आज जगातील सर्वात मोठा दूध उत्पादक देश बनला आहे. ज्या भागांमध्ये दुग्ध उत्पादनाची नैसर्गिक क्षमता आहे, त्या भागांमध्ये केंद्र सरकार विशेष प्रयत्न




करून दुग्धव्यवसायाला प्रोत्साहन देत आहे.याच अनुषंगाने मराठवाडा व विदर्भ विभागासाठी दि. १६ मार्च २०२५ पासून एन.डी.डी.बी. मार्फत, राज्य सरकारच्या सहकार्याने ‘विदर्भ-मराठवाडा डेअरी विकास परियोजना’ ही अभिनव योजना सुरू करण्यात आली असल्याची माहितीही त्यांनी दिली.नांदेड जिल्ह्याबाबत माहिती देताना मंत्री महोदयांनी स्पष्ट केले की, सध्या जिल्ह्यात सुमारे १९.६ हजार लिटर दैनंदिन दूध उत्पादन होत असून, दुग्ध उत्पादक शेतकऱ्यांना प्रोत्साहन देऊन मार्च २०२६ पर्यंत प्रतिदिन २५ हजार लिटर दूध उत्पादन करण्याचे लक्ष्य केंद्र - राज्य सरकारने संयुक्तपणे निश्चित केले आहे. मराठवाड्यातील दुग्धविकासाच्या पायाभूत सुविधांचा आढावा देताना त्यांनी सांगितले की, सध्या १५ बल्क मिल्क कुलर व एक मिल्क चिलिंग प्लांट कार्यरत आहेत.

देशातील दुग्धव्यवसायाची सद्यस्थिती स्पष्ट करताना मंत्री महोदयांनी नमूद केले की, जरी भारत जगातील सर्वात मोठा दूध उत्पादक देश असला, तरी सुमारे ६३ टक्के दूध उत्पादक असंघटित क्षेत्रात कार्यरत आहेत, तर केवळ ३७ टक्के क्षेत्र संघटित स्वरूपात आहे. असंघटित क्षेत्राचे संघटित क्षेत्रात रूपांतर करणे अत्यावश्यक असून, यामुळे दुग्ध उत्पादक शेतकऱ्यांना दूध उत्पादनाचा योग्य दर आणि थेट आर्थिक लाभ मिळेल, असे त्यांनी अधोरेखित केले.देशी वंशाच्या गाईंची संख्या वाढवण्यासाठी कृत्रिम गर्भधारणेची सुविधा शेतकऱ्यांच्या थेट दारापर्यंत पोहोचवली जात असल्याचेही मंत्री महोदयांनी सांगितले. या तंत्रज्ञानामध्ये सुमारे ९० टक्के गायींचा जन्म सुनिश्चित होईल, अशा पद्धतीचा वापर केला जात असून, त्यामुळे मोकाट जनावरांची समस्या निर्माण होणार नाही, याचीही काळजी घेतली जात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

खा. डॉ. अजित गोपछडे यांनी उपस्थित केलेल्या या प्रश्नामुळे नांदेडसह संपूर्ण मराठवाड्यातील दुग्धव्यवसायाला नवी दिशा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत असून, केंद्र सरकारच्या सकारात्मक भूमिकेमुळे दूध उत्पादक शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## सीटीईटी परीक्षेसाठी शिक्षकांना सुटी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ५ फेब्रुवारी :** केंद्रीय शिक्षकपात्रता परीक्षेसाठी (सीटीईटी) शिक्षकांना सूट दिल्याने दिलासा मिळाला असून, ही सीटीईटी परीक्षा दोन सत्रात होणार आहे. ही सीटीईटी परीक्षा केंद्राची असल्याने त्यात कोणताही बदल होणार नाही. हे प्रशासनाला माहिती असल्याने ज्या शिक्षकांनी सीटीईटी परीक्षेचे अर्ज भरले त्यांना जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीच्या मतदान प्रक्रियेतून सुटी देण्यात आली आहे .

राज्य मतदान प्रक्रियेस नियुक्त शिक्षकांच्या जागी सरकारच्या ३०० कर्मचाऱ्यांची सोमवारी अचानक नियुक्तीपत्र देऊन नेमणूक केली. त्यामुळे सीटीईटी परीक्षा देणाऱ्या शिक्षकांना मोठा दिलासा मिळाला. अन्यथा या शिक्षकांना सुटी दिली नसती तर त्यांना सीटीईटी परीक्षेस मुकावे लागले असते. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे २८ जानेवारी रोजी विमान अपघातात निधन झाल्याने राज्यात तीन दिवस दुखवटा पाळण्यात आला. पर्यायाने, मंत्री, आमदार, खासदारांना जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीसाठी प्रचार करता आला नाही. म्हणून ५ फेब्रुवारी रोजी होणारे मतदान पुढे ७ फेब्रुवारीला ढकलण्यात आले. ७ फेब्रुवारीलाच जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीचे मतदान आल्याने शिक्षकांची अडचण झाली.

शेवटी शिक्षकांना परीक्षेस सूट देणे आवश्यक होते. राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार शिक्षकांना सीटीईटी परीक्षेस सूट देत त्यांची मतदान प्रक्रियेतून सुटी केली.



## विविध वृत्त...

### राजम्याची बाजारात आवक वाढली

**लातूर :** येथील कृषी उत्पन्न बाजार समितीत शुक्रवारी व शनिवारी राजम्याची मोठी आवक झाल्याचे दिसून आले. शुक्रवारी राजम्याचा कमाल दर ८ हजार ७५१ तर सर्वसाधारण दर ८ हजार २०० रुपये प्रतिक्विंटल एवढा होता. शनिवारी त्यात घसरण झाल्याचे दिसून आले, शनिवारी कमाल दर ८ हजार ७०० तर सर्वसाधारण दर ८ हजार १०० रुपये प्रतिक्विंटल एवढा होता. शुक्रवारच्या तुलनेत शनिवारी आवक कमी झाली तरी दरही घसरल्याचे दिसून आले. शुक्रवारी ४२० क्विंटल तर शनिवारी ३२१ क्विंटल एवढी आवक झाली. यंदा जिल्ह्यात हरभरा पिकाबरोबरच राजमा पिकाची लागवड केली आहे. राजम्याला उतारा आणि बाजारभावही जास्त असल्याने राजम्याकडे ओढा असल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले.

### भुयारी मार्गात वाढली अस्वच्छता

**लातूर :** शहरातील भुयारी मार्गात रस्त्याच्या दोन्ही बाजूला धूळ व कचरा साचला आहे. तसेच मार्गात पाणी साचल्याने वाहनधारकांची गैरसोय होत आहे. शहरातील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी महत्त्वाच्या ठरणाऱ्या या भुयारी मार्गाच्या साफसफा-ईकडे पालिकेचे दुर्लक्ष होताना दिसत आहे. भुयारी मार्गात योग्य निचरा व्यवस्था नसल्याने येथे अधूनमधून पाणी साचते. त्यामुळे दुचाकी घसरून अपघात होण्याची शक्यता आहे. महापालिका प्रशासनाने भुयारी मार्गात स्वच्छता करावी, अशी मागणी होत आहे.

### जिल्हा परिषद निवडणुकीमुळे कार्यालयांत शुकशुकाट

**जळकोट :** जळकोट तालुक्यात सध्या जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांची तयारी सुरू आहे. या निवडणुकांमुळे जळकोट शहरात असलेल्या सर्व सरकारी कार्यालयामध्ये शुकशुकाट दिसून येत आहे. जळकोट तालुक्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीसाठी मोठ्या प्रमाणात मनुष्यबळ लागत आहे. शहरातील सर्व कार्यालयातील कर्मचाऱ्यांना इलेक्शन ड्युटी लागलेली आहे. जळकोट शहरात असलेल्या नगरपंचायत, सार्वजनिक बांधकाम विभाग, तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय, बाल विकास प्रकल्पाधिकारी कार्यालय, पंचायत समिती, जिल्हा परिषद पाणीपुरवठा उपविभाग कार्यालय, तहसील कार्यालय, आदी कार्यालयातील कर्मचाऱ्यांच्या नियुक्ती या जिल्हा परिषदेचे पंचायत समिती निवडणुकीसाठी करण्यात आलेले आहे.

### चला भारताला निरोगी बनवूया या विषयावर एक दिवसीय सेमिनार

**लातूर :** येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित,दयानंद विज्ञान महाविद्यालयातील सूक्ष्मजीवशास्त्र विभागातर्फे चला भारताला निरोगी बनवूया या मिशन अंतर्गत प्रोजेक्टच्या माध्यमातून एक दिवसीय सेमिनारचे आयोजन करण्यात आलेले होते.या सेमिनारच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे होते.याप्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून निसर्ग उपचार संस्था,पुणे येथील सिद्धांत तावरे,उपप्राचार्य प्रा.भाऊसाहेब सरवदे,पर्यवेक्षिका डॉ.संध्या कोल्हे,पर्यवेक्षक डॉ.हेमंत वरुडकर,आयक्यूएसी समन्वयक डॉ.जमन अंगुलवार, सेमिनार समन्वयक व सूक्ष्मजीवशास्त्र विभाग प्रमुख डॉ. राहुल मोरे,प्रा.मेघा पंडित,प्रा.शिवाजी आळणे, डॉ.रवींद्र शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

### जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धा संपन्न

**लातूर :** रोटरी क्लब लातूर व दयानंद शिक्षण संस्था, संचलित दयानंद कला महाविद्यालय, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने मोबाईल संस्कृती प्रगती की अधोगती या विषयावर जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन दयानंद कला महाविद्यालयात करण्यात आले होते. कोव्हिड कालावधीपासून सबंध विद्यार्थी मोबाईलच्या आहारी गेलेले आहेत यामुळे त्यांच्या शरीर व मनावर सखोल परिणाम होत चाललेला आहे. याचे गांभीर्य विचारात घेऊन हा विषय ठेवण्यात आलेला होता. सबंध जिल्हाभरातून ६१ विद्यार्थ्यांनी या स्पर्धेसाठी नाव नोंदणी केलेली होती. अनेकांनी या विषयाच्या अनुकूल बाजूने आपली मते मांडली त्यात मोबाईल हा आपल्या मूलभूत गरजा पैकी एक गरज आजच्या आधुनिक काळात निर्माण होत चाललेला आहे त्याचा योग्य मार्गाने, विधायक कामासाठी वापर केला तर ज्ञानवृद्धी होऊ शकते.काहींनी या विषयाच्या प्रतिकूल बाजूने आपली मते मांडली. काहींच्या मतानुसार मोबाईल हा विध्वंसाचे कारण बनत चाललेला आहे यापासून अनेकांना शारीरिक व्यंगत्व प्राप्त होत चालले आहे.

### देशमुख महाविद्यालयात सुशीलोत्सव समारंभ उत्साहात

**लातूर :** येथील मांजरा चॅरिटेबल ट्रस्ट संचलित श्रीमती सुशीलादेवी देशमुख महाविद्यालयात सुशीलोत्सव २०२६ चे आयोजन करण्यात आले होते. या समारंभासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून लोकप्रिय कवी रामदास कांबळे यांची विशेष उपस्थिती होती.

या समारंभाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अजय पाटील हे होते. विचार मंचावर या समारंभाचे समन्वयक प्रा. दादासाहेब लोंढे, सांस्कृतिक विभागाचे प्रमुख प्रा. शंकर चव्हाण, विज्ञान विभागाचे प्रमुख प्रा. हरिश्र्चंद्र मोगरगे याबरोबरच या समारंभाचे उद्घाटक प्रा. जयंत शास्त्री आदी मान्यवर उपस्थित होते. प्रारंभी प्रास्ताविक विचार प्रा. शंकर चव्हाण यांनी केले . विद्यार्थ्यांचे कौशल्य, स्किल विकसित होण्यासाठी म्हणून या समारंभाचे आयोजन करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

# सोमवारी होणार लातूरच्या कारभाऱ्यांची निवड

## महापौरपदी जयश्री सोनकांबळे तर उपमहापौरपदी ॲड. स्नेहल उटगेंची निवड निश्चित

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०५ फेब्रुवारी : नुकत्याच पार पडलेल्या लातूर शहर महानगरपालिकेच्या तिसऱ्या सार्वत्रिक निवडणुकीत भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने स्पष्ट बहुमत मिळवले आहे. लातूरच्या नूतन पदाधिकाऱ्यांची निवड सोमवारी, दि. ९ फेब्रुवारी रोजी होणार आहे. गुरुवारी महापौर - उपमहापौर पदासाठी काँग्रेसकडून अनुक्रमे जयश्री भालचंद्र सोनकांबळे व ॲड. स्नेहल श्रीकांत उटगे यांनी आपली नामनिर्देशनपत्रे दाखल केली. पालिकेत या नूतन पदाधिकाऱ्यांच्या निवडीची केवळ औपचारिकता बाकी आहे. काँग्रेससोबत आघाडी केलेल्या वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवारांनीही या पदासाठी उमेदवारी दाखल केल्याने ही निवडणूक बिनविरोध होऊ शकली नाही.**

लातूर शहर महानगरपालिकेच्या एकूण ७० जागांसाठी पार पडलेल्या निवडणुकीत भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व वंचित बहुजन आघाडीने ४७ , भारतीय जनता पार्टीने २२ तर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाने १ जागा जिंकली आहे. काँग्रेससोबत आघाडी केलेल्या वंचित बहुजन आघाडीने आपला आघाडी धर्म न पाळता काँग्रेसच्या उमेदवारांसमोर निवडून येणार नाही, हे माहिती असतानाही आपले उमेदवार देऊन काँग्रेससोबतची आपली आघाडी औटघटकेची ठरल्याचे दाखवून दिले आहे. वंचित बहुजन आघाडीला काँग्रेसने मनपा प्रमाणे जिल्हा - परिषद, पंचायत समिती निवडणुकीत सोबत न घेतल्याने हा आता हा प्रकार लातूरच्या राजकीय वर्तुळात केली जात आहे. राज्यात वंचित बहुजन आघाडीचे वर्चस्व हवे तसे न वाढण्याचे मुख्य कारण वंचितची



अशा प्रकारे राजकारण करण्याची पद्धत असल्याची चर्चा आता जोर धरत आहे.

लातूर शहर महानगरपालिकेच्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीत काँग्रेसने बहुमत मिळविले होते. दुसऱ्या निवडणुकीत भाजपने निसटते बहुमत मिळवून महिन्यात पहिल्यांदा सत्ता मिळवली होती. मात्र, भाजपचा सत्ता स्थापनेचा हा आनंद केवळ अडीच वर्ष टिकला होता. अडीच वर्षांनंतर मनपात नाट्यमय घडामोडी घडून काँग्रेसच्या विक्रांत गोजमगुंडेची महापौर पदावर तर उपमहापौर पदावर तेव्हा भाजपचे नगरसेवक असलेले चंद्रकांत बिराजदार यांची काँग्रेसच्या सहकार्याने निवड करण्यात आली होती. मनपाच्या तिसऱ्या सार्वत्रिक निवडणुकीत भाजप बहुमत मिळवेल,असा अंदाज वर्तवला जात असतानाच अनपेक्षितपणे काँग्रेसने बहुमताचा आकडा ओलांडण्याची किमया केली. याकामी काँग्रेसने वंचितसोबत केलेली आघाडी कामाला आल्याचे स्पष्ट दिसून आले. या निवडणुकीत काँग्रेसने वंचिताला केवळ पाच जागा सोडल्या होत्या. मात्र, पाच जागा लढवताना त्यातील चार जागा जिंकण्याचे काम वंचित बहुजन आघाडीने केले. काँग्रेससोबत मनपा प्रमाणे जि. प. - पं. स. मध्येही वंचितने धरली होती. मात्र काही कारणास्तव ती अपेक्षा न पूर्ण झाल्याने काँग्रेस - वंचितची ही आघाडी आता जणू तुटल्यात जमा झाली आहे. कारण काँग्रेसच्या महापौर - उपमहापौर पदाच्या उमेदवारांसमोर आपण विजयी होणार नाही, हे माहिती असूनही ही प्रक्रिया बिनविरोध होऊ द्यायची नाही, या उद्देशाने त्यांनी अनुक्रमे निकिता सोमवंशी व सचिन गायकवाड यांची उमेदवारी दाखल केली आहे.

महापौर पदी विराजमान होणाऱ्या जयश्री सोनकांबळे या प्रभाग क्रमांक १२ मधून निवडून आल्याआहेत. तर उपमहापौर पदाची संधी मिळालेले ॲड. स्नेहल उटगे प्रभाग ८ मधून निवडून आले आहेत. ॲड. स्नेहल उटगे यांचे आजोबा तमणप्पा उटगे यांनी तत्कालीन लातूर नगर परिषदेचे अध्यक्ष म्हणून तर वडील ॲड. श्रीकांत उटगे यांनी नगरसेवक म्हणूनही काम पाहिले आहे. सोमवार दि. ९ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता महापालिका सभागृहात जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या सभेमध्ये महापौर व उपमहापौरांच्या निवडीची घोषणा होणार आहे.

## लातुरात दि. ११ ते १३ फेब्रुवारी या कालावधीत नवनिर्माण व्याख्यानमालेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०५ फेब्रुवारी :** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे द्वितीय सरसंघचालक प.पू. गोळवलकर गुरुजी यांच्या जन्मदिनानिमित्त दि. ११ ते १३ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत लातुरात प्रतिवर्षाप्रमाणे नवनिर्माण प्रतिष्ठानच्या वतीने व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आल्याची माहिती प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रवीण सरदेशमुख यांनी दिली.

सन २०२५ -२६ या वर्षात 'वंदे मातरम' या राष्ट्रीय गीताचा १५० वा वर्धापनदिन, रा. स्व. संघाच्या स्थापनेचे शताब्दी वर्ष व पंडित दीनदयाल उपाध्याय यांनी समाजोन्नतीसाठी मांडलेले' एकात्म मानव दर्शन' या सिद्धांताचे हीरक महोत्सवी वर्ष अशा विचारांच्या त्रिवेणी संगमाचा योग लक्षात घेऊन सदर व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली आहे. दि. ११ फेब्रुवारी रोजी नाशिकच्या स्वामी विवेकानंद केंद्राचे सहसंचालक प्रकाश पाठक यांचे 'एकात्म मानव दर्शन' या विषयावर, दि. १२ फेब्रुवारी रोजी प्राचार्य अनंतराव पांडे यांचे पंच परिवर्तनातून सामर्थ्यशाली समाज व वैभवशाली राष्ट्र निर्मिती तर दि. १३ फेब्रुवारी रोजी विद्यावाचस्पती गुरुदेव शंकरराव अभ्यंकर यांचे वंदे मातरम - राष्ट्रीय गीताचा १५० वा वर्धापनदिन या विषयावर व्याख्यान होणार आहे. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून अनुक्रमे भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष सुशिलदादा बाजपायी, योगाचार्य दिलीपराव भातलवंडे, माजी कुलगुरू कर्नल डॉ. कारभारी काळे यांची उपस्थिती राहणार आहे. ही व्याख्यानमाला दररोज सायंकाळी सहा वाजता दयानंद सभागृह, लातूर याठिकाणी होणार आहे. या व्याख्यानमालेचा सर्वांनी लाभ घ्यावा असे आवाहन नवनिर्माण प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रवीण सरदेशमुख, उपाध्यक्ष महेंद्र जोशी, कार्यवाह अशोक शिवणे, कोषाध्यक्ष उमेश कुलकर्णी यांसह सुधीर धुत्तेकर, शैलेश कुलकर्णी, धनंजय पटवारी, संजय गुरव, सौ. प्राजक्ता देशमुख, एड. सौ. प्रणाली रायचूरकर, व्यंकटेश कुलकर्णी, चंद्रकांत कुलकर्णी, उमेश सेलूकर, किशोर कुलकर्णी, यांनी केले आहे.

## अभिजात फिल्म सोसायटीतर्फे रविवारी 'गांधी टॉक्स..' या सिनेमाचा विशेष शो

### दिग्दर्शक किशोर बेळेकर राहणार उपस्थित

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०५ फेब्रुवारी :** येथील अभिजीत फिल्म सोसायटी तर्फे गांधी टॉक्स या मूक सिनेमाचा विशेष शो दि. ८ फेब्रुवारी, रविवार रोजी दुपारी चार वाजता पिव्हीआर टॉकीज येथे आयोजित करण्यात आला आहे. या सिनेमाच्या निमित्ताने दिग्दर्शक किशोर बेळेकर उपस्थित राहणार असून चित्रपटानंतर ते प्रेक्षकांशी संवाद देखील साधणार आहेत.

गांधी विचारांना जगण्याच्या चलनात आणण्याचा एक वेगळा प्रयत्न असलेला 'गांधी टॉक्स ...' संवादविरहित चित्रपट आहे. किशोर बेळेकर या मराठी माणसाने तब्बल २४ वर्षे धडपड करून बनवलेला हा ब्लॅक कॉमेडी कला प्रकारातून उलगडणारा चित्रपट आहे. विजय सेतुपती,




अरविंद स्वामी,अदिती राव हैदरी, सिद्धार्थ जाधव अशा प्रथितयश कलाकारांच्या यात प्रमुख भूमिका आहेत. ए. आर. रहमान यांच्या आशयपोषक संगीताने आणि पार्श्र्वसंगीताने हा सजलेला चित्रपट सर्व लातूरकरांनी पाहावा असे आवाहन अभिजात फिल्म सोसायटीतर्फे करण्यात आले आहे.

## श्री पट्टाभिराम मंदिर देवस्थानच्या प्रथम वर्ष परिपुर्ती दिनानिमित्त महोत्सवाचे आयोजन

### राम भक्तांनी धार्मिक कार्यक्रम व महाप्रसादाचा लाभ घेण्याचे आयोजकांच्या वतीने आवाहन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०५ फेब्रुवारी :** प्रभू रामाच्या डाव्या मांडीवर बसलेल्या सीतामाई यांची प्रतिमा म्हणजे पट्टाभिराम मूर्ती असे पट्टाभिरामाचे महाराष्ट्रातील एकमेव मंदिर असलेल्या लातूर तालुक्यातील तपोवन कॉलनी, हणमंतवाडी, मळवटी रोड येथील श्री पट्टाभिराम मंदिर देवस्थानच्या प्रथम वर्ष परिपुर्ती दिनानिमित्त 'वर्ष परिपुर्ती दिन महोत्सव' चे आयोजन बुधवार (दि. ११) रोजी करण्यात आले आहे. वर्ष परिपुर्ती दिन महोत्सवात विविध धार्मिक कार्यक्रम होणार आहेत. या सर्व कार्यक्रमात भक्तांनी सहभागी होऊन श्री सीतासमवेत पट्टाभिराम देवतेचे कृपाआधिर्वाद प्राप्त करुन परमकल्याण करुन घ्यावे असे आवाहन श्री पट्टाभिराम मंदिर देवस्थान समितीच्यावतीने करण्यात आले आहे.




श्री पट्टाभिराम मंदिर देवस्थानच्या प्रथम वर्ष परिपूर्ती दिन महोत्सवा दरम्यान डॉ. अतुल प्रकाशराव देशमुख यांच्या हस्ते पट्टाभिरामास विशेष अभिषेक करण्यात येणार आहे. वस्त्रालंकार सेवा प्रभाकर मनोहरराव कुलकर्णी लोहटेकर तर राम नाम स्वाहःकारः बाळकृष्ण कुलकर्णी, माधवराव पाटील टाकळीकर, संजय कुलकर्णी, नवनाथ शिंदे, अमोल कुलकर्णी, सागर महाजन, अजित परळकर, किरण कुलकर्णी हे सहकुटुंब करणार आहेत. महाप्रसादाचे यजमान बाबूराव कुलकर्णी येळनूरकर व पट्टाभिराम मंदिर देवस्थान आहे. महाप्रसाद दुपारी १ नंतर सुरु करण्यात येणार आहे. श्री पट्टाभिराम मंदिर देवस्थानच्या प्रथम वर्ष परिपूर्ती दिन महोत्सवात सर्व रामभक्तांनी उपस्थित राहून पट्टा ग्रामदेवतेचे कृपाआशीर्वाद प्राप्त करावेत असे आवाहन हणमंतवाडी ग्रामस्थ व श्री पट्टाभिराम मंदिर देवस्थानच्यावतीने करण्यात आले आहे.

# २३ हजार ५६६ वीजग्राहकांनी स्विकारला 'गो-ग्रीन' वीजबिलांचा पर्याय

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०५ फेब्रुवारी :** वीजबिलांसाठी छापील कागदाचा वापर पूर्णपणे बंद करीत केवळ 'ईमेल' व 'एसएमएस'चा पर्याय निवडणाऱ्या लातूर परिमंडलातील २३ हजार ५६६ लघुदाब वर्गवारीतील वीजग्राहकांनी महावितरणच्या गो-ग्रीन योजनेचा लाभ घेतला आहे. या वीजग्राहकांना २८ लाख २७ हजार रुपयांचा वार्षिक फायदा होत आहे.

पर्यावरणाला हातभार लावण्यासाठी 'गो-ग्रीन' योजनेत सहभागी होण्याची ऑनलाइन सुविधा व योजनेची सविस्तर माहिती महावितरणच्या मोबाईल ॲप व महावितरणच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. वीजग्राहकांनी 'गो-ग्रीन' योजनेमध्ये सहभागी व्हावे व पर्यावरणपूरक योजनेत योगदान द्यावे असे आवाहन महावितरणच्या लातूर




परिमंडलाचे मुख्य अभियंता अरविंद बुलबुले यांनी केले आहे.

वार्षिक १२० रूपयांचा फायदा* - महावितरणकडून पर्यावरणपूरक 'गो-ग्रीन' योजनेतून वीज बिलासाठी छापील कागदाचा वापर कमी करण्यावर भर देण्यात आला आहे. कागदी बिलाऐवजी फक्त 'इमेल' व 'एसएमएस'चा पर्याय निवडल्यास प्रतिबिलात १० रुपये सवलत देण्यात येत आहे. त्यामुळे ग्राहकांचा वीजबिला मध्ये वार्षिक १२० रुपयांचा आर्थिक फायदा होत आहे. विशेष म्हणजे गो-ग्रीन योजनेचा पर्याय निवडल्या नंतर संबंधित ग्राहकांच्या पहिल्याच वीजबिलामध्ये पुढील १२ महिन्यांची म्हणजे १२० रुपयांची सवलत एक रकमी देण्यात येत आहे. पूर्वी ही सवलत प्रत्येकी १० रुपये प्रत्येक बिलामध्ये मिळत होती.

महावितरणच्या संगणक प्रणालीमध्ये वीजबिल तयार झाल्यानंतर लगेचच संबंधित ग्राहकांना नोंदणीकृत 'इमेल'वर व मोबाईलवर 'एसएमएस'द्वारे दरमहा वीजबिल पाठविण्यात येत आहे. वीजबिलांच्या तारखेपासून सात दिवसांमध्ये रकमेचा तत्पर भरणा केल्यास एक टक्के सवलत दिली जाते. त्यासाठीही वीजबिल तात्काळ ऑनलाईनद्वारे भरणे सोयीचे झाले आहे. वीजग्राहकांना इमेलद्वारे प्राप्त झालेले दरमहा वीजबिल संगणकात सॉफ्ट कॉपीमध्ये जतन करून ठेवता येते. यासह महावितरणच्या अधिकृत संकेतस्थळावर चालू वीजबिलासह मागील ११ महिन्यांचे असे एकूण १२ महिन्यांचे वीजबिले मूळ स्वरुपात उपलब्ध आहेत. आवश्यकतेप्रमाणे वीजग्राहकांना ते कधीही डाऊनलोड करण्याची किंवा मूळ स्वरूपात रंगीत प्रिंट करण्याची सोय आहे.

## वृत्तपत्र वितरक मंडळाच्या अध्यक्षपदी राहुल करंडे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०५ फेब्रुवारी :** लातूर जिल्हा वृत्तपत्र वितरक विकास मंडळाच्या अध्यक्षपदी राहूल करंडे यांची तर सचिवपदी लक्ष्मण पेठकर यांची निवड झाली आहे. ज्येष्ठ वृत्तपत्र विक्रेते व राज्य संघटनेचे विभागीय संघटक सचिव जगदीश उमरदंड यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

शहरातील वृत्तपत्र विक्रेत्यांची बैठक नुकतीच पार पडली. यावेळी वितरक विकास मंडळाच्या अध्यक्षपदी राहूल करंडे, सचिव पदी लक्ष्मण पेठकर, कार्याध्यक्षपदी बिरु हाळे, जिल्हा संघटक म्हणून दीपक कांबळे, उपाध्यक्षपदी रमेश पोपळघट, कोषाध्यक्षपदी सुधीर लहाडे, प्रसिद्धी प्रमुख परमेश्र्वर सुरवसे, अनंत सुडे व अशरफ शेख तर जाहिरात प्रमुख अनंत हाळे, सदस्यपदी मैनोदिन शेख, राजेश सूर्यवंशी, नरसिंह शेळके, मोहन माने, श्याम काटकर, बाबा विठुबोने,गणेश कुलकर्णी यांची निवड करण्यात आली आहे.